IAS, राज्यसेवा पूर्व आणि मुख्य परीक्षा, PSI/STI/ASST.
पूर्व व मुख्य परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त

तृतीय आवृत्ती

# भारताची राज्यघटना

# सराव प्रश्नसंच

(स्पष्टीकरणासह)

MPSC UPSC




संपादक -
**श्री. रंजन कोळंबे**
संचालक, भगीरथ IAS अकॅडमी

**2500+ प्रश्न**

लेखक
डॉ.मिलिंद पार्वती बळीराम चव्हाण
(State Tax Inspector)


लक्ष्मी शशिकला देविदास रोकडे
(State Tax Inspector)


अंकुश अनिता प्रेमसिंग राठोड
(Jr.Auditor, Finance Dept.)

भगीरथ IAS Academy
UPSC • MPSC
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते !

www.bhagirathacademy.com E-mail : bhagirathacademypune@gmail.com


# सर्व स्पर्धा परीक्षेसाठी **भगीरथ प्रकाशन**चे उपयुक्त पुस्तके सर्वत्र उपलब्ध










भगीरथ प्रकाशन, पुणे for UPSC & MPSC

ऑफीस २ : २ रा मजला, केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे-३०.
मो.९९७०२९८१९७,९०९०९०६७७७

www.bhagirathacademy.in E-mail: bhagirathacademypune@gmail.com Bhagirath IAS Academy

भगीरथ प्रकाशन, पुणे
for UPSC & MPSC

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना व घटनानिर्मिती | ७ |
| २. | भारताच्या घटनेची ठळक वैशिष्ट्ये | १२ |
| ३. | प्रास्ताविका | १५ |
| ४. | संघराज्य व त्यांचे राज्यक्षेत्र | १९ |
| ५. | नागरिकत्व | २४ |
| ६. | मुलभूत हक्क | २८ |
| ७. | राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे | ३७ |
| ८. | मुलभूत कर्तव्ये | ३९ |
| ९. | घटनादुरुस्ती | ४१ |
| १०. | संघराज्य शासन व कार्यकारी मंडळ - राष्ट्रपती | ४५ |
| ११. | उपराष्ट्रपती | ५४ |
| १२. | पंतप्रधान | ५७ |
| १३. | केंद्रीय मंत्रिमंडळ | ६० |
| १४. | भारताचे महान्यायवादी | ६५ |
| १५. | संसद | ६७ |
| १६. | न्यायव्यवस्था | ८६ |
| १७. | राज्यशासन कार्यकारी मंडळ व विधानमंडळ (राज्यपाल, मुख्यमंत्री, राज्याचा महाधिवक्ता, राज्य विधीमंडळ) | ९६ |
| १८. | केंद्र राज्य संबंध व आंतरराज्य संबंध | १०० |
| १९. | केंद्रशासित प्रदेश | १०७ |
| २०. | जम्मू व कश्मीर | १११ |
| २१. | आणीबाणी तरतुदी | ११४ |
| २२. | पंचायतराज | १२० |
| २३. | शहरी स्थानिक स्वराज्यसंस्था | १४४ |
| २४. | संघ लोकसेवा व राज्य लोकसेवा आयोग | १४७ |
| २५. | न्यायाधिकरण | १५७ |
| २६. | निवडणूक आयोग व निवडणूक प्रक्रिया | १६३ |
| २७. | राजकीय पक्ष व दबावगट | १७८ |
| २८. | कार्यालयीन भाषा/राजभाषा | १८४ |
| २९. | घटनेची परिशिष्टे / अनुसूची | १८७ |

| | | |
|---|---|---|
| ३०. | काही महत्त्वाचे आयोग<br>(राष्ट्रीय महिला आयोग, मानवी हक्क आयोग,<br>राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग) | १८९ |
| ३१. | लोकपाल व लोकन्यायालय | १९६ |
| ३२. | जिल्हा प्रशासन | १९९ |
| ३३. | शिक्षण व्यवस्था | २०४ |
| ३४. | प्रशासकीय कायदे<br>(कायद्याचे राज्य, नैसर्गिक न्यायाचे तत्व) | २१० |
| ३५. | काही समर्पक कायदे<br>पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६<br>ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६<br>माहितीचा अधिकार अधिनियम २००५<br>माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००<br>भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८<br>अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध)नियम १९८९<br>नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९९५ | २१३ |
| ३६. | समाजकल्याण व सामाजिक विधिविधान<br>कौटुबिक हिंसाचार (प्रतिबंध) अधिनियम,२००५ | २३९ |
| ३७. | शासन व्यवहाराच्या बदलत्या संदर्भात प्रशिक्षण<br>(यशदा (YASHADA), लाल बहादूर शास्त्री प्रशासन अकादमी (LBSNBAA), सरदार<br>वल्लभभई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी (SVPNPA)) | २४३ |
| ३८. | महत्त्वाचे अधिनियम<br>(भारतीय साक्षीपुरावा अधिनियमाचे कलम १२३, कार्यालयीन गुप्तता अधिनियम १९२३,<br>माहितीचा अधिकार आणि कार्यालयीन गुप्तता अधिनियमावर त्याचा होणारा परिणाम) | २५१ |
| ३९. | सार्वजनिक खर्चावर नियंत्रण | २५५ |
| ४०. | आयोगाने विचारलेले प्रश्न (राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१९ ते २०१२) | २६३ |

# १ प्रस्तावना व घटनानिर्मिती

**१) सर्वप्रथम संविधान सभेची कल्पना कोणी मांडली?**

(१) महात्मा गांधी (२) पट्टाभी सितारामय्या
(३) मानवेंद्रनाथ रॉय (४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**स्पष्टीकरण :** मानवेंद्रनाथ रॉय यांनी संविधान सभेची कल्पना १९३४ मध्ये मांडली होती. ते भारतातील साम्यवादी चळवळीचे अग्रणी होते. तत्पुर्वी १९२२ मध्ये महात्मा गांधींनी संविधान सभेचा शब्दोल्लेख न करता मागणी केली होती.

---

**२) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने संविधान सभेची मागणी सर्वप्रथम कोणत्या बैठकीत केली?**

(१) नागपूर (२) पाटणा
(३) अहमदाबाद (४) लाहोर

**स्पष्टीकरण:** ५ ते ७ डिसेंबर, १९३४ दरम्यान पाटणा येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत काँग्रेसने भारतीय घटनात्मक सुधारणांबाबतचा ब्रिटीश संयुक्त संसदीय समितीचा अहवाल फेटाळून लावला व संविधान सभेची मागणी केली.

---

**३) ब्रिटिश सरकारने पहिल्यांदाच भारताची घटना मुख्यत: भारतीयांनी तयार करावी, हे तत्त्व मान्य केले.**

(१) १९४० च्या लॉर्ड लिनलिथगो यांच्या ऑगस्ट ऑफरद्वारे
(२) १९४२ च्या सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या तरतुदीमध्ये
(३) १९४६ च्या कॅबिनेट मिशन प्लॅन मध्ये
(४) वरीलपैकी एकही पर्याय योग्य नाही.

**स्पष्टीकरण:** १९४० च्या लॉर्ड लिनलिथगो यांच्या ऑगस्ट ऑफरद्वारे

---

**४) कॅबिनेट मिशन प्लॅन (त्रिमंत्री योजना) मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत. योग्य पर्याय निवडा.**

१) संविधान सभेत एकूण २९९ सदस्य असतील.
२) संविधान सभेच्या सदस्यांची निवडणूक प्रत्यक्षपणे प्रौढ मतदानाच्या आधारे केली जाईल.
३) साधारणत: १० लाख लोकसंख्येमागे एक सदस्य असे प्रमाण राखण्यात येईल.
४) जागांचे विभाजन चार प्रमुख गटांमध्ये केले जाईल शिख, हिंदू, मुस्लिम व साधारण

(१) फक्त १ व ३ (२) फक्त १, ३ व ४
(३) वरील सर्व (४) फक्त ३

**स्पष्टीकरण :** कॅबिनेट मिशन प्लॅनच्या तरतुदी

१) संविधान सभेत एकूण ३८९ सदस्य असतील. (त्यापैकी २९२ सदस्य ब्रिटिश प्रांताकडून, ४ सदस्य चीफ कमिशनरच्या प्रांताकडून, तर ९३ सदस्य भारतीय संस्थानिकांचे प्रतिनिधी असतील.)
२) संविधान सभेच्या सदस्यांच्या निवडणुका अप्रत्यक्षपणे एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधीत्त्वाच्या पद्धतीने केल्या जातील.
३) साधारणत: दहा लाख लोकसंख्येमागे एक सदस्य असे प्रमाण राखण्यात येईल.
४) जागांचे विभाजन तीन प्रमुख गटांमध्ये केले जाईल. शीख, मुस्लीम व साधारण.

---

**५) संविधान सभेच्या कामकाजासंदर्भात खालील विधाने विचारात घ्या.**

अ) ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक झाली.
ब) मुस्लिम लीगचे मोजकेच सदस्य सभेला हजर होते.
क) बैठकीला एकूण २११ सदस्य हजर होते.
ड) इंग्लंडच्या पद्धतीचे अनुसरण करुन ज्येष्ठतम सदस्य असलेल्या डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांची तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

**वरीलपैकी अचुक विधान/ने कोणते/ती आहेत?**

(१) केवळ ड (२) केवळ अ व क
(३) केवळ अ, ब व क (४)सर्व विधाने योग्य आहेत.

**स्पष्टीकरण:** मुस्लिम लिगचा एकही सदस्य हजर नव्हता.

* फ्रान्सच्या पद्धतीचे अनुकरण करुन डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांची तात्पुरते अध्यक्ष म्हणुन निवड करण्यात आली.

---

**६) पुढील विधाने अभ्यासा.**

१) ३ जून १९४७ रोजी माऊंटबॅटन योजना जाहीर झाली.
२) ५ जुलै,१९४७ रोजी ब्रिटीश पार्लमेंटने 'भारतीय स्वातंत्र्याचा कायदा', १९४७ संमत केला.
३) १८ जुलै, १९४७ रोजी ब्रिटिश राज्यसत्तेची त्यास मान्यता मिळाली.

| उत्तरे | १)३ | २)२ | ३)१ | ४)४ | ५)२ | ६)१ |
|---|---|---|---|---|---|---|

**वरीलपैकी योग्य विधान/ने कोणते/ती?**

(१) वरीलपैकी सर्व (२) केवळ २ व ३

(३) केवळ १ व २ (४) केवळ १ व ३

**७) संस्थानिकांच्या प्रतिनिधींच्या संविधान सभेतील प्रवेशाबाबत खालील विधाने अभ्यासा.**

१) २८ एप्रिल, १९४७ रोजी पाच संस्थानिकांच्या प्रतिनिधींनी संविधान सभेत प्रवेश केला होता.

२) कॅबिनेट मिशन जाहीर झाल्यानंतर उर्वरित संस्थानिकांच्या प्रतिनिधींनी प्रवेश केला.

३) परंतु भारतीय प्रदेशातील मुस्लिम लिगच्या प्रतिनिधींनी प्रवेश केला नाही.

**वरीलपैकी अचुक नसलेली विधाने/न कोणती/ते?**

(१) केवळ ३ (२) केवळ २ व ३

(३) वरीलपैकी सर्व (४) केवळ १ व ३

**स्पष्टीकरण:** अचुक नसलेली म्हणजे चुक असलेली विधाने

१) २८ एप्रिल, १९४७ रोजी सहा संस्थानिकांच्या प्रतिनिधींनी संविधान सभेत प्रवेश केला.

२) माऊंटबॅटन योजना ३ जून १९४७ रोजी जाहीर झाल्यानंतर उर्वरित संस्थानिकांच्या प्रतिनिधींनी प्रवेश केला.

३) भारतीय प्रदेशातील मुस्लिम लिगच्या प्रतिनिधींनी सुद्धा आपापल्या जागा ग्रहण केल्या.

**८) २८ एप्रिल १९४७ रोजी सहा संस्थानिकांच्या प्रतिनिधींनी संविधान सभेत प्रवेश केला होता. खालीलपैकी कोणत्या संस्थानिकाच्या/कांच्या प्रतिनिधींनी प्रवेश केला नव्हता?**

(१) पटियाला (२) उदयपूर

(३) म्हैसूर (४) रेवा

**स्पष्टीकरण :** प्रवेश केलेल्या सहा संस्थानिकांची नावे ❋

१) उदयपूर २) पटियाला ३) रेवा

४) बिकानेर ५) जयपूर ६) बडोदा

**९) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा, १९४७ अन्वये, संविधान सभेच्या बाबतीत पुढील बदल करण्यात आले. ती अभ्यासा.**

१) संविधान सभेला पूर्ण सार्वभौम बनविण्यात आले. परंतू ब्रिटिश पार्लमेंटने केलेल्या कोणत्याही भारतविषयक कायद्यात बदल करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा अधिकार प्राप्त झाला नाही.

२) संविधान सभेला कायदेमंडळाचा दर्जा प्राप्त झाला.

३) पाकिस्तानात गेलेल्या क्षेत्रातील मुस्लिम लिगचे सदस्य संविधान सभेतुन बाहेर पडल्याने संविधान सभेची सदस्य संख्या ३०९ इतकी झाली.

**उपरोक्त विधानांपैकी योग्य नसलेली विधाने कोणती?**

(१) केवळ ३ (२) वरीलपैकी सर्व

(३) केवळ १ व ३ (४) केवळ २ व ३

**स्पष्टीकरण:** (१) संविधान सभेला पूर्ण सार्वभौम बनविण्यात आले. तसेच ब्रिटिश पार्लमेंटने केलेले कोणत्याही भारतविषयक कायद्यात बदल किंवा तो कायदा रद्द करण्याचा अधिकार प्राप्त झाला. (२) विधान योग्य आहे. (३) सदस्य संख्या २९९ इतकी झाली.

**१०) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा, १९४७ अन्वये संविधान सभेला कायदेमंडळाचा दर्जा प्राप्त झाला. म्हणजेच संविधान सभेला दोन कार्ये देण्यात आली. स्वतंत्र भारतासाठी घटना निर्मिती आणि देशासाठी कायदे करणे. याविषयी खालील विधानांचा विचार करा.**

१) संविधान सभेची बैठक जेव्हा कायदेमंडळ म्हणून कार्य करत असे तेव्हा सर बी. एन. राव तिचे अध्यक्ष म्हणुन कार्य करीत असत.

२) संविधान सभेची बैठक जेव्हा घटनानिर्मितीच्या कामासाठी होत असे, तेव्हा डॉ. राजेंद्रप्रसाद अध्यक्ष म्हणून कार्य करीत असत.

**वरील पर्यायापैकी अयोग्य नसलेली/ले विधान/ने कोणती/ते?**

(१)फक्त २ (२)१ व २ दोन्ही

(३)फक्त १ व २ (४)फक्त १

**स्पष्टीकरण :** अयोग्य नसलेले म्हणजे योग्य असलेले (१) संविधान सभेची बैठक, कायदेमंडळ म्हणून कार्य करत असताना अध्यक्ष जी. व्ही. मावळणकर असत.

**११) संविधान सभेच्या कामासंदर्भात खालील विधानांचा विचार करा.**

१) मे १९४९ मध्ये संविधान सभेने भारताच्या राष्ट्रकुलाच्या सदस्यत्वाला अनुमोदन दिले.

२) २२ जुलै, १९४७ रोजी सभेने भारताचा राष्ट्रीय ध्वज स्वीकृत केला. त्याचे डिझाईन आंध्रप्रदेशचे पिंगल्ली वेंकय्या यांनी तयार केले होते.

३) २४ जानेवारी १९५० रोजी सभेने भारताचे राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान स्वीकृत केले.

४) २४ जानेवारी, १९५० रोजी झालेल्या संविधान सभेच्या शेवटच्या बैठकीत २६ जानेवारी पासून लोकसभेच्या निवडणूका होईपर्यंत संविधान सभेलाच तात्पुरती संसद म्हणून घोषित करण्यात आले.

| उत्तरे | ७)३ | ८)३ | ९)३ | १०)१ | ११)१ |
|---|---|---|---|---|---|

# ६ मूलभूत हक्क

**१) मूलभूत हक्कासंबंधी खालील विधानांचा विचार करा.**

अ) भारतीय राज्यघटनेच्या भाग ३ (कलम १२ ते ३५)मध्ये मूलभूत हक्क समाविष्ट करण्यात आले आहेत.

ब) भाग ३ ला भारताची मॅग्नाकार्टा असे संबोधले जाते.

क) घटनाकर्त्यांनी हे मूलभूत हक्क युएसएच्या घटनेवरुन घेतले आहेत.

**उपरोक्त विधानांपैकी अचुक विधाने ओळखा.**

(१) केवळ अ व क (२) अ, ब व क तीनही
(३) केवळ अ व ब (४) केवळ ब व क

---

**२) मूलभूत हक्कांविषयी खालील विधाने अभ्यासा.**

अ) मूलभूत हक्क हे राज्य घटनेमध्ये समाविष्ट केलेले असतात.

ब) हे अधिकार न्याय प्रविष्ठ असतात.

क) हे अधिकार सर्व प्रकारच्या सार्वजनिक प्राधिकाऱ्यांवर बंधनकारक असतात. मात्र खाजगी प्राधिकाऱ्यांवर बंधनकारक नसतात.

**वरील विधानांपैकी अचुक नसलेली विधाने सांगा.**

(१) केवळ ब (२) केवळ ब
(३) केवळ क (४) अ ब व क तीनही

**स्पष्टीकरण :** देशाच्या घटनेत समाविष्ट करण्यात आलेल्या हक्कांना मूलभूत हक्क असे म्हणतात. ह्या हक्कांना मूलभूत हक्क म्हणण्याचे कारण - १) ते राज्यघटनेमध्ये समाविष्ट केलेले असतात.राज्यघटना देशाचा मूलभूत कायदा असतो. (२) हे अधिकार न्यायप्रविष्ठ असतात व त्यांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयांमार्फत ते पुन्हा प्राप्त करुन घेता येतात.(३) हे अधिकार सर्वप्रकारच्या सार्वजनिक प्राधिकाऱ्यांवर बंधनकारक असतात. तसेच काही अधिकार खाजगी व्यक्तींविरुध्दही प्राप्त होतात.

---

**३) मुलभूत हक्कांच्या वैशिष्ट्यासंबंधी खालील विधानांचा विचार करा.**

अ) मूलभूत हक्क ही घटनेचा अविभाज्य भाग आहे व कोणत्याही कायद्याद्वारे बदलता किंवा रद्द करता येत नाही.

ब) घटनेचा भाग तीन हा जगातील कोणत्याही घटनेतील मूलभूत हक्कांपेक्षा अधिक विस्तृत व विश्लेषणात्म आहे.

क) फक्त घटनेत उल्लेख केलेले हक्कच मूलभूत हक्क आहेत. या यादीमध्ये नसलेल्या कोणत्याही इतर हक्कांना मूलभूत हक्कांचा दर्जा नाही.

ड) मुलभूत हक्क हे अमर्यादित नसुन गुणात्मक आहेत.

**पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.**

१) अ, ब बरोबर, क व ड चूक
२) ब, क व ड बरोबर आणि फक्त अ चूक
३) अ, क व ड बरोबर आणि फक्त ब चूक
४) अ, ब, क व ड सर्व बरोबर

**स्पष्टीकरण :** मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती करता येते. संसदेस मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. मात्र संसदेस ही दुरुस्ती घटनादुरुस्ती कायद्यानेच करता येते, साधारण कायद्याने नव्हे. असे करताना मात्र घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करता येत नाही.

**इतर वैशिष्टये :** मूलभूत हक्क स्थगित करता येतात. (अपवाद कलम २० व २१) तसेच कलम १९ अंतर्गत उपलब्ध ६ मूलभूत स्वातंत्र्ये, युद्ध किंवा बाह्य आक्रमणाच्या आधारावर घोषित करण्यात आलेल्या आणिबाणी दरम्यानच स्थगित करता येतात. सशस्त्र उठाव या कारणाच्या आधारावर घोषित करण्यात आलेल्या आणिबाणी दरम्यान ही स्वातंत्र्ये स्थगित करता येत नाही.

---

**४) घटनेच्या भाग३ मधील कलम १२ मध्ये राज्यसंस्थेची व्याख्या दिली आहे. या व्याख्येनुसार'राज्यसंस्था' या शब्दोल्लेखात पुढीलपैकी कोणती बाब येत नाही.**

अ) भारताचे शासन व संसद

ब) घटक राज्य शासन व विधीमंडळ

क) सर्व स्थानिक प्राधिकारी, नगरपालिका, पंचायती, जिल्हा मंडळे, न्यास इत्यादी.

ड) भारताच्या राज्यभुमीतील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील इतर सर्व प्राधिकारी.

(१) केवळ अ व ब
(२) केवळ अ, ब व क
(३) केवळ अ,ब व ड
(४) वरील सर्व बाबी येतात.

| उत्तरे | १)२ | २)३ | ३)२ | ४)४ |
|---|---|---|---|---|

**स्पष्टीकरण :** 'राज्यसंस्था' या शब्दाचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने खूप व्यापकतेने लावला आहे. त्यामध्ये राज्यसंस्थेच्या अशा सर्व साधनांचा व अभिकरणाचा समावेश करण्यात आला आहे. ज्यांना मोठ्या प्रमाणात सरकारी वित्तीय सहाय्य मिळते, ज्यांवर सरकारी नियंत्रण आहे. जी सार्वजनिक कार्य पार पाडतात आणि ज्यांवर सरकारी कामे करण्याची जबाबदारी आहे. या आधारावर SBI, LIC, ONGC, SAIL, GAIL, यांसारखी महामंडळे सुध्दा राज्यसंस्था ठरतात.मात्र सहकारी संस्था, इउउख यांसारख्या संस्था राज्यसंस्था नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

**५) खालील विधानांपैकी अचूक नसणारी विधाने कोणती?**

अ) कलम १३(२) नुसार, राज्यसंस्था, भाग-३ मध्ये दिलेले हक्क काढून घेणारा किंवा त्यांचे संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि केल्यास तो शुन्यवत होईल.

ब) असा कायदा संसदेने/राज्यविधीमंडळाने केल्यास न्यायालयांना हा कायदा घटनाविरोधी व बाद ठरविण्याचा अधिकार प्राप्त आहे.

क) सर्वोच्च न्यायालयास असा अधिकार कलम ३२ अन्वये, तर उच्च न्यायालयांना असा अधिकार कलम २२६ अन्वये प्रदान करण्यात आला आहे.

**पर्यायी उत्तरे –**

(१) अ व ब फक्त (२)ब व क फक्त

(३) अ, ब व क तीनही (४)अ, ब व क तीनही नाही

**स्पष्टीकरण :** उपरोक्त तीनही विधाने बरोबर आहेत. म्हणून पर्याय क्रमांक चार बरोबर आहे. कलम १३ मध्ये न्यायीक पुनर्विलोकनाच्या तत्त्वज्ञानाची तरतुद देण्यात आली आहे. कलम १३(३) मध्ये 'कायदा' अंतर्गत येणाऱ्या सर्व बाबींना मूलभूत हक्कांचे उल्लंघन करत असेल तर न्यायालयात आव्हान देता येते. कलम १३(४)अन्वये मात्र कलम ३६८ अंतर्गत केलेल्या घटनादुरुस्ती कायद्याला आव्हान देता येणार नाही. मात्र केशवानंद भारती खटल्यामध्ये (१९७३) सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, मुलभूत हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या घटनादुरुस्ती कायद्यालाही न्यायालयात आव्हान देता येऊ शकेल.

**६) जोड्या लावा.**

| **हक्क** | **कलम** |
|---|---|
| १) शोषणाविरुद्धचा हक्क | अ) कलम २५ ते २८ |
| २) धर्मस्वातंत्र्याचा हक्क | ब) कलम २९ ते ३० |
| ३) सांस्कृतीक व शैक्षणिक हक्क | क) कलम २३ ते २४ |
| ४) संपत्तीचा हक्क | ड)कलम ३१ |

**पर्यायी उत्तरे :**

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| १) | अ | क | ब | ड |
| २) | क | अ | ड | ब |
| ३) | क | ब | अ | ड |
| ४) | क | अ | ब | ड |

**स्पष्टीकरण :** मुळ घटनेमध्ये मूलभूत हक्कांचे सात गट देण्यात आले होते.

| **हक्क** | **कलम** |
|---|---|
| १) समानतेचा हक्क | कलम १४ ते १८ |
| २) स्वातंत्र्याचा हक्क | कलम १९ ते २२ |
| ३) शोषणाविरुद्धचा हक्क | कलम २३ ते २४ |
| ४) धर्मस्वातंत्र्याचा हक्क | कलम २५ ते २८ |
| ५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क | कलम २९ ते ३० |
| ६) संपत्तीचा हक्क | कलम ३१ |
| ७) घटनात्मक उपायांचा हक्क | कलम ३२ |

संपत्तीचा हक्क ४४ व्या घटनादुरुस्तीने(१९७८) मूलभूत हक्कांच्या यादीतून वगळण्यात आला, आणि तो भाग १२ मधील प्रकरण ४ मधील कलम ३०० अ मध्ये टाकून एक कायदेशीर हक्क म्हणून घोषित करण्यात आला.

**७) जोड्या लावा.**

| **कलम** | **समानतेचा हक्क** |
|---|---|
| १) कलम १७ | अ) किताब नष्ट करणे |
| २) कलम १४ | ब) सार्वजनिक रोजगारांबाबत समान संधी |
| ३) कलम १६ | क) अस्पृश्यता नष्ट करणे |
| ४) कलम १८ | ड) कायद्यापुढे समानता |
| ५) कलम १५ | इ) धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई |

**पर्यायी उत्तरे :**

| | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| १) | क | ड | इ | अ | ब |
| २) | ब | क | ड | अ | इ |
| ३) | क | ड | ब | अ | इ |
| ४) | अ | क | ब | ड | इ |

**स्पष्टीकरण :** समानतेचा हक्क यामध्ये (कलम १४ ते १८ अशी एकूण ५ कलमे आहेत.)

| उत्तरे | ४)४ | ५)४ | ६)४ | ७)३ |
|---|---|---|---|---|

# ९ घटनादुरूस्ती

भगीरथ प्रकाशन, पुणे for UPSC & MPSC

**१) खालील विधानांचा विचार करा.**

अ) भारतीय घटनेच्या भाग ११ व कलम २६८ मध्ये संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकाराची तरतूद आहे.

ब) घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार विधानमंडळ तसेच संसदेला आहे.

**पर्यायी उत्तरे –**

(१) दोन्ही विधान अचूक

(२) दोन्ही विधान चूक

(३) विधान अ अचूक व विधान ब चूक

(४) विधान अ चूक व विधान ब अचूक

**स्पष्टीकरण :** घटनादुरुस्ती संबंधी घटनेत भाग ११ व ३६८ कलमात तरतूद असून घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे, विधानमंडळाला नाही.

**२) संसद घटनादुरुस्ती करताना घटनेच्या मुलभूत संरचनेत बदल करु शकत नाही. असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या खटल्यात दिला.**

(१) बेरूबारी खटला (२) चंद्रकुमार खटला

(३) केशवानंद भारती खटला (४) मनेका गांधी खटला

स्पष्टीकरण : केशवानंद भारती खटला (१९७३)

**३) सर्वोच्च न्यायालयाच्या विविध खटल्यांच्या आधारावर मूलभूत संरचना या व्याख्येत खालीलपैकी कशाचा समावेश होत नाही?**

१) घटनेची सर्वोच्चता

२) संसदीय शासन व्यवस्था

३) घटनेच्या प्रास्ताविकेत दिलेली उद्दीष्टे

४) सार्वभौम, लोकशाही व गणराज्य

५) धर्मनिरपेक्षता

६) व्यक्तीचे स्वातंत्र्य व आत्मसन्मान

७) कायद्याचे राज्य

८)अधिकारांच्या विभागणीचे तत्त्व

९) न्यायीक पुनर्विलोकन, कलम ३२,२२६,२२७

१०) संघराज्य

**पर्यायी उत्तरे –**

(१) वरील पैकी सर्वांचा समावेश होतो.

(२) क्र. ६ चा समावेश होत नाही.

(३) क्र. ७ चा समावेश होत नाही.

(४) यापैकी नाही

**४) खालील विधानांचा विचार करा.**

अ) घटनादुरुस्ती विधेयक फक्त मंत्रीद्वारा मांडता येतो.

इ) हे विधेयक मांडण्यापूर्वी राष्ट्रपतींची पूर्वसंमती घेणे आवश्यक आहे.

**योग्य पर्याय निवडा.**

(१) विधान अ सत्य

(२) विधान ब सत्य

(३) दोन्ही विधाने असत्य

(४) दोन्ही विधाने सत्य

**स्पष्टीकरण :** घटनादुरुस्ती विधेयक एखाद्या मंत्र्याद्वारे किंवा खाजगी सदस्याद्वारे मांडता येतो. हे विधेयक मांडण्यापूर्वी राष्ट्रपतींची पूर्वसंमतीची आवश्यकता नसते.

**५) घटनेच्या कलम १०८ नुसार संयुक्त बैठकीची तरतूद खालीलपैकी कोणत्या वेळी घेण्याची तरतूद आहे.**

(१) घटनादुरुस्ती विधेयक

(२) धन विधेयक

(३) साधारण विधेयक

(४) वरील अ व क परिस्थितीत

**स्पष्टीकरण :** कलम १०८ नुसार केवळ साधारण विधेयकासाठी संयुक्त बैठकीचे तरतूद आहे.

**६) खालील पैकी कोणत्या वेळी घटनादुरुस्ती करतांना निम्या राज्यांच्या संमतीची गरज असते?**

अ) राष्ट्रपतीची निवडणूक व त्याची पद्धत

इ) संघराज्य व घटकराज्यांच्या कार्यकारी शक्तीची व्याप्ती

उ) सर्वोच्च व उच्च न्यायालये

ऊ) सातव्या अनुसूचीतील कोणतीही सूची

ए) संसदेतील राज्यांचे प्रतिनिधित्व

ऋ) कलम ३६८मधील तरतूदी

**पर्यायी उत्तरे –**

(१) वरील पैकी सर्व (२) फक्त अ, इ, उ, ऊ

(३) फक्त अ, इ, उ (४) फक्त इ, उ, ऊ, ए, ऋ

| उत्तरे | १)२ | २)३ | ३)१ | ४)३ | ५)३ | ६)१ |
|---|---|---|---|---|---|---|

**स्पष्टीकरण :** वरीलपैकी सर्व संघराज्यीय तरतूदीमध्ये मोडतात व संघराज्यीय तरतूदीत बदल करण्यासाठी संसदेचे विशेष बहुमत व निम्या राज्यांच्या साध्या बहुमताने घटना दुरुस्ती केली जाते.

**७) संसदेच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती करण्यासाठी खालील पैकी कोणत्या सुधारणा/दुरुस्ती करता येते?**

अ) नवीन राज्यांची स्थापना ब) संसदेची गणसंख्या
क) संसदेत इंग्रजीचा वापर ड) नागरिकत्त्व

**पर्याय पर्याय :-**

(१) वरीलपैकी सर्व (२) फक्त ब
(३) फक्त अ (४) फक्त क व ड

**स्पष्टीकरण :** इतर बाबीसुद्धा येतात त्या खालील प्रमाणे-

(१) विधान परिषद निर्मिती व नष्ट करणे
(२) दुसरी अनुसुची बदल
(३) संसद सदस्य पगार / भत्ता
(४) संसद, तिचे सदस्य व समित्यांचे विशेषाधिकार
(५) सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांची संख्या
(६) सर्वोच्च न्यायालयास अतिरिक्त कार्यक्षेत्र बहाल करणे.
(७) कार्यालयीन भाषेचा वापर
(८) संसदेच्या व राज्य विधीमंडळांच्या निवडणूका
(९) मतदार संघांची परिसीमा
(१०) केंद्रशासीत प्रदेश
(११) ५ वी व ६ वी अनुसूची

**८) मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे इत्यादी मध्ये दुरुस्तीसाठी संसदेत खालीलपैकी कोणत्या बहुमताने घटनादुरुस्ती करावी लागेल.**

(१) साध्या बहुमताने (३) विशेष बहुमताने
(२) वरीष्ठ बहुमताने (४) अ व ब

**९) मूलभूत हक्कांसंबंधीत पुढे काही खटले दिलेले आहेत. त्या खटल्यांपैकी कोणता/ते खटले मुलभूत हक्कासंबंधी आहेत ते ओळखा.**

अ) शंकरी प्रसाद खटला (१९५१)
ब) गोलकनाथ खटला (१९६७)
क) केशवानंद भारती खटला (१९७३)
ऊ) मिनर्व्हा मील खटला (१९८०)
ए) वामन राव खटला (१९८१)

पर्यायी उत्तरे -

(१) वरीलपैकी सर्व (२) केवळ अ व ए
(३) केवळ अ, क व ऊ (४) केवळ ए, क, ऊ

**१०) घटनादुरुस्ती १०० वी (२०१५) कशाशी संबंधीत आहे?**

१) कर्नाटक राज्याचा विशेष अधिकार
२) भारत व बांग्लादेश यांच्या EnclaveS (गाव) यांच्या अदला-बदली संबंधीत.
३) NJACS संबंधीत
४) सांस्कृतीक भाषेत ओरिया भाषा समाविष्ट या संबंधीत

**११) घटनादुरुस्ती विधेयक पुढील बाबतीत बदल करणार असेल तर निम्म्या राज्यांची संमतीची गरज असते. चुकीचा पर्याय ओळखा.**

(१) कलम ५४ (२) कलम २४३
(३) कलम ५५ (४) कलम ७३

**स्पष्टीकरण :** घटनादुरूस्ती विधेयक पुढील बाबतीत बदल करणार असेल तर निम्या राज्याची संमतीची गरज असते.

* कलम ५४, कलम ५५, कलम ७३, कलम १६२ किंवा कलम २४१ किंवा
* भाग ५ मधील प्रकरण ४, भाग ६ मधील प्रकरण ५ किंवा भाग ११ मधील प्रकरण १ किंवा
* सातव्या अनुसूचीत असलेल्यांपैकी कोणतीही सूची किंवा
* राज्यांचे संसदेतील प्रतिनिधित्त्व किंवा
* कलम ३६८ मधील तरतुदी

**१२) पुढील विधानांचा विचार करा.**

अ) घटनादुरुस्ती विधेयक केवळ कनिष्ठ सभागृहातच मांडता येतो.
ब) सदर विधेयक मांडण्यासाठी राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीची आवश्यकता नाही.
क) हे विधेयक दोन्ही सभागृहांमध्ये विशेष बहुमताने संमत होणे गरजेचे आहे.
ड) मतभेद झाल्यास संयुक्त बैठकीची तरतूद आहे.

**उपरोक्त विधानांपैकी योग्य नसलेली विधान/ने ओळखा.**

(१) केवळ ब व क (२) केवळ अ, क व ड
(३) केवळ अ, ब व ड (४) केवळ अ व ड

**स्पष्टीकरण :** * घटनादुरुस्ती विधेयक दोन्हींपैकी कोणत्याही सभागृहात मांडता येते व नंतर दुसऱ्या सभागृहात मांडले जाते. * विधान ब बरोबर आहे. * विधान क बरोबर आहे. * मतभेद झाल्यास विधेयकावर चर्चा करण्यासाठी व ते पारित करण्यासाठी संयुक्त बैठकीची तरतूद करण्यात आलेली नाही. (कलम १०८ अंतर्गत संयुक्त बैठकीची तरतूद केवळ साधारण विधेयकासाठीच आहे.)

| उत्तरे | ७)१ | ८)२ | ९)१ | १०)२ | ११)२ | १२)४ |
|---|---|---|---|---|---|---|

# १० संघराज्य शासन व कार्यकारी मंडळ-राष्ट्रपती

भगीरथ प्रकाशन, पुणे for UPSC & MPSC

**१) योग्य जोड्या जुळवा.**

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ) कलम ५२ | १) भारताचा राष्ट्रपती |
| ब) कलम ५३ (१) | २) संघराज्याचा कार्यकारी अधिकारी |
| क) कलम ५३ (२) | ३) संघराज्याच्या संरक्षक दलाचे सरसेनापती |
| ड) कलम ५४ | ४) राष्ट्रपतीची निवडणुक |
| इ) कलम ५५ | ५) राष्ट्रपतीच्या निवडणुकीची |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड | |
|---|---|---|---|---|---|
| १) | १ | २ | ३ | ४ | ५ |
| २) | १ | ३ | २ | ४ | ५ |
| ३) | १ | ३ | २ | ५ | ४ |
| ४) | १ | २ | ३ | ५ | ४ |

**२) पुढील विधाने पाहा.**

अ) भारताच्या संघराज्याचा कार्यकारी अधिकार पंतप्रधानांकडे असते.

ब) राष्ट्रपती हे de jure executive आहेत.

क) पंतप्रधान हे de facto executive आहेत.

**वरीलपैकी चुकीचे विधान/ने ओळखा.**

१) फक्त अ व ब  २) फक्त अ

३) फक्त ब व क  ४) वरील तिन्ही अ, ब व क

**स्पष्टीकरण :** (१) कलम ५३ (१) : भारताच्या संघराज्याचा कार्यकारी अधिकार राष्ट्रपतीकडे असते. (२) विधान ब व क बरोबर आहेत.

**३) राष्ट्रपती निवडणुकीसाठी असणाऱ्या निर्वाचक गणात समावेश असणारी बाबीसंबंधीत चूकीचा पर्याय ओळखा.**

१) संसदेच्या दोन्ही सभागृहांचे निर्वाचित सदस्य.

२) दिल्ली व पुदुचेरी येथील विधानसभांचे सदस्य.

३) राज्यांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य.

४) वरीलपैकी एकही नाही.

**स्पष्टीकरण :** राष्ट्रपती : निर्वाचक गण

१) संसदेच्या दोन्ही सभागृहांचे निर्वाचित सदस्य.

२) राज्यांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य.

३) दिल्ली व पुदुचेरी या केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य.

**४) खालील विधाने अभ्यासा.**

अ) उपराष्ट्रपती यांच्या निर्वाचकगणात संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य भाग घेतात.

ब) राष्ट्रपतींच्या निवडणुकीत राज्यातील विधीनसभांचे निर्वाचित सदस्यांचा समावेश होतो.

क) राज्यपालांच्या निवडणुकीत राज्य विधीमंडळाचे निर्वाचित सदस्य भाग घेतात.

**वरीलपैकी अयोग्य विधान/ने ओळखा.**

१) फक्त अ व ब  २) फक्त ब व क

३) फक्त ब  ४) फक्त क

**स्पष्टीकरण :** (१) विधाने अ व ब योग्य आहेत. (२) राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपती करतात.

**५) राष्ट्रपतींच्या निवडणुकीत भाग न घेणारी ओळखा.**

अ) राज्यविधान सभांचे नामनिर्देशित सदस्य.

ब) विधान परिषदांचे निर्वाचित सदस्य.

क) पुदुचेरी येथील विधानसभांमधील नामनिर्देशित सदस्य.

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त अ  २) फक्त अ व ब

३) फक्त ब व क  ४) वरील सर्व

**स्पष्टीकरण :** पुढील व्यक्ती राष्ट्रपतींच्या निवडणुकीत भाग घेत नाहीत.

१. लोकसभा, राज्यसभा व राज्य विधानसभांचे नामनिर्देशित सदस्य.

२. राज्य विधीमंडळ द्विगृही असल्यास विधान परिषदांचे निर्वाचित तसेच नामनिर्देशित सदस्य.

३. दिल्ली व पुदुचेरी या केंद्रशाषित प्रदेशांचे विधानसभांमधील नामनिर्देशित सदस्य.

**६) पुढील विधाने पहा.**

अ) राष्ट्रपतींची निवडणुक 'एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्त्व पद्धती' या पद्धतीद्वारे खूले मतदान पद्धतीद्वारे घेतली जाते.

ब) उपराष्ट्रपतीची निवडणुक अप्रत्यक्षपणे, एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्त्व पद्धती, या पद्धतीद्वारे खूले मतदान पद्धतीद्वारे घेतली जाते.

| उत्तरे | १)१ | २)२ | ३)२ | ४)४ | ५)४ | ६)३ |
|---|---|---|---|---|---|---|

क) राज्यपालाची निवडणुक अप्रत्यक्षपणे केली जाते.
वरीलपैकी चूकीचे विधान/ने ओळखा.

१) फक्त क  २) फक्त क व ब
३) क, ब व अ  ४) फक्त क व अ

**स्पष्टीकरण :**

१) राष्ट्रपती तसेच उपराष्ट्रपती यांची निवडणुक अप्रत्यक्षपणे, एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशील प्रतिनिधित्व पद्धतीनुसार व गुप्त मतदान पद्धतीने होते. (खूले मतदान पद्धतीने नाही.)

२) राज्यपालाची नियुक्ती केली जाते.

**७) खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने निवडा.**

अ) राष्ट्रपतींच्या निवडणुकीसंबंधी निर्माण झालेल्या सर्व शंकांचा व तक्रारींचा निकाल केवळ सर्वोच्च न्यायालयात लावला जातो.

ब) उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीशी संबंधित सर्व शंकास्पद मुद्दे व विवाद यांची चौकशी व निर्णय आधी उच्च न्यायालय व नंतर सर्वोच्च न्यायालयाकडून करता येते.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ  २) फक्त ब
३) दोन्ही अ व ब  ४) दोन्ही नाही

**स्पष्टीकरण :**

१) विधान अ योग्य आहे.

२) उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीशी संबंधित सर्व शंकास्पद मुद्दे व विवाद यांची चौकशी व निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून करण्यात येते आणि त्याचा निर्णय अंतिम असतो.

**८) राष्ट्रपतीच्या निवडणूक विवादासंबंधित योग्य विधान/ने ओळखा.**

अ) निर्वाचकगण अपूर्ण होते या कारणावरून राष्ट्रपतीच्या निवडणूकीला आव्हान देता येते.

ब) राष्ट्रपतीची निवडणूक अवेध ठरल्यास त्याने त्याआधी केलेल्या सर्व कृती रद्द होतात.

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त अ  २) फक्त ब
३) अ व ब दोन्ही  ४) अ व ब दोन्ही नाही

**स्पष्टीकरण :** राष्ट्रपती निवडणूक विवाद :

१. निर्वाचकगण अपूर्ण होते या कारणावरून राष्ट्रपतीच्या निवडणूकीला आव्हान देता येत नाही.

२. सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतीची निवडणुक अवैध ठरविल्यास त्याने त्याआधी केलेल्या कृती रद्द होत नाहीत व पुढेही अंमलात राहतात.

**९) पुढील विधाने पहा.**

अ) राष्ट्रपती आपल्या पदाचा राजीनामा सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशाला संबोधून देऊ शकतात.

ब) उपराष्ट्रपती राष्ट्रपतींना संबोधून आपल्या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देऊ शकतात.

क) लोकसभेच्या अध्यक्षांना आपला राजीनामा उपराष्ट्रपतींना संबोधून द्यावा लागतो.

ड) राज्यसभेचे उपसभापती आपल्या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा सभापतींना संबोधून देऊ शकतात.

**वरीलपैकी अयोग्य विधान/ने ओळखा. :**

१) फक्त अ व क  २) फक्त ब व क
३) फक्त क व ड  ४) फक्त ब व ड

**स्पष्टीकरण :**

| पद | पदाचा राजीनामा | ज्याला दिला जातो |
|---|---|---|
| १. | राष्ट्रपती | उपराष्ट्रपती |
| २. | उपराष्ट्रपती | राष्ट्रपती |
| ३. | लोकसभेचे अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ४. | राज्यसभेचे उपसभापती | सभापती |

**१०) भारतात एखादा व्यक्ती राष्ट्रपती म्हणून किती वेळा पद धारण करू शकतो?**

१) फक्त दोनदा  २) फक्त पाच वेळा
३) कितीही वेळा  ३) वरीलपैकी एकही नाही

**स्पष्टीकरण :** राष्ट्रपतीपद धारण : (१) भारतात : कितीही वेळा (२) यू.एस.ए : केवळ दोनदा

**११) राष्ट्रपती पदासाठी आवेदनपत्र भरतांना उमेदवारांस किमान ......... मतदात्यांनी पाठिंबा व इतर ...... मतदात्यांनी अनुमोदन देणे गरजेचे असते.**

१) २५, २५  २) ५०, ५०
३) १००, १००  ४) ५०, १००

**स्पष्टीकरण :** टीप : अनामत रक्कम : १५,००० रु. रिझर्व्ह बँकेत. एकूण मतांच्या १/६ मते न मिळाल्यास ही रक्कम जप्त होते.

**१२) उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी अर्ज करतांना उमेदवाराच्या आवेदनपत्रास किमान ........ मतदात्यांनी पाठिंबा तर किमान .......... मतदात्यांनी अनुमोदन देणे गरजेचे असते.**

१) २०, २०  २) २५, २५
३) ३०, ३०  ४) ५०, ५०

**स्पष्टीकरण : टीप :** उपराष्ट्रपती पदाच्या प्रत्येक उमेदवारास रिझर्व्ह बँकेत रु. १५,००० इतकी अनामत रक्कम ठेवावी लागते.

| उत्तरे | ७)१ | ८)४ | ९)१ | १०)३ | ११)२ | १२)१ |
|---|---|---|---|---|---|---|

# १३ केंद्रीय मंत्रिमंडळ

१) **योग्य जोड्या जुळवा.**

| कलमे | तरतूद |
|---|---|
| अ) कलम ७४(२) | १) सल्ल्याची चौकशी न्यायालयात करता न येणे. |
| ब) कलम ७५(ए) | २) मंत्र्यांची लोकसभेतील एकूण सदस्यांच्या १५% पेक्षा जास्त नाही (पंतप्रधानासहित) |
| क) कलम ७५(२) | ३) राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत मंत्री पद धारण. |
| ड) कलम ७५(३) | ४) मंत्रिमंडळ लोकसभेस सामुदायिकपणे जबाबदार असेल. |
| इ) कलम ७५(४) | ५) मंत्र्यांची शपथ |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १) | १ | २ | ३ | ४ | ५ |
| २) | १ | २ | ३ | ५ | ४ |
| ३) | १ | २ | ४ | ३ | ५ |
| ४) | २ | १ | ३ | ४ | ५ |

**स्पष्टीकरण :–**

**घटनात्मक तरतुदी :–**

✲ कलम ७४ : राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्याकरिता मंत्रिमंडळ.

१. कलम ७४(१) : राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्त्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल व राष्ट्रपती आपली कार्ये पार पाडताना त्या सल्ल्यानुसार वागतील.

२. कलम ७४(२) : मंत्र्यांनी राष्ट्रपतींना दिलेल्या सल्ल्याची चौकशी कोणत्याही न्यायालयात करता येणार नाही.

✲ कलम ७५ : मंत्र्यांसंबधी अन्य तरतूदी.

✲ कलम ७५ (१E) : मंत्रींमंडळातील पंतप्रधानांसहित एकूण मंत्र्यांची संख्या लोकसभेतील एकूण सदस्यांचा १५% पेक्षा अधिक असणार नाही.

✲ कलम ७५ (१) : पंतप्रधान राष्ट्रपतींकडून नियुक्त केले जातील आणि इतर मंत्री राष्ट्रपतींकडून पंतप्रधानांच्या सल्ल्यावरून नियुक्त केले जातील.

✲ कलम ७५ (१B) : पक्षांतर बंदी मुळे अपात्र ठरलेल्या सदस्य मंत्री म्हणून सुद्धा अपात्र ठरतील.

✲ कलम ७५ (२) : राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत मंत्री आपली पदे धारण करतील.

✲ कलम ७५ (३) : मंत्रिमंडळ लोकसभेस सामुदायिकपणे जबाबदार असेल.

✲ कलम ७५ (४) : मंत्र्यांची शपथ

✲ कलम ७५ (६) : मंत्र्यांचे वेतन व भत्ते

२) **केंद्रीय मंत्रीमंडळात पंतप्रधानांसहित एकूण मंत्र्यांची संख्या लोकसभेतील एकूण सदस्यांच्या १५% पेक्षा अधिक असणार नाही, ही तरतूद कोणत्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये समाविष्ट करण्यात आली?**

१) ८९ वा घटनादुरुस्ती कायदा, २००३.

२) ९१ वा घटनादुरुस्ती कायदा, २००२.

३) ९ वा घटनादुरुस्ती कायदा, २००२.

४) ९१ वा घटनादुरुस्ती कायदा, २००३.

३) **घटनादुरुस्ती ४४वी (१९७८) संबंधित खरी तरतूद ओळखा.**

अ) राष्ट्रपतींना आपली कार्ये पार पाडतांना मंत्रिमंडळाने दिलेल्या सल्ल्यानुसारच वागावे लागेल.

ब) राष्ट्रपती मंत्रिमंडळाला अशा सल्ल्याचा फेरविचार करण्यास एकदा सांगू शकतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ  २) फक्त ब

३) दोन्हीही अ व ब  ४) दोन्हीही नाही

**स्पष्टीकरण :–**

१. घटनादुरुस्ती ४२वी (१९७६) राष्ट्रपतींना आपली कार्ये पार पाडतांना मंत्रिमंडलाने दिलेल्या सल्ल्यानुसारच वागावे लागेल.

२. घटनादुरुस्ती ४४वी (१९७८) राष्ट्रपती मंत्रिमंडळाला अशा सल्ल्याच्या फेरविचार करण्यास एकदा सांगू शकतात.

| उत्तरे | १)१ | २)४ | ३)२ |
|---|---|---|---|

**४) पुढील विधाने पाहा.**

अ) लोकसभा विसर्जित झाल्यानंतर राष्ट्रपतींना काळजीवाहू सरकारचा/मंत्रिमंडळाचा सल्ला मानने बंधनकारक नाही.

ब) घटनेमध्ये ज्याज्या ठिकाणी राष्ट्रपतींच्या मर्जीचा अर्थ वैयक्तिक मर्जी नसून मंत्रिमंडळाची मर्जी असा होतो.

**वरीलपैकी चूकीचे विधान/ने ओळखा.**

१) फक्त अ  २) फक्त ब
३) दोन्हीही अ व ब  ४) दोन्हीही नाही

**स्पष्टीकरण :** कलम ७४ च्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे निकाल :

१. १९७१ : लोकसभा विसर्जित झाल्यानंतरही राष्ट्रपतींना काळजीवाहू सरकारच्या/मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच वागावे लागेल.

२. १९७४ : घटनेमध्ये ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रपतींच्या मर्जीचा अर्थ वैयक्तिक मर्जी नसून मंत्रिमंडळाची मर्जी असा होतो.

**५) पुढील विधाने वाचा.**

अ) संसदेच्या एका सभागृहाचा सदस्य असलेल्या मंत्र्यास दुसऱ्या सभागृहात बोलण्याचा व कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असतो.

ब) तसेच तो सदस्य दोन्ही सभागृहाच्या मतदानात भाग घेऊ शकतो.

**वरीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.**

१) फक्त अ  २) फक्त ब
३) दोन्हीही अ व ब  ४) दोन्हीही नाही

**स्पष्टीकरण :**

१. विधान अ योग्य आहे.

२. असा सदस्य जो मंत्री आहे तो केवळ सदस्य असलेल्या सभागृहातच मतदानात भाग घेऊ शकतो.

**६) 'सर्व तऱ्हेच्या लोकांना निर्भयपणे व नि:स्पृहपणे, तसेच ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देणे' अशी बाब कोणाच्या शपथात समावेश आहे?**

अ) राष्ट्रपती  ब) उपराष्ट्रपती
क) पंतप्रधान  ड) केंद्रीय मंत्री
इ) न्यायधिश (SC/HC)  फ) मुख्यमंत्री
ग) राज्याचे मंत्री

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त क व ड  २) फक्त अ, ब व इ
३) फक्त क, ड, फ व ग  ४) फक्त फ व ग

**७) पुढील विधाने पाहा.**

अ) घटनेत उपपंतप्रधान या नावाने शपथेची तरतूद करण्यात आली आहे.

ब) आतापर्यंत सहा व्यक्तींना उपपंतप्रधान या पदावर स्थान मिळाले आहे.

क) पहिले उपपंतप्रधान वल्लभभाई पटेल होते.

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त अ व ब  २) फक्त ब व क
३) फक्त अ व क  ४) वरील सर्व

**स्पष्टीकरण :**

अ. घटनेत उपपंतप्रधान म्हणून अशी स्वतंत्र कोणतीही तरतूद नाही.

ब. १९९० मध्ये वरील कारणावरून पहिल्यांदा दे-वीलाल यांच्या शपथेसाठी आव्हान देण्यात आले.

क. पंतप्रधान (यादी) : ७

१) वल्लभभाई पटेल (१९४७-५०)
२) मोरारजी देसाई (१९६७-६९)
३) चरण सिंह (१९७७-७९)
४) जगजीवन राम (१९७७-७९)
५) यशवंतराव चव्हाण (१९७९-८०)
६) देवीलाल (१९८९-९१)
७) लालकृष्ण अडवाणी (२००२-०४)

**८) कोणत्या पंतप्रधानांच्या काळात दोन उपपंतप्रधान होते?**

१) इंदिरा गांधी  २) मोरारजी देसाई
३) चरण सिंह  ४) व्हि. पी. सिंग

स्पष्टीकरण : मोरारजी देसाई (पंतप्रधान) -- यावेळी
१. चरण सिंह (उपपंतप्रधान)
२. जगजीवन राम (उपपंतप्रधान)

**९) कोणत्या मंत्र्यांना मंत्रालयाचा/विभागाचा स्वतंत्र कार्यभार दिला जात नाही?**

१) कॅबिनेट मंत्री  २) राज्यमंत्री
३) उपमंत्री
४) उपमंत्री आणि राज्यमंत्री त्यांना परिस्थितीनुसार

**स्पष्टीकरण :**

१. कॅबिनेट मंत्री : मंत्रालयाचे मंत्री.

२. राज्यमंत्री : राज्यमंत्र्यांना मंत्रालयाचा/विभागाचा स्वतंत्र कार्यभार दिला जाऊ शकतो किंवा कॅबिनेट मंत्र्याला सहाय्यक म्हणून नेमले जाते.

३. उपमंत्री : यांना मंत्रालयाचा/विभागाचा स्वतंत्र कार्यभार दिला जात नाही.

| उत्तरे | ४)२ | ५)२ | ६)३ | ७)१ | ८)२ | ९)४ |
|---|---|---|---|---|---|---|

**४७) पुढील दिलेले विधान व त्यांचे कारण यांचा विचार करून योग्य पर्याय निवडा.**

**विधान (अ) :** युद्ध आणि शांतता यांविषयीचे सर्व निर्णय राष्ट्रपतींच्या आदेशानुसार ठरतात.

**कारण (र) :** राष्ट्रपती हे तिन्ही संरक्षण दलाचे सरसेनापती असतात.

पर्याय –

(१) अ व र बरोबर व र हे अ चे स्पष्टीकरण आहे.

(२) अ व र बरोबर पण अ चा र शी संबंध नाही

(३) अ चूक र बरोबर

(४) यांपैकी नाही.

**४८) पुढील दिलेले विधान व त्यांचे कारण यांचा विचार करून योग्य पर्याय निवडा.**

विधान (अ) : १९८६ मध्ये राष्ट्रपती झैलसिंग यांनी Indian Postal Office (Amendment) Bill विधेयकाबाबत पॉकेट व्हेटो वापरला.

कारण (र) : १९५४ मध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी PEP-SU Appropriation Bill या विधेयकास संमती रोखून ठेवली.

**पर्यायी उत्तरे –**

(१) अ व र बरोबर व र हे अ चे स्पष्टीकरण आहे.

(२) अ व र बरोबर पण र हे अ चे स्पष्टीकरण नाही.

(३) अ व र चुक

(४) अ बरोबर र चुक

**४९) पुढील विधानांचा विचार करा.**

अ) कुपर खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने अध्यादेश पुन्हा पुन्हा काढणे घटनाविरोधी असल्याचा निकाल दिला.

ब) डी.पी.वधवा खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला की राष्ट्रपतीचा अध्यादेश अयोग्य असल्याच्या कारणावरून त्याला न्यायालयात आव्हान देता येवू शकते.

क) अध्यादेशाद्वारे कर कायदा बदलता येतो तसेच घटनादुरुस्तीसाठी अध्यादेश काढता येत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(१) फक्त ब बरोबर (२) फक्त क बरोबर

(३) फक्त अ व ब बरोबर (४) तिन्ही बरोबर

**स्पष्टीकरण :** अ व ब मधील खटल्यांची नावे अदलाबदल केलेली आहेत.

**५०) पुढील विधाने विचारात घ्या.**

अ) राष्ट्रपतींना कलम ६१ अंतर्गत व राज्यपालांना कलम १७२ अंतर्गत क्षमादानाचा अधिकार आहे.

ब) राज्यपाल मृत्यूदंडाच्या शिक्षेस निलंबीत करु शकतो, सूट देवू शकतो, किंवा सौम्य करु शकतो.

क) राष्ट्रपतींच्या क्षमादानासाठी सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहे.

**अचुक विधाने कोणती?**

(१) अ व ब (२) ब व क

(३) अ व क (४) ब

**स्पष्टीकरण :** क्षमादानाचा अधिकार राष्ट्रपती – कलम ७२, राज्यपाल– कलम १६१

» राष्ट्रपतींचा क्षमादान हा स्वेच्छाधिकार नसून तो केंद्रिय कॅबिनेटच्या सल्ल्याने वापरावा लागतो.

» राष्ट्रपतींनी पूर्वीचा दयेचा अर्ज फेटाळला असल्यास दुसरा अर्ज करुन त्यास स्थगिती देता येणार नाही.

» या अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रपतींना सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे घालून देण्याची गरज नाही.

**५१) खालीलपैकी योग्य विधाने निवडा.**

अ) अध्यादेशाव्दारे राष्ट्रपती संसदीय कायद्यात बदल करु शकतात.

ब) इतर कायद्याप्रमाणे अध्यादेशही पुर्वलक्षी असू शकतो.

क) अध्यादेशाव्दारे कर कायदासुध्दा बदलवता येऊ शकतो. मात्र घटनादुरुस्तीसाठी अध्यादेश काढता येत नाही.

ड) सध्या अध्यादेशासाठी राष्ट्रपतींची खात्री न्यायप्रविष्ठ नाही.

**पर्यायी उत्तरे –**

(१) अ, ब, क (२) ब व क

(३) क व ड (४) सर्व अयोग्य

**स्पष्टीकरण :** राष्ट्रपतींचा अध्यादेश – कलम १२३

❊ कुपर खटला १९७० – सुप्रीम कोर्टाने राष्ट्रपतींची खात्री न्यायप्रविष्ट असल्याचे सांगितले.

❊ ३८ वी घटनादुरुस्ती १९७५–राष्ट्रपतींची खात्री अंतिम व निर्णायक असेल व ती न्यायीक पुर्नविलोकनाच्या अधिन नसल्याचे घोषित.

❊ ४४ वी घटनादुरुस्ती १९७८–३८ वी घटनादुरुस्ती मधील तरतूद रद्द करण्यात आली. म्हणजेच सध्या राष्ट्रपतींची खात्री न्यायप्रविष्ठ आहे.

| उत्तरे | ४७)१ | ४८)२ | ४९)२ | ५०)४ | ५१)१ |
|---|---|---|---|---|---|

**स्पष्टीकरण :**

१. महान्यायवादींना भारताच्या राज्यक्षेत्रातील सर्व न्यायालयांमध्ये सुनावणीचा/ऐकून घेतले जाण्याचा अधिकार आहे.

२. पर्याय २ योग्य आहे.

**८) भारताच्या महान्यायवादी संबंधी पुढील विधाने वाचा.**

अ) महान्यायवादी यांना संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये बोलण्याचा व कामकाजात भाग घेण्याचा अधिकार आहे.

ब) त्यांना संसदेच्या संयुक्त बैठकीमध्ये बोलण्याचा अधिकार ओ परंतु कामकाजात भाग घेऊ शकत नाही.

क) ते सदस्य असलेल्या संसदीय समितीमध्ये मतदान करण्याचा अधिकार आहे.

**असत्य विधान/ने ओळखा.**

१) फक्त अ व ब  २) फक्त ब व क

३) फक्त अ व क  ४) वरील सर्व

**स्पष्टीकरण :**

१. महान्यायवादी यांना संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये किंवा त्यांच्या संयुक्त बैठकीमध्ये आणि ते सदस्य असलेल्या संसदीय समितीमध्ये बोलण्याचा व कामकाजात भाग घेण्याचा अधिकार आहे.

२. मात्र त्यांना तेथे मतदानाचा अधिकार नाही.

**९) २६ जानेवारी, १९५० च्या अधिसूचनेद्वारे राष्ट्रपतींनी महान्यायवादींना न नेमून दिलेली कार्य ओळखा.**

१) विधिविषयक बाबींवर भारत सरकारला सल्ला.

२) उच्च न्यायालयात भारत सरकारच्या वतीने दाव्यात हजर राहणे.

३) कलम १४३ अंतर्गत राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे केलेल्या संदर्भाबाबत भारत सरकारचे प्रतिनिधित्त्व करणे.

४) सर्वोच्च न्यायालयात, ज्या दाव्यांमध्ये भारत सरकार संबंधित आहे, त्यांमध्ये भारत सरकारचा प्रतिनिधित्त्व करणे

**१०) महान्यायवादींना पुढीलपैकी काय प्राप्त होतो?**

१) पगार  २) भत्ते

३) पारिश्रामिक  ४) पगार व भत्ते

**११) राज्याच्या 'सर्वोच्च कायदा अधिकारी' या पदाची नेमणुक............ करतात.**

(१) राज्यपाल  (२) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश

(३)मुख्यमंत्री व त्याचे मंत्रीमंडळ  (४)महाधिवक्ता

**स्पष्टीकरण :** घटनेच्या कलम १६५ मध्ये 'महाधिवक्ता' या पदाची तरतूद करण्यात आली आहे. तोच राज्याचा सर्वोच्च कायदा अधिकारी असतो आणि त्याची नेमणुक राज्यपालामार्फत केली जाते.

**१२) 'महाधिवक्ता' बाबत अचूक विधाने कोणती?**

अ) त्याचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो.

ब) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणुक या पदी होते.

क) त्यांना विधानमंडळाच्या सदस्याप्रमाणे संरक्षण व विशेषाधिकार तसेच पगार व भत्ते मिळतात.

**पर्यायी उत्तरे –**

(१) अ व ब  (२) ब व क

(३) फक्त अ  (४) फक्त ब

**स्पष्टीकरण :** महाधिवक्ता पदाचा कालावधी घटनेत निश्चित केलेला नाही. तसेच त्यांना पदावरुन दूर करण्याची पध्दत घटनेत दिलेली नाही. त्यांना विधानमंडळाच्या सदस्याप्रमाणे संरक्षण व विशेषाधिकार मिळतात परंतु त्यांचे पगार व भत्ते निश्चित केलेले नाहीत.

**१३) पुढील विधाने विचारात घ्या.**

अ) 'भारताचा सर्वोच्च कायदा अधिकारी'म्हणून महान्यायवादी या पदाची तरतूद कलम ७६ मध्ये तर 'राज्याचा सर्वोच्च कायदा अधिकारी' म्हणून महाधिवक्ता या पदाची तरतूद कलम १४३ मध्ये करण्यात आली आहे.

ब) ते सरकारचे पुर्णकालीन वकील नाहीत व सरकारी सेवक नाहीत.

क) मात्र ते खाजगी वकीली करु शकत नाहीत.

पर्यायी उत्तरे –

(१) अ व ब बरोबर  (२) फक्त ब बरोबर

(३) फक्त क बरोबर  (४) सर्व चूक

**स्पष्टीकरण :** महान्यायवादी –कलम ७६,

– महाधिवक्ता– कलम १६५.

– महान्यायवादी व महाधिवक्त यांना खाजगी वकीली करण्यापासून प्रतिबंधीत करण्यात आले नाही.

| उत्तरे | ८)२ | ९)१ | १०)३ | ११)१ | १२)४ | १३)२ |
|---|---|---|---|---|---|---|

# १६ न्यायव्यवस्था

**१) भारतीय न्यायव्यवस्था ही ......**

अ) एकात्मक व्यवस्था आहे.

ब) संघराज्य न्यायव्यवस्थेची तरतूद भाग ५ मध्ये तर घटकराज्य उच्च न्यायालयांची तरतूद भाग ६ मध्ये करण्यात आली आहे.

क) भारतीय न्यायव्यवस्था ही यु.एस.ए.च्या न्यायव्यवस्थेप्रमाणे आहे.

**पर्यायी उत्तरे –**

(१) अ व ब (२) ब व क

(३) अ फक्त (४) अ व क

**स्पष्टीकरण :** भारतीय न्यायव्यवस्था ही एकेरी एकात्मक व्यवस्था आहे. म्हणजे भारतीय न्यायालयांद्वारे संघराज्यीय तसेच घटकराज्यीय असे दोन्ही प्रकारचे कायदे प्रशासित केले जाते. या उलट अमेरीकेत संघराज्यीय कायद्यांचे प्रशासन संघराज्यीय न्यायव्यवस्थेद्वारे तर घटकराज्यीय कायद्यांचे प्रशासन राज्यस्तरीय न्याय व्यवस्थेद्वारे होते.

**२) सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधिशांव्यतिरिक्त अन्य न्यायाधिशांची संख्या कोण निश्चित करते?**

(१) सरन्यायाधिश

(२) राष्ट्रपती

(३) सरन्यायाधिशाच्या सल्ल्याने राष्ट्रपती

(४) संसद

**३) सरन्यायाधीश वगळता इतर न्यायाधिशांची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती कोण करते ?**

(१) सरन्यायाधिशाची सहमती घेवून राष्ट्रपती

(२) न्यायिक नियुक्ती मंडळ

(३) संसद

(४) राष्ट्रपती सरन्यायाधिश, सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयातील इतर न्यायाधिशांशी सल्लाम सलत करुन करतात.

**४) पुढील विधाने विचारात घ्या.**

अ) २८ जानेवारी १९५० रोजी सर्वोच्च न्यायालय अस्तित्त्वात आले.

ब) १९३५ च्या कायद्यान्वये स्थापन झालेल्या Federal Court of India याचेच हे नवीन रुप आहे.

क) फेडरल कोर्ट ऑफ इंडियाचे कामकाज १ ऑक्टो. १९३७ पासून सुरु करण्यात आले.

**योग्य विधान कोणते ?**

(१) अ व ब (२) फक्त ब

(३) ब व क (४) वरीलपैकी सर्व

**५) पुढील विधानांचा विचार करा.**

अ) संसद सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारात फेरफार करु शकत नाही.

ब) सर्वोच्च न्यायालय हे घटनेचा रक्षणकर्ता म्हणून काम करते.

पर्यायी उत्तरे –

(१) अ व ब दोन्ही बरोबर असून ब हे अ चे स्पष्टीकरण आहे.

(२) दोन्ही चुक आहेत.

(३) ब बरोबर अ चूक

(४) अ बरोबर ब चूक

**६) खालीलपैकी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांसाठी पात्रता कोणत्या?**

अ) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी, आणि

ब) त्या व्यक्तीस एखाद्या उच्च न्यायालयात सलग किमान ५ वर्षे न्यायाधिश म्हणून काम करण्याचा अनुभव असावा. किंवा

क) त्या व्यक्तीस दोन किंवा अधिक उच्च न्यायालयात सलग किमान ५ वर्षे न्यायाधिश म्हणून काम करण्याचा अनुभव असावा, किंवा

ड) त्या व्यक्तीस एखाद्या उच्च न्यायालयात सलग किमान १५ वर्षे वकील म्हणून काम करण्याचा अनुभव असावा.

इ) राष्ट्रपतींच्या मते ती व्यक्ती निष्णात कायदेपंडीत असावी

**पर्यायी उत्तरे :–**

(१) अ, ब, ड, इ (२) इ, अ, ब

(३) ब, ड, क, इ (४) अ, ब, क, ड, इ

| उत्तरे | १)१ | २)४ | ३)४ | ४)४ | ५)३ | ६)२ |
|---|---|---|---|---|---|---|

**स्पष्टीकरण :** त्या व्यक्तीस दोन किंवा अधिक न्यायालयात अथवा एखाद्या उच्च न्यायालयात किमान १० वर्षे वकीली म्हणून काम करण्याचा अनुभव असावा ( या दहा वर्षामध्ये त्या व्यक्तीने वकील झाल्यानंतर झालेल्या जिल्हा न्यायाधिशाच्या पदावरून कनिष्ठ नसलेल्या न्यायिक अधिकारपदाचा कालावधी समाविष्ट करण्यात येतो.)

**७) योग्य नसलेले विधान/ने कोणते ?**

अ) न्यायाधिशाच्या (सर्वोच्च न्यायालय) पात्रतेत नागरिकत्त्वाची अट आहे.

ब) परंतु किमान वयाची अट नाही.

क) ते राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत पद धारण करतात.

**पर्यायी उत्तरे:–**

(१) अ, ब  (२) क

(३) ब  (४) ब व क

**स्पष्टीकरण :** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत पद धारण करतात.

**८) अयोग्य जोडी कोणती ?**

| **यादी क्र. १** | **यादी क्र. २** |
|---|---|
| अ) कलम १२९ | – निवृत्त न्यायाधिशांची नेमणुक |
| ब) कलम १२७ | – तदर्थ न्यायाधिशांची नेमणुक |
| क) कलम १२६ | – हंगामी न्यायाधिशांची नेमणुक |

**पर्यायी उत्तरे :–**

(१) ब  (२) अ

(३) अ, ब, क  (४) अ, ब

**स्पष्टीकरण :** कलम१२८ – निवृत्त न्यायाधिशांची नेमणुक कलम१२९ सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असेल

**९) कलम १२८ नुसार सर्वोच्च न्यायालयाच्या बैठकीत निवृत्त न्यायाधिशांच्या उपस्थितीबाबत तरतुदी आहेत. त्याप्रमाणे योग्य पर्याय निवडा.**

अ) भारताचे सरन्यायाधिश केव्हाही सर्वोच्च न्यायालयाच्या एखाद्या निवृत्त न्यायाधिशास सर्वोच्च न्यायालयात तात्पुरते काम करण्याची विनंती करु शकतात.

ब) मात्र त्यासाठी राष्ट्रपतीची पूर्वसंमती तसेच त्या व्यक्तीची पूर्वसंमती आवश्यक आहे.

क) त्यावेळी ती व्यक्ती सर्वोच्च न्यायालयाची सर्व अधिकार क्षेत्र व विशेषाधिकाराला पात्र असेल. मात्र एरव्ही ती व्यक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश असल्याचे ग्राह्य धरले जाणार नाही.

**पर्यायी उत्तरे :–**

(१) अ व ब  (२) एकही नाही

(३) अ, ब, क  (४) फक्त अ

**१०) पुढील विधानांचा अभ्यास करून अयोग्य विधान निवडा.**

अ) घटनेने सर्वोच्च न्यायालयासाठी कुठे कार्यस्थान असेल हे स्पष्ट केलेले नाही.

ब) घटनेने भारताच्या सरन्यायाधिशांना, राष्ट्रपतीच्या मान्यतेने, इतर ठिकाण किंवा ठिकाणे सर्वोच्च न्यायालयाचे कार्यस्थान म्हणून नेमण्याचा अधिकार प्रदान केला आहे.

क) न्यायालय सरन्यायाधिशांना किंवा राष्ट्रपतींना एखादे दुसरे ठिकाण सर्वोच्च न्यायालयाचे कार्यस्थान म्हणून नेमण्याचा आदेश देवू शकतात.

**पर्यायी उत्तरे –**

(१) अ, ब, क  (२) अ व ब

(३) अ, क  (४) ब व क

**स्पष्टीकरण :** कलम १३० नुसार सर्वोच्च न्यायालयाचे कार्यस्थान दिल्ली असेल.इतर ठिकाणी कार्यस्थान नेमण्याचा अधिकार ऐच्छिक असून अनिवार्य नाही. म्हणूनच कोणतेच न्यायालय कार्यस्थान हलवण्यासाठी आदेश देवू शकत नाही.

**११) सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यपद्धतीचे नियमन कोण करते ?**

(१) राष्ट्रपती

(२) नियमन समिती

(३) राष्ट्रपतीच्या सल्ल्याने सर्वोच्च न्यायालय

(४) घटनेने कार्यपद्धती स्पष्ट केली आहे.

**१२) खालीलपैकी चूकीचा/चे विधान/ने ओळखा.**

अ) १९७३ मध्ये एम.यु.बेग यांना इतर जेष्ठ नेत्यांना डावलून सरन्यायाधिश नेमण्यात आले.

ब) १९७७ मध्ये ए.एन.रे इतर जेष्ठ नेत्यांना डावलून सरन्यायाधिश म्हणून नेमण्यात आले.

क) दुसऱ्या न्यायाधिशांच्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने ‘‘भारताच्या सरन्यायाधिश पदावर केवळ जेष्ठतम न्यायाधिशाची नेमणुक करण्यात यावी.’’ असा निकाल दिला.

**पर्यायी उत्तरे :–**

(१) अ व ब  (२) ब व क

(३) अ व क  (४) अ, ब, क

**स्पष्टीकरण :** १९७३ – ए. एन. रे, व १९७७ – एम. यु. बेग हे इतर न्यायाधिशांना डावलून सरन्यायाधिश बनले.

| उत्तरे | ७)२ | ८)२ | ९)३ | १०)३ | ११)३ | १२)१ |
|---|---|---|---|---|---|---|

# १७ राज्यशासन कार्यकारी मंडळ व विधान मंडळ

**१) खालीलपैकी चूकीची विधाने कोणती?**

अ) एकाच व्यक्तीची दोन किंवा अधिक राज्यांकरीता राज्यपाल म्हणून नेमणूक करता येत नाही.

ब) राज्यपाल केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली काम करत नाही.

क) राज्यपालाच्या नेमणुकीसाठी आयरिश पद्धतीचा स्वीकार केला आहे.

ड) राज्यपालाचा मृत्यू झाल्यास उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाची नेमणूक हंगामी राज्यपाल म्हणून केली जाऊ शकते.

**पर्यायी उत्तरे :**

(१) अ व ब (२) अ, ब, क

(३) अ व क (४) अ, क, ड

**स्पष्टीकरण :** ७ व्या घटनादुरुस्ती, १९५६ नुसार एकाच व्यक्तीची नेमणूक दोन किंवा अधिक राज्याच्या राज्यपालपदी करु शकतो. राज्यपालाच्या नेमणुकीची पद्धत कॅनडाकडून घेतली आहे.

**२) घटनेत राज्यपाल पदासाठी कोणत्या अटी सांगितलेल्या आहेत.**

अ) तो भारताचा नागरिक असावा.

ब) त्याने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावी.

क) तो राज्याबाहेरील व्यक्ती असावा, जेणेकरुन तो स्थानिक राजकारणापासून विलग असेल.

ड) राज्यपालाची नेमणुक करताना राष्ट्रपतींनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा सल्ला घ्यावा.

पर्यायी उत्तरे -

(१) वरील सर्वच (२) अ,ब, व क

(३) अ, क, ड (४) अ व ब

**स्पष्टीकरण :** कलम १५७ मध्ये फक्त अ व ब या दोनच अटी आहेत. क व ड विधानांतील अटी या परंपरा/संकेत निर्माण झाले आहेत.

**३) पुढील विधाने विचारात घ्या.**

अ) राज्यपाल मध्यप्रदेश, छत्तीसगड, झारखंड व ओडीसा राज्यात एका आदिवासी कल्याण मंत्र्याची नेमणूक करतो.

ब) राज्यपाल राज्य निवडणूक आयुक्ताची व राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची व सदस्यांची नेमणुक करतो.

क) परंतु राज्य निवडणूक आयुक्त व राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचा अधिकार फक्त राष्ट्रपतींना असतो.

ड) राज्यपालाच्या मर्जीने महाधिवक्ता आपले पद धारण करतो.

**वरीलपैकी योग्य असलेले विधान / विधाने कोणती?**

(१) अ,ब, व ड (२) ब, क, ड

(३) ब व ड (४) वरीलपैकी सर्व योग्य

**स्पष्टीकरण :** कलम १६४ नुसार राज्यपाल छत्तीसगढ, झारखंड, मध्यप्रदेश व ओडिशा या राज्यांमध्ये आदीवासी कल्याण मंत्र्यांची नेमणूक करतात. राज्य निवडणूक आयुक्ताला उच्च न्यायालयाचा न्यायाधिशाप्रमाणे पदावरून दुर करता येते.

**४) पुढील विधाने विचारात घ्या.**

अ) राज्यपाल विधान परिषदेवर साहित्य, कला, विज्ञान व समाजसेवा व सहकार चळवळी या क्षेत्रातील विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेल्या १/६ सदस्यांना नामनिर्देशित करतो.

ब) राज्यपालाचे एखादे कार्य स्वेच्छाधिन आहे किंवा नाही याबाबत उच्च न्यायालयाच्या न्यायधिशाचा निर्णय अंतिम असेल.

क) घटनेनुसार स्वविवेकाधिन अधिकार - राष्ट्रपतीला नाही.

पर्यायी उत्तरे -

(१) अ व ब बरोबर (२) फक्त ब चूक

(३) फक्त क चूक (४) सर्व बरोबर

**५) राष्ट्रपतींना अध्यादेश काढताना कोणत्याही सूचनांची आवश्यकता नसते. मात्र काही परिस्थितीमध्ये राज्यपालाला राष्ट्रपतींची सूचना हवी असते. ती कोणती?**

अ) जर अध्यादेशासारखी तरतूदी असलेले एखादे विधेयक राज्य विधिमंडळात मांडण्यासाठी राष्ट्रपतीची पूर्वसंमती लागली असती तर

| उत्तरे | १)३ | २)४ | ३)१ | ४)२ | ५)४ |
|---|---|---|---|---|---|

ब) जर अशा विधेयकाला राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवणे गरजेचे आहे अशी खात्री राज्यपालाची झाली असती तर

क) राज्य विधिमंडळाचा एखादा कायदा राष्ट्रपतीची संमती मिळाली नाही म्हणून अवैध ठरण्याची शक्यता असेल तर

**पर्यायी उत्तरे –**

(१) अ व ब (२) ब व क

(३) फक्त अ ४) अ, ब, क

## ६) जोड्या लावा.

| **यादी क्र. १** | **यादी क्र. २** |
|---|---|
| अ) कलम १५६ | १) राज्याचे कार्यकारी अधिकार |
| ब)कलम १५४ | २) राज्यांचे राज्यपाल |
| क)कलम १५३ | ३) राज्यपालाची नियुक्ती |
| ड)कलम १५५ | ४) राज्यपालाच्या कार्यकारी अधिकाराचा विस्तार |
| | ५) राज्यपालाचा कार्यकाल |

| पर्यायी उत्तरे : | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | ४ | १ | ३ | २ |
| २) | ५ | १ | २ | ३ |
| ३) | ५ | ३ | २ | १ |
| ४) | ४ | ३ | १ | २ |

## ७) जोड्या जुळवा.

| **यादी क्र.१** | **यादी क्र.२** |
|---|---|
| अ) मध्य प्रदेश | १) कायदा व प्रशासन |
| ब) गुजरात | २) अनुसुचित क्षेत्राचा कारभार |
| क)नागालँड | ३) मागास क्षेत्राचा विकास |
| ड)आसाम | ४) आदीवासी कल्याण मंत्र्याची नेमणुक |
| | ५) डोंगराळ प्रदेशाच्या प्रशासनसंबंधी तरतूदी |

| पर्यायी उत्तरे : | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | ३ | ४ | २ | ५ |
| २) | २ | १ | ४ | ३ |
| ३) | ४ | ३ | १ | २ |
| ४) | ५ | ३ | २ | ४ |

## ८) जर विधानपरिषदेने धन विधेयकात काही दुरुस्त्या सुचवल्या तर

१) विधानसभा विधानपरिषदेच्या शिफारसींचा स्विकार करु शकते किंवा फेटाळून लावू शकते.

२) असे धनविधेयक विधानसभा पारीत करणार नाही.

३) विधानसभा विधानपरिषदेकडे हे विधेयक पुनर्विचारार्थ पाठवेल.

४) राज्यपाल धनविधेयक पास करण्याकरीता संयुक्त बैठक बोलावणार.

## ९) पुढील विधाने विचारात घ्या.

अ) राज्यविधान मंडळाचे विशेषाधिकार राज्यपालाला लागु होत नाहीत.

ब) मात्र संसदेचे विशेषाधिकार राष्ट्रपतीला लागु होतात.

क) सभागृहाच्या किंवा त्याच्या समित्यांच्या काम काजाची न्यायालयीन चौकशी होत नाही.

**वरीलपैकी अचूक विधाने कोणती ?**

(१) अ व ब (२)ब व क

(३) फक्त क (४)अ व क

**स्पष्टीकरण :** भारताचे राष्ट्रपती हे जरी संसदेचे अविभाज्य घटक असले तरी त्यांना संसदेचे विशेषाधिकार लागू होत नाही.

## १०) पुढील विधान अ आणि ब यांचा अभ्यास करून योग्य पर्याय निवडा.

**विधान (अ) –** विधान परिषदेचे अस्तित्व विधानसभेच्या इच्छेवर अवलंबून असते.

**विधान (ब) –** विधानसभेच्या शिफारशीनुसार संसदीय कायद्याद्वारे विधान परिषद नष्ट करता येते.

**पर्यायी उत्तरे :**

(१) विधान अ व विधान ब दोन्ही बरोबर

(२) अ व ब बरोबर व ब हे अ चे कारण

(३) अ बरोबर ब चूक

(४) अ व ब बरोबर पण ब हे अ चे कारण नाही.

## ११) पुढील विधानाचा विचार करा.

अ) सामान्य विधेयक पारित करण्याच्या बाबतीत अंतिम अधिकार विधानसभेचाच आहे.

ब) विधानपरिषद हे राज्यसभेप्रमाणेच परिक्षक सभागृह (revising body) आहे.

क) ते एक वेळकाढू सभागृह किंवा सल्लागार बॉडी म्हणून काम करते.

| उत्तरे | ६)२ | ७)३ | ८)१ | ९)४ | १०)२ | ११)१ |
|---|---|---|---|---|---|---|

# १८ केंद्र राज्य संबंध व आंतरराज्य संबंध

भगीरथ प्रकाशन, पुणे for UPSC & MPSC

**१) जोड्या जुळवा.**

| केंद्र/राज्य संबंध | घटनेत तरतूद/कोठे आढळतात |
|---|---|
| १)वित्तविषयक संबंध | अ)भाग ११ मधील कलम २४५ ते २५५ |
| २)कायदेविषयक संबंध | ब)भाग ११ मधील कलम २५६ ते २६३ |
| ३)प्रशासकीय संबंध | क)भाग १२ मधील कलम २६८ ते २९३ |

| पर्याय – | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| १) | ब | क | अ |
| २) | अ | क | ब |
| ३) | ब | अ | क |
| ४) | क | अ | ब |

**२) केंद्र व राज्यांच्या प्रादेशिक विस्तारासंबंधात खालील विधानांचा विचार करा आणि अचूक असलेले / ली विधान / ने निवडा.**

अ) संसद भारताच्या राज्यक्षेत्राच्या सर्व किंवा कोणत्याही भागासाठी कायदे करु शकते.

ब) राज्य विधीमंडळ राज्याच्या सर्व किंवा कोणत्याही भागांसाठी कायदे करु शकते.

क) संसद राज्य क्षेत्राबाहेरील कायदे करु शकत नाही.

ड) राज्य विधीमंडळाचे कायदे राज्याच्या बाहेर लागू होणार नाही.

**पर्यायी उत्तरे –**

(१) केवळ अ व ब

(२) केवळ ब, क व ड

(३) केवळ अ, ब व ड

(४) सर्व विधाने बरोबर आहेत.

**स्पष्टीकरण :** केवळ संसद राज्यक्षेत्राबाहेरील कायदे करु शकते. त्यामुळे संसदेचे कायदे भारतीय नागरीक व त्यांच्या संपत्तीला जगाच्या कोणत्याही भागात लागू असतील.

**३) घटनेने संसदेच्या प्रादेशिक कार्यक्षेत्रावर काही मर्यादा घातल्या आहेत. त्या संदर्भात खालील विधानांचा विचार करा.**

अ) राज्यपालास एखाद्या संसदीय कायदा राज्यातील अनुसूचित क्षेत्रास लागू होणार नाही किंवा बदल / अपवादांसहीत लागू होईल, असा निर्देश देण्याचा अधिकार आहे.

ब) राष्ट्रपती अंदमान व निकोबार बेटे, लक्षद्विप, दादरा व नगरहवेली आणि दमण व दिव या चार केंद्रशासित प्रदेशांच्या शांतता, प्रगती व सुशासनासाठी नियमने करु शकतात.

**योग्य विधानांचा पर्याय निवडा.**

(१) केवळ अ (२) केवळ ब

(३) अ व ब दोन्ही (४) दोन्हीही नाही.

**४) पुढील विधानांचा अभ्यास करून योग्य पर्याय निवडा.**

अ) आसामच्या राज्यपालास आसाममधील आदिवासी क्षेत्रांना (स्वायत्त जिल्हे) एखादा संसदीय कायदा लागू होणार नाही किंवा बदल /अपवादांसहीत लागू होईल, असा निर्देश देण्याचा अधिकार आहे.

ब) राष्ट्रपतीला मेघालय, त्रिपुरा व मिझोराम या राज्यांमधील आदिवासी क्षेत्रांना (स्वायत्त जिल्हे) एखादा संसदीय कायदा लागू होणार नाही किंवा बदल / अपवादांसहीत लागू होईल, असा निर्देश देण्याचा अधिकार आहे.

**वरीलपैकी अचूक नसलेली विधान / ने ओळखा.**

(१) केवळ अ (२) केवळ ब

(३) दोन्हीही (४) दोन्हीही नाही

**५) खालीलपैकी कोणता विषय संघसूचीत नाही ?**

(१) बँकींग (२) सार्वजनिक व्यवस्था

(३) संचार (४) लेखा परिक्षण

**६) खालीलपैकी कोणता विषय राज्यसूचीतील नाही ?**

(१) पोलीस

(२) सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता

(३) तुरुंग

(४) लेखा परिक्षण

**७) खालील कोणता/ कोणते विषय समवर्ती सूचित आहेत.**

(अ) कृषि (ब) तुरुंग

(क) फौजदारी कायदा (ड) वीज

| उत्तरे | १)४ | २)३ | ३)३ | ४)४ | ५)२ | ६)४ | ७)१ |
|---|---|---|---|---|---|---|---|

पर्यायी उत्तरे –

(१) केवळ क व ड (२)केवळ अ, क व ड

(३) केवळ अ, ब व क (४)चारही आहेत.

**स्पष्टीकरण :** सूचि –१) संघसूची (कायदे करण्याचा अधिकार केवळ संसदेस)

**पुर्वीचे विषय – ९७, सध्या विषय – १००,**

**नवीन विषय –** २ अ, ९२ अ, ९२ ब व ९२ क, रद्द विषय = ३३, महत्त्वाचे विषय– (मुळ घटनेत) संरक्षण, बँकिंग, परकीय चलन, कामकाज, अणू उर्जा, विमा, संचार, आंतरराज्यीय व्यापार, व वाणिज्य, जनगणना, लेखापरिक्षण इ.

सूची–२)राज्यसूची (सामान्य परिस्थितीत कायदे करण्याचा अधिकार राज्यास)

**पूर्वीचे विषय–६६, सध्या विषय–६१,**

विषय ११,१९,२०,२९ ते ३६ वगळण्यात आले.

**महत्त्वाचे विषय–** सार्वजनिक व्यवस्था, पोलीस, सार्व. आरोग्य व स्वच्छता,कृषि, तुरुंग, स्थानिक शासन, मत्स्य व्यवसाय, बाजारपेठा, सिनेमागृहे, जुगार इ.

**सूची–३)**समवर्ती सूची संसद व राज्य विधीमंडळे समवर्ती सूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करु शकतात.

पूर्वीचे विषय– ४७, सध्या विषय –५२,

विषय ११अ, १७अ, १७ ब २० अ, व ३३ अ समाविष्ट

**महत्त्वाचे विषय–** फौजदारी कायदा, नागरी कायदा, विवाह व घटस्फोट, लोकसंख्या नियंत्रण व कुटुंब नियोजन, वीज, कामगार कल्याण, आर्थिक व सामाजिक नियोजन, औषधे, वर्तमानपत्रे, पुस्तके व प्रिंटींग प्रेस, वजने व मापे इ.

**४) शेषाधिकार –** तीनही सूचीत ज्यांचा उल्लेख नाही अशा शेषाधिकारांवर कायदे करण्याचा अधिकार संसदेस आहे. यु.एस.ए. व ऑस्ट्रेलियाच्या घटनांमध्ये केवळ संघराज्य सरकारचे अधिकार देण्यात आले आहे आणि शेषाधिकार राज्यांकडे देण्यात आले आहेत. तर कॅनडाच्या घटनेत संघराज्यीय व प्रांतीक अशी दुहेरी यादी देण्यात आली आहे व शेषाधिकार केंद्राकडे आहेत.

**८) भारतीय घटनेतील विषयांची विभागणी खालीलपैकी कोणत्या कायद्यावर आधारित होती?**

(१) भारत शासन कायदा, १९३५

(२) मोर्ले – मिंटो कायदा, १९०९

(३) माँटेग्यु चेम्सफोर्ड कायदा, १९१९

(४) चार्टर्ड ॲक्ट, १८५३

**९) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) संघ व राज्य सुचीतील केलेल्या कायद्यामध्ये संघर्ष निर्माण झाल्यास केंद्रीय कायदा वरचढ असेल.

ब) समवर्ती सूचीतील विषयावरील केंद्र व राज्य कायद्यांत विसंगती / संघर्ष निर्माण झाल्यास नेहमी केंद्र कायदा वरचढ असेल.

**अयोग्य विधान/ने असलेला पर्याय निवडा.**

(१) केवळ अ (२) केवळ ब

(३) दोन्ही (४) दोन्हीही नाही.

**स्पष्टीकरण :** समवर्ती सूचीतील विषयासंबंधी राज्य कायदा जर राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवला असेल व राष्ट्रपतीने त्यास संमती दिलेलीअसेल तर त्या राज्यात राज्य कायदा वरचढ असेल. अर्थात त्या विषयावर संसद पुन्हा कायदा करु शकते, जेणेकरुन असा नवीन संसदीय कायदा राज्य कायद्याच्या वरचढ ठरेल.

**१०) पुढील असामान्य परिस्थितीत घटनेने संसदेस राज्य सूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा अधिकार दिलेला आहे. अयोग्य असलेला पर्याय निवडा.**

(१) लोकसभेच्या ठरावाद्वारे

(२) राष्ट्रीय आणिबाणी दरम्यान

(३) राज्यांमधील कराराद्वारे

(४) आंतरराष्ट्रीय करारांच्या अंमलबजावणी साठी

**स्पष्टीकरण :** खालील असामान्य स्थितीत कायदे करण्याचा अधिकार आहे.

(१) राज्यसभेच्या ठरावाद्वारे

(२) वरील पर्याय २, ३ व ४

(३) राष्ट्रपती राजवटी दरम्यान

**११) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) कलम २५८(१) नुसार राष्ट्रपती केंद्राचे कोणतेही कार्यकारी अधिकार राज्याकडे त्याच्या संमतीने सोपवू शकतो.

ब) कलम २५८ अ – राज्याचे राज्यपाल राज्याचे कोणतेही कार्यकारी अधिकार केंद्राकडे केंद्राच्या संमतीने सोपवू शकतो.

**वरीलपैकी बरोबर विधान/ने कोणते/ती?**

(१) दोन्हीही योग्य (२)केवळ अ योग्य

(३) दोन्हीही नाही (४)केवळ ब योग्य

| उत्तरे | ८)१ | ९)२ | १०)१ | ११)१ |
|---|---|---|---|---|

# २१ आणीबाणी तरतूदी

**१) खालीलपैकी अचूक असलेली विधान/ने कोणती?**

अ) आर्थिक आणिबाणीचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी महसूल विभागाची असते.

ब) आर्थिक आणिबाणी दरम्यान राज्याच्या सेवेतील केवळ वर्ग १, वर्ग २ च्या व्यक्तींच्या वेतनात घट करता येऊ शकते.

**पर्यायी उत्तरे –**

१) केवळ अ　　२) केवळ ब

३) अ, ब दोन्ही　　४) कोणतेही नाही

**स्पष्टीकरण– भारतीय राज्यघटना कलम ३६० – आर्थिक आणिबाणी** – आर्थिक आणिबाणी आजपर्यंत एकदाही लागू केली नाही. आर्थिक आणिबाणीचे व्यवस्थापन 'आर्थिक व्यवहार विभाग' करते. आर्थिक आणिबाणी दरम्यान राज्यसेवेतील कुठल्याही वर्गाच्या व्यक्तीच्या वेतनात घट करता येते.

---

**२)** अ) जर केंद्राने दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यास राज्य शासन असमर्थ ठरले तर राज्यात राष्ट्रपती राजवट घोषित करता येते.

ब) राष्ट्रपतींनी राष्ट्रपती राजवटीची घोषणा केल्याच्या तारखेपासून ३ महिन्याच्या आत संसदेकडून ठराव पारित करुन घेणे महत्त्वाचे/गरजेचे आहे. अथवा तिचा अमंल संपुष्टात येतो.

**योग्य विधान/ने कोणते/ती ओळखा.**

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त अ　　२) फक्त ब

३) अ, ब दोन्ही　　४) वरीलपैकी एकही नाही

**स्पष्टीकरण–** राष्ट्रपती राजवट – कलम ३५६ राज्यघटनेतील तरतुदी नुसार राज्यशासन काम करित नसल्यास, केंद्राचे निर्देश पालन करण्यात असमर्थ ठरल्यास लागू करतात राष्ट्रपती राजवट लागू केल्याच्या २ महिन्याच्या आत संसदेकडून ठराव पारित करणे गरजेचे.

---

**३)** अ) कलम ३५६ मध्ये राष्ट्रीय आणिबाणीची तरतूद करण्यात आली आहे.

ब) 'आणिबाणीची उद्घोषणा' संविधानातील कलम ३५२ शी संबंधीत आहे.

क) राष्ट्रीय आणिबाणी दोन स्वरुपाची असू शकते अंतर्गत आणिबाणी व बर्हिगत आणिबाणी

**योग्य विधान/ने कोणते/ती ओळखा.**

**पर्यायी उत्तरे –**

१) अ, ब　　२) ब, क

३) अ, क　　४) अ, ब, क

**स्पष्टीकरण–** आणिबाणीची उद्घोषणा – कलम ३५२, राष्ट्रीय आणिबाणी – कलम ३५२

अंतर्गत आणिबाणी – सशस्त्र उठावामुळे लावण्यात आलेली.

बहिर्गत आणिबाणी–युद्ध, बाह्य आक्रमण.

संविधानात राष्ट्रीय आणिबाणी असा उल्लेख नाही.

---

**४)** अ) संविधानातील भाग १७ मध्ये आणिबाणीविषयक तरतुदी देण्यात आल्या आहेत.

ब) संविधानातील कलम ३५२, ३५६, ३६० या आणिबाणी विषयक तरतुदीशी संबंधीत आहेत.

**योग्य विधान/ने कोणते /ती ओळखा.**

१) फक्त अ　　२) फक्त ब

३) अ, ब दोन्ही　　४) वरिलपैकी एकही नाही

**स्पष्टीकरण–** आणबाणीविषयक तरतुदी–भाग१८, कलम ३५२ ते कलम ३६०, कलम ३५२–राष्ट्रीय आणिबाणी, कलम ३५६–राष्ट्रपती राजवट, कलम ३६०–आर्थिक आणिबाणी, भाग–१७–संघराज्य राजभाषा.

---

**५)** अ) आर्थिक आणिबाणीचा अमल चालू राहण्यासाठी महत्तम कालावधी ३ वर्षाचा देण्यात आला आहे.

ब) आर्थिक आणिबाणीत राज्याला वित्तीय शिस्तीच्या तत्त्वांच्या पालनाचे निर्देष दिले जाऊ शकतात.

क) आर्थिक आणिबाणीची तरतूद घटनेच्या कलम ३६० मध्ये नमुद आहे.

**योग्य विधान/ने कोणते/ती ओळखा.**

१) फक्त क　　२) फक्त ब

३) अ, ब व क　　४) ब, क

| उत्तरे | १)४ | २)२ | ३)२ | ४)४ | ५)४ |
|---|---|---|---|---|---|

**स्पष्टीकरण– आर्थिक आणिबाणी (कलम ३६०),** अमंल चालू राहण्यासाठी महत्तम कालावधी देण्यात आलेला नाही. राष्ट्रपती राजवटीचा अमंल चालू राहण्याचा कालावधी ३ वर्षांसाठीच वाढविता येतो.

६) अ) कलम ३५२ नुसार आणिबाणींची उद्घोषणा केली जाते.

ब) सर्वप्रथम भारतात आणिबाणीची उद्घोषणा १९६२ मध्ये करण्यात आली.

**योग्य विधान/ने कोणते/ती ओळखा.**

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त अ　　२) फक्त ब

३) अ, ब दोन्ही　　४) वरिलपैकी एकही नाही

**स्पष्टीकरण– आणिबाणीची उद्घोषणा –** कलम ३५२ मध्ये, राष्ट्रीय आणिबाणी असेही याला म्हटले जाते. संविधानात राष्ट्रीय आणिबाणी असा उल्लेख नाही. राष्ट्रपती राष्ट्रीय आणिबाणी जाहिर करु शकतात. भारत चीन युद्ध १९६२ दरम्यान सर्वप्रथम कलम ३५२ लागू. युद्ध, बाह्यआक्रमण, सशस्त्र उठाव ही कारणे.

७) अ) कलम ३५६ नुसार राष्ट्रपती राजवटीसाठी शिफारस केली जाऊ शकते.

ब) कलम ३६५ नुसार राष्ट्रपती राजवटीची शिफारस केली जाऊ शकते.

क) घटनेचे कलम ३५२ ते ३६० हे आणिबाणीच्या तरतुदीशी संबंधीत आहे.

**अयोग्य विधान/ने कोणते/ती ओळखा.**

१) फक्त अ　　२) फक्त ब

३) अ, ब दोन्ही　　४) वरिलपैकी एकही नाही

**स्पष्टीकरण– कलम ३५६–** संविधानिक यंत्रणा कोलमडल्यास राष्ट्रपती राजवट लागू करणे. **कलम ३६५–**संघराज्याचे सुचना, अंमलबजावणी करण्यास कुचराई केल्यास कलम ३५२ ते ३६० (भाग १८) आणिबाणी तरतुदी.

**८) राष्ट्रपती राजवट प्रस्तावास दर ६ महिन्यांनी मुदतवाढ देण्याकरीता संसदेत खालीलपैकी कोणते बहुमत लागते?**

१) सभागृहाच्या उपस्थित मतदान करणाऱ्या सदस्याचे २/३ बहुमत

२) सभागृह सदस्याचे विशेष बहुमत (सदस्य संख्या)

३) साधे बहुमत

४) १ आणि २

**स्पष्टीकरण– राष्ट्रपती राजवट–** कलम ३५६ नुसार कारणे– संविधानिक यंत्रणा कोलमडणे, संघराज्याच्या सुचनांचे पालन करण्यात कुचराई करणे (कलम ३६५) राष्ट्रपती राजवट–६–६ महिन्याच्या टप्यात वाढवता येते. मुदतवाढ प्रस्तावास दोन्ही सभागृहांनी (संसदेच्या) साधे बहुमत आवश्यक असते.

**९) खालीलपैकी कोणत्या कलमानुसार अंतर्गत अशांतता या धोक्यापासून राज्याचे संरक्षण करणे हे संघराज्याचे कर्तव्य आहे.**

१) कलम ३६५　　२) कलम ३५६

३) कलम ३५५　　४) कलम ३५३

**स्पष्टीकरण–** कलम ३५५–परचक्र व अंतर्गत अशांतता यांपासून राज्याचे संरक्षण करणे, राज्यामधील शासन घटनात्मक तरतुदीनुसार चालविण्याची हमी देणे हे संघराज्याचे कर्तव्य. कलम ३५५ हा कलम ३५६ चा पाया ज्याने राष्ट्रपती राजवट लागू होते. कलम ३५३–effects of proclamation of emergency

**१०) खालीलपैकी कोणत्या कलमानुसार आर्थिक आणिबाणी घोषित केली जाते?**

१) कलम ३५२　　२) कलम ३५६

३) कलम ३६०　　४) कलम ३६५

**११) राष्ट्रीय आणीबाणी अंमल चालू ठेवणे अमान्य करणारा ठराव लोकसभेत पारित करणे ही घटनादुरुस्ती पुढीलपैकी कोणती?**

१) ४४ वी　　२) ४२ वी

३) ३८ वी　　४) २४ वी

**स्पष्टीकरण :**

* वरील तरतूद ४४व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे (१९७८) समाविष्ट करण्यात आली. असा ठराव पास झाल्यास राष्ट्रपतींवर आणीबाणीची घोषणा समाप्त करणे बंधनकारक असते. वरील तरतूद समाविष्ट करण्याच्या आधी, आणीबाणीची घोषणा समाप्त करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतींना होता. त्यामध्ये लोकसभेला कोणतीही भूमिका नव्हती .

**१२) राष्ट्रीय आणीबाणीविषयी पुढील विधाने पाहा.**

अ) या आणीबाणीचा अंमल सुरू ठेवण्याचा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहात तर समाप्त करण्याचा ठराव केवळ लोकसभेतच पारित करणे गरजेचे असते.

ब) या आणिबाणीचा अंमल सुरु ठेवण्याचा ठराव विशेष बहुमताने तर समाप्त करण्याचा ठराव केवळ साध्या बहुमताने पारित होणे गरजेचे असते.

| उत्तरे | ६)३ | ७)४ | ८)३ | ९)३ | १०)३ | ११)१ | १२)३ |
|---|---|---|---|---|---|---|---|

# २२ पंचायतराज

**१) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) जातक कथांमध्ये गावाचा कारभार राजा करत असे असा उल्लेख आढळतो.

ब) वैदिक कालात गावाचा कारभार सरपंच पाहात असे.

क) वैदिक काळात गावाच्या प्रमुखाला ग्रामीणी म्हणत असत.

ड) मनुस्मृती, नारदस्मृती या ग्रंथामध्ये ग्रामपंचायत चा उल्लेख सापडतो.

इ) रामायण, महाभारत ग्रंथामध्ये ग्रामसभा व ग्रामिणीचा उल्लेख सापडतो.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

(१) अ, ब, क, ड (२) ब, क, ड, इ

(३) क, ड, इ (४) अ, ड, क

**स्पष्टीकरण :** १)जातक कथांमध्ये गावाचा कारभार गाव करत असे असा उल्लेख आढळते.

२) वैदिक काळात गावाचा कारभार ग्रामसभा पाहात असे.

- कौटिल्यचे (चाणक्य) अर्थशास्त्रातही ग्रामपंचायत चा उल्लेख आढळतो.
- मौर्यकाळात ग्रामपंचायतीचा विकास झाला.
- मॅगेस्थनीसनेही आपल्या प्रवास वर्णनात ग्रामपंचायतीबाबत माहिती दिली आहे.
- कौटिल्याच्या काळात प्रत्येक खेडे हे स्वतंत्र गणराज्य होते. गावचा कारभार ग्रामपंचायत पाहत असे.

---

**२) लॉर्ड रिपन ने १८८२ साली स्थानिक स्वराज्य संस्थाबाबत एक मसुदा प्रसिद्ध केला. त्याबाबतीत खालील विधाने अभ्यासा.**

अ) जिल्ह्यात जिल्हा बोर्ड व तालुक्यात तालुका बोर्ड स्थापन करण्यात यावे.

ब) बोर्डाच्या सदस्याची निवड व्हाईसरॉय करेल.

क) जिल्हा बोर्ड अध्यक्षपद कलेक्टरकडे तर तालुका बोर्डाचे अध्यक्षपद हे उपविभागीय अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आले.

ड) मतदानाचा अधिकार वय २५ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांना होता.

**अयोग्य विधाने निवडा.**

(१) अ, क (२) ब, ड

(३) ब, क (४) अ, ड

**स्पष्टीकरण :** बोर्डाच्या सदस्याची निवड जनता करेल कारण जनतेला राजकीय प्रशिक्षण मिळावे हा हेतू.

✻ मतदानाचा अधिकार कर भरणाऱ्या नागरिकांना होता.

✻ दोन्ही बोर्डावरील निम्मे सदस्य सरकार नियुक्त व निम्मे सदस्य जनता करेल.

✻ प्रांताच्या शासनानी हस्तक्षेप करु नये अशी तरतूद त्यात होती.

---

**३) स्वातंत्र्यानंतर राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रत्येक खेड्यात ग्रामपंचायत स्थापन करण्याच्या दृष्टीने काँग्रेस पक्षाने एक समिती स्थापन केली. त्या समितीत पुढीलपैकी कोणते नेते होते ?**

अ) मौलाना आझाद ब) बाबु जगजीवनराम

क) वसंतराव नाईक ड) पी. बी. काळे

इ) पं. मदन मोहन मालवीय ई) केशव मालवीय

उ) गुलझारीलाल नंदा

**पर्यायी उत्तरे :**

(१) अ, ब, ड, ई केवळ (२) ब, ड, इ, ई, उ केवळ

(३) ब, ई, उ केवळ (४) अ, ड, इ, उ केवळ

**स्पष्टीकरण :** या समितीने पुढील शिफारसी केल्या.

- पंचायतराज व्यवस्थेला प्रोत्साहन द्यावे.
- ग्रामपंचायतद्वारे सत्ता व आर्थिक विकेंद्रीकरण करावे.
- ग्रामीण भागातील नेतृत्वाने पुढे यावे अशा पद्धतीने ग्रामपंचायतीचा विकास करावा.
- पक्षीय राजकारणापासून दूर ठेवावे
- प्रौढ मतदान पद्धतीद्वारे ग्रामपंचायत सदस्यांची निवड करावी.
- करवसुलीतील वाटा ग्रामपंचायतींना द्यावा.

---

**४) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) जून १९५४ मध्ये सिमला येथे एक परिषद आयोजन केली होती.

ब) ह्या परिषदेने परिषद ग्रामपंचायतीबाबत काही शिफारशी केल्या.

| उत्तरे | १)३ | २)२ | ३)३ | ४)३ |
|---|---|---|---|---|

क) ही परिषद अयशस्वी झाली कारण शिफारशी मान्य झाल्या नाहीत.

ड) त्यावेळेस केंद्रीय आरोग्य मंत्री, डॉ.अब्दुल कलाम आझाद होते.

**वरीलपैकी योग्य विधाने कोणती?**

(१) अ, ब, क (२) अ, ड
(३) ब, अ (४) क, ड

**स्पष्टीकरण :** ही परिषद यशस्वी झाली. त्यावेळी केंद्रीय आरोग्य मंत्री श्रीमती कौर या होत्या व त्यांनीच या परिषदेचे आयोजन केले होते.या परिषदेने खालील शिफारशी केल्या.

१) ग्रामपंचायत क्षेत्र मर्यादित असावे.
२) गावाच्या विकासाची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे सोपवावी.
३) त्यांना शासनाने अनुदान द्यावे.
४) ग्रामपंचायतीत सर्व जनतेस प्रतिनिधीत्त्व द्यावे.
५) गावची बैठक बोलावून त्यात ग्रामपंचायतीचा अर्थसंकल्प व कार्यक्रमांना मंजूरी द्यावी.

---

**५) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) गावातून गोळा केलेल्या जमीन महसूलातील ७०% वाटा ग्रामपंचायतीला मिळतो.

ब) ग्रामपंचायतीच्या मूळ कायद्यात ग्रामसभेची तरतूद नव्हती.

क) ग्रामसभेच्या वर्षातून ४ वेळा ग्रामसभा घेण्याचे बंधन आहे.

**अयोग्य विधाने ओळखा.**

(१) अ, ब (२) ब, क
(३) केवळ अ (४) केवळ ब

**स्पष्टीकरण :** गावातून गोळा केलेल्या जमीन महसूलातील ३०% वाटा ग्रामपंचायतीला मिळतो. ग्रामपंचायतीच्या मूळ कायद्यात ग्रामसभेची तरतूद होती. सध्या ४ ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. आधी ६ सभा होत्या. २०१२ मध्ये कायद्यात सुधारणा करुन ४ ग्रामसभा घेणे बंधनकारक केले. ग्रामसभा आमंत्रित करण्याचे बंधन सरपंचावर असते.

---

**६) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) किमान ३ लाख लोकसंख्या असलेल्या शहरासाठी महानगरपालिका स्थापन केली जाते.

ब) महानगरपालिका स्थापनेसंबंधी अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो.

क) महानगरपालिकाचे लोकसंख्येच्या आधारावर ३ गटात विभाजन केले जाते.

ड) महानगरपालिकेत किमान ६५ व कमाल २२१ सदस्य असतात.

**वरीलपैकी योग्य विधाने निवडा.**

(१) अ, ब, क (२) अ, ब, ड
(३) ब, क, ड (४) वरील सर्व

**स्पष्टीकरण :** महानगरपालिकेचे लोकसंख्येच्या आधारावर ४ गटात विभाजन केले जाते व त्यांचा दर्जा ठरविला जातो.

---

**७) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) महापौर हा शहराचा प्रथम नागरिक असतो

ब) महापौर या पदाची मुदत ५ वर्षांची असते.

क) उपमहापौराचा कार्यकाल अडीच वर्षांचा असतो.

ड) आरक्षणाचे सर्व नियम उपमहापौरास लागू पडत नाही.

**योग्य विधाने निवडा.**

(१) अ, ब (२) अ, क
(३) अ, ड (४) अ, ब, क

**स्पष्टीकरण :** *महापौर या पदाची मुदत अडीच (२.५) वर्षे असते.

– उपमहापौर २.५ वर्षे. उपमहापौर, महापौराच्या अनुपस्थितीत त्याची सर्व कामे पार पाडतो.

– आरक्षणाचे सर्वनियम उपमहापौरास लागू पडतात. सर्वसाधारणपणे सभेचे सदस्य आपल्यामधून एकाची निवड उपमहापौर म्हणून करतात.

---

**८) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) केवळ लष्करी छावणी नसलेल्या आणि तेथेच नागरी लोकसंख्याही असलेल्या भागांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटक मंडळाची निर्मिती केली जाते.

ब) कटक मंडळाची स्थापना व त्यांचे प्रशासन कॅन्टोन्मेंट बोर्डस ॲक्ट १९३४ नुसार करण्यात येते.

क) भारतात ६७ कटक मंडळे आहेत व महाराष्ट्रात ७ कटक मंडळे आहेत.

**योग्य विधाने निवडा.**

(१) अ, ब (२) ब, क
(३)अ, क (४) वरीलपैकी एकही पर्याय योग्य नाही.

**स्पष्टीकरण :** लष्कराची छावणी असलेल्या व तेथेच नागरी लोकसंख्याही असलेल्या भागांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटक मंडळाची निर्मिती केली जाते. कॅन्टॉन्मेंट बोर्डस ॲक्ट १९२४. भारतात ६२ कटक मंडळे आहेत आणि महाराष्ट्रात ७ कटक मंडळे. अहमदनगर, औरंगाबाद, कामठी, खडकी, देवळाली, देहुरोड, पुणे.

---

| उत्तरे | ५)१ | ६)२ | ७)२ | ८)४ |
|---|---|---|---|---|

**स्पष्टीकरण :** १) जिल्हापरिषद समिती अधिनियमातील कलम ५० नुसार कर्तव्य बजावण्यात असमर्थ ठरत असल्यास गैरवर्तणुक कर्तव्यात कुचराईपणा दाखविल्यास राज्य शासन अध्यक्ष व उपाध्यक्षाला दूर करु शकते.
२) अध्यक्षपद हे राखीव असते. ५०% आरक्षण महिलांसाठी आहे

**२५) जिल्हापरिषद स्थायी समिती विषयी पुढील विधाने पहा.**

अ) जिल्हा परिषद उपाध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिध्द सभापती असतो.

ब) स्थायी समिती ही जिल्हा परिषदेची सर्वात शक्तीशाली अशी समिती असते.

क) या समितीत जिल्हा परिषदेच्या १२ सदस्यांचा समावेश असतो.

ड) स्थायी समितीत दोन सदस्य हे अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील असतात.

**अयोग्य विधाने ओळखा.**

(१) अ, ब, केवळ (२) अ, क केवळ
(३) ब, ड केवळ (४) वरील कोणतेही नाही

**स्पष्टीकरण :** जिल्हापरिषद अध्यक्ष स्थायी समिती सभापती असतो.स्थायी समितीत जिल्हा परिषद अध्यक्ष विषय समिती सभापती व जिल्हा परिषदेचे आठ सदस्य असतात. आठ सदस्यांपैकी दोन सदस्य अनुसूचीत जाती जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील असतात.

✻ स्थायी समितीकडे एक अध्यक्ष व १३ सदस्य असतात. पैकी ५ सदस्य स्थायी समितीची सभापती तर ८ सदस्य जिल्हा परिषदेचे असतात.

**२६) जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम कलम १३० नुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा निधीची तरतूद करण्यात आली आहे. पुढीलपैकी कोणत्या बाबी जिल्हा निधी अंतर्गत येतात?**

(अ) रस्ते व पूल यावरील पथकर
(ब) खाजगी व्यक्तीने दिलेले अंशदान
(क) जिल्हा परिषदेकडे असणाऱ्या रोख्यावरील व्याज
(ड) कोणतेही काम पार पाडण्यासाठी राज्यशासनाने दिलेल्या रकमा.

**पर्यायी उत्तरे :**

(१) अ, ब, क केवळ (२) ब,क,ड केवळ
(३) अ, क, ड केवळ (४) वरील सर्व

**स्पष्टीकरण :** वरील सर्व बाबी जिल्हा निधी अंतर्गत येतात. या निधित पुढील बाबी सुध्दा येतात. तत्कालीन जिल्हा मंडळाच्या स्थानिक निधीत असलेली शिल्लक रक्कम, उपकरापासून मिळणारे उत्पन्न, व्यवसाय व व्यापार व नोकऱ्यांवरील कराच्या वसुलीपोटी ग्रामपंचायतीस द्यावयाची रक्कम वजा जाता शिल्लक राहिलेली रक्कम, जिल्हा परिषदेकडे असणाऱ्या मालमत्तेपासून मिळणारे भाडे व नफा.

**२७) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) जिल्हा परिषद अध्यक्षास व उपाध्यक्षांस पगार राज्य शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयाक्डून मिळतो.

ब) जिल्हा निधी खर्च करण्यासाठी उपजिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते.

**योग्य विधाने निवडा.**

(१) अ योग्य (२) ब योग्य
(३) अ,ब दोन्ही योग्य (४) अ,ब दोन्ही अयोग्य

**स्पष्टीकरण :** जिल्हा परिषद अध्यक्षास व उपाध्यक्षांना मानधन दिले जाते पगार नाही. हे मानधन जिल्हा निधीतून दिले जाते.
✻ जिल्हा निधी खर्च करण्यासाठी जिल्हा निधी प्राधिकाराखाली खर्च केला जातो. क्षेत्राबाहेर खर्च करण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते.

**२८) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) जिल्हा परिषदेच्या वित्त व लेखा विभागाकडून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व खात्यांचे लेखापरिक्षण दर ३ महिन्याला केले जाते.

ब) जिल्हा परिषद अगर पंचायत समिती हिशेब तपासण्याचा अधिकार कलम १४३-अ नुसार महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आला आहे.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

(१) अ केवळ (२) ब केवळ
(३)अ, ब दोन्ही नाही (४) अ,ब दोन्ही योग्य

**स्पष्टीकरण :** जिल्हापरिषदेच्या व लेखा विभागाकडून जिल्हा परिषद व पं.स. च्या सर्व खात्याचे लेखापरिक्षण वर्षातून दोनदा होते.
✻ स्थानिक निधी, लेखाकडून जिल्हा परिषद व पं. समितीचे वर्षातून एकदा लेखापरिक्षण होणे बंधनकारक आहे.
✻ जिल्हा परिषद व पं.स हिशेब तपासण्याचा अधिकार कलम १४२-अ नुसार महालेखापाल महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले आहे.

**२९) पुढील समितीपैकी कोणत्या समितीची सदस्य संख्या ८ आहे?**

अ) शिक्षण समिती ब) वित्त समिती
क) बांधकाम समिती ड) आरोग्य समिती

| उत्तरे | २५)२ | २६)४ | २७)४ | २८)३ | २९)४ |
|---|---|---|---|---|---|

इ) महिला व बालकल्याण समिती

ई) पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती

**वरील सर्व समित्या या जिल्हा परिषदेच्या समित्या आहेत.**

**पर्यायी उत्तरे :**

(१) अ,क,इ,ई,ब (२) अ,ड,ब,ई,क

(३) ब,क,ड,ई,क (४) वरील सर्व

**स्पष्टीकरण :** वरील सर्व समितीत ८ सदस्य असतात.

✻ समाजकल्याण समितीत ११ सदस्य असतात.

**३०) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) जिल्हा परिषद कृषी समितीत जिल्हा परिषद सदस्यांनी त्यांच्यातून निवडलेल्या दहा सदस्यांचा समावेश असतो.

ब) जिल्हा कृषी अधिकारी हा कृषी समितीचा पदसिध्द सचिव असतो.

**पर्यायी उत्तरे :**

(१) अ योग्य ब अयोग्य (२) ब योग्य अ अयोग्य

(३) दोन्ही योग्य (४) दोन्ही अयोग्य

**३१) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) महापालिका कामाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी प्रभाग समितीची स्थापना करण्यात आली आहे.

ब) ७३ व्या घटनादुरुस्तीत याबाबत उल्लेख आहे.

क) प्रभाग समितीत किती प्रभाग घ्यायचे याची संख्या महापालिका निश्चित करते.

ड) प्रभाग समितीत केवळ त्या प्रभागात निवडलेले नगरसेवक असतात.

**योग्य विधाने ओळखा.**

(१) अ, ब, क (२)ब, क, ड

(३) अ, ड (४)अ, क

**स्पष्टीकरण :** ७४ व्या घटनादुरुस्तीत याबाबत उल्लेख आहे.

✻ प्रभाग समितीत त्या प्रभागात असलेले नगरसेवक तसेच स्वीकृत सदस्य ही असतात.

✻ सामाजिक संस्थांना प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने स्वीकृत सदस्यांची निवड करतात.

✻ एका प्रभाग समितीवर जास्तीत जास्त तीन सदस्य स्वीकृत करता येतात.

✻ प्रभाग समिती कार्यकाल पाच वर्षांचा असतो.

**३२) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) सरपंच समितीत प्रत्येक पंचायत समितीमध्ये कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतीतील २० सरपंच अथवा एकूण सरपंचाच्या १/३, यापैकी जास्त संख्या असलेल्या सरपंचाचा समावेश होतो.

ब) सरपंच समितीचा सभापती हा पंचायत समितीचा उपसभापती नसतो.

क) सरपंच समिती कार्यकाल ५ वर्षे असते.

ड) सरपंच समितीची पदसिद्ध सचिव बी.डी.ओ. असतो.

**वरीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.**

१) अ, ब २) ब, क

३) क, ड ४) वरील सर्व अयोग्य

**स्पष्टीकरण :** ✻ सरपंच समितीत १५ सदस्य असतात.

✻ पंचायत समितीचा उपसभापती हा सरपंच समितीचा अध्यक्ष असतो. ✻ कार्यकाल १ वर्षे

✻ पदसिद्ध सचिव विस्तार अधिकारी (पंचायत) असतो.

**३३) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) आसाम राज्यात जिल्हा परिषदेस जिल्हा विकास परिषद असे मानतात.

ब) तामीळनाडू राज्यात जिल्हा परिषदेस महासभा असे म्हणतात.

क) कर्नाटक राज्यात जिल्हा परिषदेस जिल्हा विकास परिषद असे म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(१) अ, ब योग्य, क अयोग्य

(२) ब योग्य, अ,क अयोग्य

(३) क योग्य, ब, अ अयोग्य

(४) वरील सर्व योग्य

**स्पष्टीकरण :**

१) आसाम – महासभा

२) तामिळनाडू – जिल्हा विकास परिषद

**३४) गटविकास अधिकारी (बी.डी.ओ.) बाबतीत खालील विधाने पाहा.**

अ) बी.डी.ओ. वर जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण असते.

ब) बी.डी.ओ.पंचायत समितीचा मुख्य कार्यकारी प्रमुख या नात्याने सर्व कार्यभार पाहतो.

क) बी.डी.ओ. हा बैठकीच्या वेळी चर्चेत भाग घेतो व समान मते झाल्यास आपला निर्णायक मत देतो.

**पर्यायी उत्तरे :**

(१) अ, ब अयोग्य, क योग्य

(२) ब, क, अयोग्य, अ योग्य

| उत्तरे | ३०)३ | ३१)४ | ३२)४ | ३३)३ | ३४)३ |
|---|---|---|---|---|---|

# २३ शहरी स्थानिक स्वराज्य संस्था

भगीरथ प्रकाशन, पुणे for UPSC & MPSC

**१) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) शहरी भागाचे परिसीमन राज्य सरकारकडून केले जाते.

ब) शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार क्षेत्र शहरी व ग्रामीण भागापुरते मर्यादित असते.

क) भारतात सर्वप्रथम १८७७-७८ मध्ये मद्रास येथे पहिली नगरपालिका परिषद स्थापन झाली.

**वरील विधानांपैकी अयोग्य विधाने निवडा.**

(१) ब, क (२) अ, क

(३) केवळ ब (४) केवळ क

**स्पष्टीकरण :** ✻ शहरी भागातील लोकांनी स्वत:च्या लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून चालविलेल्या प्रशासनाला Urban Local Government असे म्हणतात.

✻ शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारक्षेत्र शहरी भागापुरतेच मर्यादित असते.

✻ भारतात सर्वप्रथम १६८७-८८ मध्ये मद्रास येथे पहिली नगरपालिका परिषद झाली त्यानंतर १७२६ मध्ये बॉम्बे व कलकत्ता येथे नगरपालिका परिषदा स्थापन झाल्या.

**२) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) ७४ वा घटनादुरुस्ती कायदा १९९२ या वर्षीचा आहे.

ब) या कायद्यान्वये नवीन भाग ११अ समाविष्ट करण्यात आला.

क) त्या कायद्यामुळे कलम २४३ पी ते २४३ झेड समाविष्ट करण्यात आले.

ड) या कायद्यान्वये घटनेत १२ वी अनुसूची सुद्धा समाविष्ट करण्यात आली.

**वरीलपैकी योग्य विधाने कोणती?**

(१) अ, क, ब (२) अ, ड

(३) ब, क, ड (४) ब, अ

**स्पष्टीकरण :** ✻ ७४ वा घ.दु.कायदा १९९२ चा आहे.

✻ जून १९९३ पासून अंमलात आला.

✻ या कायद्यामुळे कलम २४३ पी ते २४३ झेड जी समावेश या कायद्यान्वये नवीन ९ अ भाग समाविष्ट

✻ या कायद्यान्वये १२ वी अनूसूची समाविष्ट केली नगरपालिकासाठी १८ कार्यात्मक विषयांचा समावेश आहे.

**३) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) ७४ व्या घ.दु. कायद्यामुळे प्रत्येक राज्यात २ प्रकारच्या नगरपालिका स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

ब) या नगरपालिकांसाठी राज्य सरकार अधिसूचना काढेल.

**योग्य पर्याय निवडा.**

(१) अ योग्य ब अयोग्य (२)ब योग्य अ अयोग्य

(३) अ, ब दोन्ही योग्य (४)अ, ब दोन्ही अयोग्य

**स्पष्टीकरण :** १)७४ व्या घ.दु. कायद्यामुळे प्रत्येक राज्यात ३ प्रकारच्या नगरपालिका स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. नगरपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका

२) संक्रमण क्षेत्र, लहान शहरी क्षेत्र, मोठे शहरी क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र जे राज्यपालांनी त्यांची लोकसंख्या, घनता महसूल प्राप्ती, गैरकृषी रोजगार प्रमाण, आर्थिक महत्त्व इत्यादी घटक लक्षात घेऊन निश्चित केलेले असेल.कलम २४३ क्यू - नगरपालिका स्थापना

**४) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) ५ लाख किंवा अधिक लोकसंख्या असलेल्या नगरपालिकांच्या प्रादेशिक क्षेत्रात वॉर्ड समिती स्थापन केल्या जातील.

ब) वॉर्ड समितीमध्ये केवळ १ वॉर्डचा समावेश असेल.

क) वॉर्ड समिती रचना, प्रादेशित क्षेत्र, वॉर्ड समितीमध्ये जागा भरण्याची पद्धत या सर्व बाबी राज्य विधानमंडळ कायद्याद्वारे तरतूद करु शकते.

**अयोग्य विधाने निवडा.**

(१) अ, ब (२) ब, क

(३) क केवळ (४) ब केवळ

**स्पष्टीकरण :** वॉर्ड समिती - ३ लाख.

वॉर्ड समितींमध्ये १ किंवा अधिक वॉर्डचा समावेश असेल.

| उत्तरे | १)१ | २)२ | ३)४ | ४)१ |
|---|---|---|---|---|

**५) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) कलम २४३ ZD नुसार प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा नियोजन समिती स्थापन करण्यात येईल.

ब) जिल्हा नियोजन समिती संपूर्ण जिल्ह्यासाठी एकच मसुदा विकास योजना तयार करेल.

क) राज्य विधानमंडळ कायद्याद्वारे जिल्हा नियोजन समितीबद्दल तरतूद करु शकते.

**वरीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.**

(१) अ केवळ (२) ब, क केवळ

(३) ब केवळ (४) वरीलपैकी कोणतेही नाही

**स्पष्टीकरण :** वरील सर्व विधाने योग्य.

✻ राज्य विधानमंडळ कायद्याद्वारे पुढील बाबी संदर्भात तरतूद करु शकेल.

१) जिल्हा नियोजन समिती रचना

२) अशा समितीतील जागा भरण्याची पद्धत

३) या समित्यांना नेमून द्यावयाची कामे

४) अशा समितीच्या अध्यक्षांच्या निवडणूकीची पद्धत

**६) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत राज स्थापन करणारे देशातील १३ वे राज्य ठरले.

ब) महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९६१ चा आहे.

क) १ मे १९६२ रोजी पंचायत राज स्थापन करण्यात आले.

**योग्य विधाने कोणती ?**

(१) अ, ब (२) ब, क

(३) अ, क (४)वरील सर्व

**स्पष्टीकरण :** महाराष्ट्र पंचायत राज स्थापन करणारे ११ वे राज्य ठरले.

✻ महाराष्ट्रात पंचायती राज्याच्या संदर्भात ''वसंतराव नाईक'' यांच्या अध्यक्षतेखाली एक लोकशाही विकेंद्रीकरण समिती नेमण्यात आली होती.

✻ २२६ शिफारशी वसंतराव समितीने केल्या होत्या.

✻ ८ सप्टेंबर १९६१ – संमत

✻ १५ मार्च १९६२ कायद्याला मान्यता मिळाली.

✻ १ मे १९६२ पासून राज्यभर लागू.

**७) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ हा मुंबई व उपनगर मुंबई या दोन जिल्ह्यांना लागू होत नाही.

ब) स्वत:चा कायदा करून पंचायत राज संस्था स्थापन करणारे महाराष्ट्र हे राजस्थाननंतर दुसरे राज्य आहे.

क) महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीचा कारभार ''मुंबई ग्रामपंचायत, अधिनियम १९६८'' अन्वये चालतो.

**अयोग्य नाही असे विधान ओळखा.**

(१) केवळ अ (२) केवळ अ, ब

(३) केवळ अ, क (४) वरील सर्व

**स्पष्टीकरण :** मुंबई व मुंबई उपनगर या २ जिल्ह्यांना लागू होत नाही. स्वत:चा कायदा करून पंचायत राज स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीचा कारभार ''मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८'' नुसार चालतो.

**८) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेला इतर राज्यातील जिल्हा परिषदेच्या मानाने अधिक अधिकार आहेत.

ब) जिल्हा हे नियोजन व विकासाचा महत्त्वाचा घटक मानण्यात आले आहे.

क) पंचायत राज कायद्याने लोकसभा व विधानसभा सदस्यांना जिल्हा परिषदेवर प्रतिनिधीत्त्व मिळाले आहे.

ड) जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेवर देखरेख ठेवतो.

इ) जिल्हाधिकारी पंचायत राज संस्थाचा प्रमुख घटक आहे.

ई) जिल्हाधिकारी पंचायत राज संस्थाच्या कारभारात हस्तक्षेप करु शकतो.

**वरील विधानांपैकी महाराष्ट्र राज्याची पंचायत राज्य व्यवस्थेची वैशिष्ट्ये कोणती ?**

(१) अ, ब, क, ड, इ (२) अ, ब, ड, इ

(३) अ, ब, ड, इ, ई (४) अ, ड, इ, ई

**स्पष्टीकरण :** ✻ पंचायत राज कायद्याने लोकसभा व विधानसभा सदस्यांना जिल्हा परिषदेवर प्रतिनिधीत्त्व नाकारले आहे. ✻ जिल्हाधिकारी पंचायत राज संस्थाच्या कारभारात हस्तक्षेप करु शकत नाही. केवळ देखरेख ठेऊ शकतो.

**९) पुढील विधाने अभ्यासा.**

अ) बोंगिरवार समिती महाराष्ट्र शासनाने २ एप्रिल १९७० रोजी नेमली.

ब) या समितीने २०२ शिफारशी केल्या.

क) या समितीने संसद व विधीमंडळ सदस्य यांचा समावेश जिल्हा परिषदेवर करावा असे सुचविले.

| उत्तरे | ५)४ | ६)२ | ७)१ | ८)२ | ९)१ |
|---|---|---|---|---|---|

# २४ संघ लोकसेवा व राज्य लोकसेवा आयोग

१) **वाक्य (अ) :** आयोगाच्या अध्यक्षासहीत संघ लोकसेवा आयोगाची सदस्य संख्या ९ ते ११ दरम्यान असते.

**कारण (ब) :** संविधानात संघ लोकसेवा आयोगाची सदस्य संख्या नमुद केली आहे.

**पर्यायी उत्तरे –**

१) वाक्य बरोबर, कारण चूक
२) वाक्य चूक, कारण चूक
३) वाक्य चूक, कारण बरोबर
४) वाक्य बरोबर असून कारण त्याचे योग्य समर्थन करते.

**स्पष्टीकरण–** UPSC संवैधानिक संस्था आहे. (कलम ३१५ ते ३२३). UPSC ची सदस्य संख्या किती असावी हे संविधान स्पष्टपणे निर्देशित करत नाही, तर सदस्य संख्या राष्ट्रपतीच्या मर्जीवर सोपविण्यात आली आहे. साधारणतः सदस्य संख्या अध्यक्षांसह ९ ते ११ असते.

२) **खालीलपैकी कोणत्या कारणास्तव राष्ट्रपती स्वमर्जीने संघ लोकसेवा आयोगाच्या सदस्यास पदावरुन हटवू शकतात?**

अ) मानसिक दुर्बलता ब) दिवाळखोरी
क) गैरवर्तन

**पर्यायी उत्तरे –**

१) अ, ब फक्त २) ब, क फक्त
३) अ व क फक्त ४) वरील सर्व

**स्पष्टीकरण –** संविधानाच्या कलम ३१७ नुसार राष्ट्रपती आयोगाचे अध्यक्ष, सदस्य यांना मानसिक, शारिरिक दुर्बलता, दिवाळखोरी, आयोगावर कार्यरत असतांना अन्यत्र लाभाचे पद धारण करणे या करिता पदावरुन स्वमर्जीने दूर करु शकतात, परंतु गैरवर्तन या कारणाकरिता राष्ट्रपतीस सर्वोच्च न्यायालयाकडे चौकशी करावी लागते (कलम १४५)

३) **संघ लोकसेवा आयोगाबाबत खालीलपैकी अचूक नसलेली विधाने कोणती?**

अ) संघ लोकसेवा आयोगाची अध्यक्षासह ११ सदस्य ही सदस्य संख्या निश्चित असते.

ब) आयोगाचे अध्यक्ष वयाचे ६५ वर्षे किंवा ६ वर्षे यापैकी जे आधी पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत पद धारण करतात.

क) आयोगाचे सदस्य ६ वर्षे किंवा वयाचे ६२ वर्षापर्यंत पद धारण करतात.

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त अ व ब २) फक्त ब व क
३) फक्त अ व क ४) वरील सर्व

**स्पष्टीकरण –** UPSC- Constitutional body (Art 315-Art 323) सदस्य संख्या संविधानात नमूद नाही, राष्ट्रपतिच्या मर्जीनुसार सदस्य संख्या ठरणार, सहसा ९ ते ११ असते (अध्यक्षांसह). कलम ३१६ नुसार आयोग अध्यक्ष, सदस्य यांचा कार्यकाळ ६५ वर्षे किंवा ६ वर्ष यापैकी आधी संपणारा. ६२ वर्षे कार्यकाळ–राज्यसेवा आयोग अध्यक्ष, सदस्य पदावधी संपण्यापुर्वी राजीनामा राष्ट्रपतीकडे सुपुर्द करु शकतात.

४) **वाक्य (अ) :** राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य हे वयाची ६२ वर्षे किंवा ६ वर्षे यापैकी आधी संपणाऱ्या कालावधीपर्यंत पदधारण करतात.

**कारण (ब) :** संविधानात निर्मिती वेळेस राज्य लोकसेवा आयोग सदस्याच्या/अध्यक्षाच्या कार्यकाळाबाबत ही तरतूद करण्यात आली होती.

**पर्यायी उत्तरे –**

१) वाक्य बरोबर, कारण बरोबर
२) दोन्ही चूक
३) वाक्य चूक, कारण बरोबर
४) कारण चूक, वाक्य बरोबर

**स्पष्टीकरण –** SPSC, UPSC दोन्ही संविधानिक संस्था, कलम ३१५ ते कलम ३२३ दोन्हीना लागू
कलम –३१६–सदस्यांची नियुक्ती, सदस्यांचा कार्यकाळ यांच्याशी संबंधीत
UPSC- अध्यक्ष – सदस्य ६५ वर्षे / ६ वर्षे
SPSC's- अध्यक्ष – सदस्य ६२ वर्षे / ६ वर्षे
Originally, SPSC's साठी ६० वर्षे ही तरतूद होती.
४१ वी घटनादुरुस्ती १९७६ नुसार ही वाढवून ६२ वर्षे करण्यात आली.

| उत्तरे | १)१ | २)१ | ३)३ | ४)४ |
|---|---|---|---|---|

५) १) 'गैरवर्तन' हे पदावरुन दुर करण्याच्या कारणाची संविधानात व्याख्या (define) केलेली आहे.

२) गैरवर्तन या कारणावरुन संघ लोकसेवा आयो-गाच्या सदस्यास पदावरुन दूर करावयाचे असल्यास राष्ट्रपतींवर सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला बंधनकारक असतो.

**वरीलपैकी योग्य विधान ओळखा.**

१) फक्त अ २) फक्त ब

३) अ,ब दोन्ही ४) वरीलपैकी एकही नाही

**स्पष्टीकरण–** संविधानात - गैरवर्तन - व्याख्या (१) जर संबंधीत व्यक्ती ही शासनाच्या / राज्याच्या एखाद्या कराराशी संबंधीत इच्छूक असणे. (२) किंवा एखाद्या फायद्याच्या करार किंवा करारामध्ये सहभागी असणे, अथवा कोणत्याही प्रकारचा फायदा मिळविणे. गैरवर्तनात सर्वोच्च न्यायालयाचे (कलम १४५) - चौकशी निष्कर्ष राष्ट्रपतीवर बंधनकारक असतात.

---

**६) जोड्या जुळवा.**

| गट अ | गट ब |
|---|---|
| अ) कलम - ३१८ | १) सदस्य/अध्यक्ष यांना पदावरुन दूर करणे |
| ब) कलम -३२० | २) आयोगाचे कार्य |
| क) कलम -३२२ | ३) संघ लोकसेवा आयोगाचा खर्च |
| ड) कलम - ३१७ | ४) संघ लोकसेवा आयोग सदस्य संख्या सेवाशर्ती |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | १ | २ | ३ | ४ |
| २) | ४ | २ | ३ | १ |
| ३) | ४ | ३ | २ | १ |
| ४) | १ | ३ | २ | ४ |

**स्पष्टीकरण** - कलम ३१५-संघलोकसेवा आयोग/SPSC/JPSC, कलम ३१६- आयोग रचना, कलम ३१७-सदस्यांच्या पदच्युती, कलम ३१८- सदस्यसंख्या, सेवाशर्ती करण्याचा अधिकार राष्ट्रपतीस, कलम ३२०- आयोगाची कार्ये, कलम ३२२- आयोगाचा खर्च (भारताच्या एकत्रित निधीतून)

---

७) अ) घटनेच्या भाग १४ मध्ये संघ लोकसेवा आयोगाची तरतूद करण्यात आली आहे.

ब) भाग १५ मध्ये राज्य लोकसेवा आयोगाची तरतूद करण्यात आली आहे.

क) अखिल भारतीय सेवा निर्मिती संविधानाच्या कलम ३११ मध्ये देण्यात आली आहे.

**अयोग्य नसलेली विधान/ने कोणती ती ओळखा.**

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त ब २) फक्त अ

३) अ, ब ४) ब व क

**स्पष्टीकरण–** घटना -भाग १४-लोकसेवा आयोग (राज्य, केंद्र) कलम ३१२-अखिल भारतीय सेवा निर्मिती-अधिकार-राज्यसभा, कलम ३११-केंद्र / राज्य सेवेतुन निवडण्यात आलेल्या अधिकाऱ्याची पदावरुन काढणे. कलम -३१५(-१) UPSC/ SPSC निर्मितीसाठी तरतूद, कलम ३१५(२) - संयुक्त लोकसेवा आयोग

---

८) अ) संविधानाच्या कलम ३१५(२) नुसार राज्य लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात येते.

ब) मुळतः राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्याचा कार्यकाळ ६० वर्षे किंवा ६ वर्षे यापैकी आधी संपेल तो अशी तरतूद संविधानात होती.

क) मुलतः केंद्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाळ ६५ वर्षे किंवा ६ वर्षे अशी तरतूद होती.

**योग्य विधान/ ने कोणती ती ओळखा.**

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त अ २) अ व क

३) ब व क ४) अ व ब

**स्पष्टीकरण** - ३१५ (१)- UPSC/ SPSC निर्मिती, ३१५ (२)- Joint Public Service Commission निर्मिती

सदस्यांचा कार्यकाळ - कलम ३१६(२)

U.P.S.C.-संविधान निर्मिती वेळी - 65yr/6yr

S.P.S.C.-संविधान निर्मिती वेळी - 60yr/6yr (41st Constitutional Amendment Act) 1976-62yrs

---

९) अ) संयुक्त राज्य लोकसेवा आयोग हे संघ लोकसेवा आयोगाप्रमाणे संविधानिक संस्था आहे.

ब) भारतात आतापर्यंत एकही संयुक्त राज्य लोकसेवा आयोग निर्माण करण्यात आला नाही.

**अयोग्य नसलेली विधान/ने कोणती ती ओळखा?**

**पर्यायी उत्तरे –**

१) केवळ अ २) केवळ ब

३) अ, ब दोन्ही ४) वरीलपैकी एकही नाही

**स्पष्टीकरण–** संविधानात कलम ३१५(२) अंतर्गत संयुक्त राज्यसेवा आयोग निर्मितीसाठी तरतूद UPSC / SPSC

| उत्तरे | ५)३ | ६)२ | ७)२ | ८)३ | ९)४ |
|---|---|---|---|---|---|

# २६ निवडणूक आयोग व निवडणूक प्रक्रिया

**१) निवडणुक आयोगाने स्वत: करिता खालीलपैकी कोणती मार्गदर्शक तत्त्वे ठेवली आहेत?**

अ) निवडणुक प्रक्रिया पार पाडण्याकरिता गुणवत्तापुर्ण पायाभुत सुविधा निर्माण करणे

ब) निवडणुक प्रक्रिया पार पाडण्याकरीता राजकीय पक्षांसोबत व्यस्त राहणे.

क) निवडणुक प्रक्रिये करीता तंत्रज्ञान स्वीकारणे.

**पर्यायी उत्तरे –**

१) अ, ब    २) ब, क

३) अ, ब व क    ४) फक्त क

**स्पष्टीकरण– निवडणुक आयोग –** कलम ३२४ नुसार स्थापन, संविधानिक संस्था मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारली / ठेवली– संविधानातील तत्त्वे स्वीकारणे मतदानाशी संबंधीत सर्व घटकांसोबत व्यस्त राहणे (निवडणुक पार पाडण्याकरिता), निवडणुक प्रचार, प्रसाराची जागरुकता करणे इत्यादी कार्ये करते.

**२) निवडणुक आयोगाच्या उद्दिष्टांशी संबंधीत बाबी कोणत्या?**

अ) भागधारकांच्या नैतिक सहभागाची खात्री करणे.

ब) भागधारकांच्या सर्वसमावेशकतेची खात्री करणे

क) अखंडता, स्वायत्तता राखणे.

**पर्यायी उत्तरे –**

१) क फक्त    २) ब, क

३) अ, ब, क    ४) वरीलपैकी कोणतेही नाही

**स्पष्टीकरण–निवडणुक आयोगाचे उद्दिष्ट –** निवडणुक आयोग स्वातंत्र्य, अखंडता, स्वायत्तता राखते तसेच भागधारकांची सर्वसमावेशकता त्यांचा नैतीक सहभाग यांची खात्री करणे, निवडणुक प्रक्रिया योग्य प्रकारे पार पाडणे.

**३) निवडणुक आयोगाची कामे खालीलपैकी कशाप्रकारे विभाजीत केले जाऊ शकतात?**

अ) अर्धन्यायिक    ब) कार्यकारी

क) सल्लागार    ड) प्रशासकिय

**पर्यायी उत्तरे –**

१) अ, क, ड    २) अ, ब, क

३) ब, ड    ४) ब, क, ड, अ

**स्पष्टीकरण–अर्धन्यायिक–** विविध पक्षांना दर्जा, चिन्हे देणे, त्यासंबंधी वाद मिटवणे, **सल्लागार –** सभागृहांच्या नेत्यांच्या अपात्रतेबाबत, राष्ट्रपती, राज्यपाल यांना सल्ला देणे. **प्रशासकीय –** निवडणुक प्रक्रियेचे सुपरव्हिजन करणे

**४) निवडणुक आयोग ही एक संविधानिक संस्था आहे, तरी त्याच्या खालीलपैकी कोणत्या उणिवा दिसुन येतात?**

अ) निवडणुक आयोगाच्या सदस्य संख्या (विशिष्ट सदस्य संस्था) चा संविधानात उल्लेख नसणे.

ब) निवडणुक आयोगाच्या सदस्य पात्रतेचे निकष संविधानात नसणे.

**पर्यायी उत्तरे –**

१) फक्त अ    २) फक्त ब

३) अ, ब    ४) दोन्ही नाही

**स्पष्टीकरण–निवडणुक आयोग –** कायद्यानुसार घटनात्मक संस्था ३२४ कलम सदस्य संख्या संविधानात नमुद नाही – (राष्ट्रपती ठरवितात) सध्या ३ सदस्यीय निवडणुक आयोग, पात्रता निकष, कार्यकाळ हे देखील संविधानात नमुद नाही. राष्ट्रपतीस हे सर्व अधिकार असतात.

**५)** अ) निवडणुक आयोग हे एक स्वतंत्र आयोग आहे.

ब) निवडणुक आयोग कायमस्वरुपी आयोग आहे.

क) निवडणुक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५१ ची आहे.

**योग्य विधान/ने कोणते?**

१) अ, ब    २) ब, क

३) अ, ब व क    ४) अ, क

**स्पष्टीकरण – कलम ३२४ –** निवडणुक आयोग, भाग–१५– निवडणुका–निवडणुक आयोग–निवडणुक आयोग संविधानिक, कायस्वरुपी, स्वतंत्र आयोग, २५ जानेवारी १९५० ला निवडणुक आयोगाची स्थापना, २५ जानेवारी – राष्ट्रीय मतदार दिन.

**६)** अ) मुख्य निवडणुक आयुक्ताचे वेतन, भत्ते हे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाप्रमाणे असते.

ब) सहाय्यक निवडणुक आ युक्ताचे वेतन, भत्ते हे उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाप्रमाणे असतात.

| उत्तरे | १)३ | २)३ | ३)१ | ४)३ | ५)१ | ६)२ |
|---|---|---|---|---|---|---|

अयोग्य विधान/ने निवडा.

१) फक्त अ २) फक्त ब

३) अ व ब दोन्ही ४) एकही नाही

**स्पष्टीकरण–** मुख्य निवडणुक आयुक्त आणि सहाय्यक निवडणुक आयुक्त यांना सारखेच वेतन, भत्ते असतात, त्यांचे वेतन, भत्ते हे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाप्रमाणे असतात.

७) अ) १५ ऑक्टोबर १९८९ पर्यंत निवडणुक आयोग एक सदस्यी होते.

ब) १९९० ते १९९३ या काळात निवडणुक आयोग हे एक सदस्यीय होते.

क) १९९३ पासून निवडणुक आयोग बहुसदस्यीय आहे.

**योग्य विधान / ने कोणते ?**

१) अ, क २) ब, क

३) अ, ब व क ४) फक्त क

८) **निवडणुक आयोग सर्वप्रथम बहुसदस्यीय कधी करण्यात आला.**

१) १६ ऑक्टोबर १९८९ २) १५ ऑगस्ट १९८९

३) १५ ऑक्टोबर १९९३ ४) १५ ऑगस्ट १९९३

**स्पष्टीकरण** – २५ जानेवारी १९५० ला निवडणुक आयोगाची कलम ३२४ नुसार स्थापना, १६ ऑक्टोबर १९८९ ला राष्ट्रपतीनी दोन निवडणुक आयुक्त नियुक्त करुन १५ ऑक्टोबर १९८९ पर्यंत एकसदस्यीय असलेला आयोग बहुसदस्यीय केला. तेव्हा निवडणुक आयोगात १ मुख्य आयुक्त आणि २ सहाय्यक आयुक्त

९) अ) मुख्य निवडणुक आयुक्ताचे पगार, भत्ते हे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे असतात.

ब) जर आयोगाच्या सदस्यामध्ये एखाद्या मुद्यावर मतभेद असले तर मुख्य निवडणुक आयुक्ताचे मत स्वीकाले जाते.

**योग्य विधान/ने कोणते/ती ओळखा.**

१) फक्त अ २) फक्त ब

३) अ, ब दोन्ही ४) वरील पैकी एकही नही

**स्पष्टीकरण–निवडणुक आयोग–**१ मुख्य आयुक्त, २ सहाय्यक आयुक्त, सर्वांचे वेतन, भत्ते सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे, जर आयोगाच्या सदस्यांमध्ये एखाद्या मुद्यावर मतभेद असले तर मताधिक्य (majority) ने निर्णय घेतला जातो.

१०) **प्रादेशिक आयुक्त (Regional commissior) निवडणुक आयुक्त यांची नियुक्ती घटनेच्या कोणत्या कलमेशी संबंधीत आहे?**

१) कलम ३२४ (२) २) कलम ३२४ (३)

३) कलम ३२४ (५) ४) कलम ३२४ (४)

**स्पष्टीकरण** – संविधान कलम ३२४ नुसार, निवडणुक आयोग स्थापन, कलम ३२४ (१) – निवडणुक प्रक्रिया पार पाडणे आयोगाचे काम, कलम ३२४(२) – आयोगास मुख्य निवडणुक आयुक्त+ राष्ट्रपतीस योग्य वाटेल इतके सदस्य, ३२४(३) – बहुसदस्यीय प्रादेशिक आयुक्ताची नियुक्ती, ३२४(४) सदस्यांच्या कार्यकाळ हे राष्ट्रपती ठरविणार.

११) अ) केंद्रीय निवडणुक आयोग ही संविधानिक आयोग आहे.

ब) राज्य निवडणुक आयोग हे घटनादुरुस्तीने संविधानात समाविष्ट करण्यात आले.

**योग्य विधान/ने कोणते/ती ओळखा.**

१) फक्त अ २) फक्त ब

३) अ, ब दोन्ही ४) दोन्ही नाही

**स्पष्टीकरण – केंद्रिय निवडणुक आयोग** – कलम ३२४ नुसार २५ जानेवारी १९५० ला स्थापन, राज्य निवडणुक आयोग घटनेच्या ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने स्थापन करण्यात आले.

राज्य निवडणुक आयोग – स्थानिक स्वराज्य संस्थाचे निवडणुकासंबंधी काम पाहते. केंद्रिय निवडणुक आयोग – संसद, घटकराज्याच्या निवडणुका.

१२) अ) महाराष्ट्र निवडणुक आयोगाची स्थापना २६ जानेवारी १९९४ ला झाली.

ब) डी.एन.चौधरी हे महाराष्ट्र निवडणुक आयोगाचे पहिले आयुक्त होते.

**योग्य विधान/ने कोणते?**

१) केवळ अ २) केवळ ब

३) अ, ब दोन्ही ४) दोन्ही नाही

**स्पष्टीकरण** – राज्य निवडणुक आयोगाची स्थापना ७३ व्या ७४ व्या घटनादुरुस्तीने करण्यात आली. महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोगाची स्थापना २६ एप्रिल १९९४ ची आहे.

डी.एन. चौधरी–पहिले आयुक्त – राज्य निवडणुक आयुक्त सध्या यु.पी.एस.मोडन हे महा राज्य निवडणुक आयुक्त.

| उत्तरे | ७)३ | ८)१ | ९)१ | १०)४ | ११)३ | १२)२ |
|---|---|---|---|---|---|---|

# ३२ जिल्हा प्रशासन

**१) पुढील विधाने पाहा.**

अ) मन्रो व्यवस्थेनुसार जिल्हाधिकारी हा एकात्मिक अधिकार असणारा अधिकारी बनला.

ब) कॉर्नवालीस व्यवस्थेतंर्गत जिल्हाधिकाऱ्याला मर्यादित भूमिका पार पाडावी लागली.

क) बंगाल प्रांतात जिल्हाधिकारी हा केवळ महसूल जमा करणारा अधिकारी या भूमिकेतून कार्य करीत असे.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

१) अ, ब  २) ब,क

३) अ, क  ४) सर्व

**स्पष्टीकरण :** ⁕ मन्रो व्यवस्थेतंर्गत तो एकात्मिक म्हणजे. कार्यकारी व दंडाधिकारी अशी एकत्रित अधिकार असणारा प्रशासक बनला.

⁕ कॉर्नवालीस व्यवस्थेंतर्गत जिल्हाधिकाऱ्याला मर्यादित भूमिका पार पाडावी लागली व तो केवळ जिल्हयातील कार्यकारी प्रमुख बनला.

**२) पुढील विधाने वाचा.**

अ) लोकशाही विकेंद्रीकरणाच्या योजनेत बळवंतराय मेहता समितीने शिफारश केली की, जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदांचा अध्यक्ष असावा.

ब) समुदाय विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये जिल्हाधिकाऱ्याला महत्वाची भूमिका देण्यात आली.

क) राष्ट्रीय विस्तार योजनेअंतर्गत जिल्हाधिकाऱ्यास विकास कार्याची समन्वयाची भूमिका नाकारण्यात आली.

ड) १९५५ सालापर्यंत जिल्हाधिकारी हा जिल्हयाचा मुख्य विकास आणि कल्याण अधिकारी बनला.

**वरीलपैकी योग्य विधाने निवडा.**

१) अ, ब  २) अ, ड

३) अ, ब, क  ४) अ, ब, क, ड

**स्पष्टीकरण :** ⁕ बळवंतराय मेहता समिती – १९५७ :-

⁕ समुदाय विकास कार्यक्रम – १९५२ अंमलबजावणी

⁕ जिल्हाधिकाऱ्याला कोणतीही भूमिका देण्यात आली नव्हती.

⁕ समुदाय विकास कार्यक्रम अपयशी ठरला. व नंतर राष्ट्रीय विस्तार योजनेअंतर्गत त्याला विकास कार्याच्या समन्वयाची भूमिका देण्यात आली.

**३) पुढील विधाने वाचा.**

अ) कायदा व सुव्यवस्था राखणे हे जिल्हाधिकाऱ्याचे प्रथम कर्तव्य आहे.

ब) जिल्हा पोलिस आणि इतर यंत्रणेच्या सहाय्याशिवाय तो जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्याची कार्य पार पाडतो.

क) जिल्हाधिकारी गुन्हाच्या तपासावर पर्यवेक्षण करु शकतो.

ड) जिल्हाधिकारी शांतता भंग करण्यास प्रतिबंध करु शकतो.

**वरीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.**

१) अ, ब  २) ब,क

३) क,ड  ४) अ,ड

**स्पष्टीकरण :** ⁕ कार्यकारी मंडळापासून न्यायमंडळ विभक्त झाले आहे. त्यामुळे गुन्ह्याच्या तपासावर पर्यवेक्षण करण्याचे काम सध्या न्यायाधीश न्याय दंडधिकारी करतात.

⁕ शांतता व सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी आजही जिल्हाधिकाऱ्यास पाडावी लागते.

**४) पुढील विधाने वाचा.**

अ) जिल्हाधिकारी/जिल्हा न्यायदंडधिकारी हा जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष असतो.

ब) जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीत केवळ राष्ट्रीय NGO चे प्रतिनिधी असतात.

क)या समितीत आपत्ती व्यवस्थापन गटाचे सदस्य कार्यरत असतात.

ड) पोलिस विभाग, पाणीपुरवठा विभाग या विभागाचे सदस्य जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीत असतात.

**वरील पैकी योग्य विधाने ओळखा.**

१) अ, ब,क  २) ब, क, ड

३) अ, क, ड  ४) वरील सर्व

**स्पष्टीकरण : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती**

**अध्यक्ष –** जिल्हाधिकारी /जिल्हा न्याय दंडाधिकारी

| उत्तरे | १)४ | २)२ | ३)२ | ४)३ |
|---|---|---|---|---|

**सदस्य –** आरोग्य विभाग, जलसिंचन विभाग, पशुवैदयकीय विभाग, पाणीपुरवठा स्वच्छता विभाग, पोलिस अग्निशामक सेवा, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी, आपत्ती व्यवस्थापन अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्याला, व्यवस्थापनाचे कार्य करावे लागते.

---

**५) पुढील विधाने वाचा.**

अ) राजस्थानमध्ये जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा सहयोगी सदस्य असतो व त्याला मतदानाचा अधिकार असतो.

ब) ७३ व्या घ.दु. नंतर राजस्थान मध्ये जिल्हधिकारी हा जिल्हा नियोजन समितीचा नियुक्त सदस्य असतो.

क) मध्यप्रदेश मध्ये जिल्हाधिकारी हा जिल्हा नियोजन समितीचा सदस्य आणि सचिव असतो.

**वरील पैकी अयोग्य विधाने निवडा.**

| | |
|---|---|
| १) अ | २) ब, अ |
| ३) ब | ४) क |

**स्पष्टीकरण :** राजस्थानमध्ये जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा सहयोगी सदस्य असतो परंतु त्याला मतदानाचा अधिकार नसतो.
–आंध्रप्रदेश मध्ये जिल्हाधिकारी जिल्हा परिषदेचा पूर्ण वेळ सदस्य असून तो सर्व स्थायी समितीचा अध्यक्ष असतो. परंतु नंतर त्याला जिल्हा परिषदेपासुन विभक्त करण्यात आले.
–महाराष्ट्रातही जिल्हाधिकाऱ्याला जिल्हा परिषद मध्ये समाविष्ट केलेले नाही.
– महाराष्ट्रात जिल्हाधिकारी हा जिल्हा नियोजन समितीचा सचिव असतो.

---

**६) पुढील विधाने वाचा.**

अ) प्रशासकीय सुधारणा आयोगाने शिफारस केली की सर्व विकास कार्ये जिल्हा परिषदेमार्फत पार पाडली जावीत.

ब) जिल्हाधिकारी हा केवळ नियमकाच्या कार्यासाठी जबाबदार धरला जावा.

क) अशोक मेहता समितीने विकास कार्ये विभक्त करुन त्यांची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे दयावी अशी शिफारस केली.

**वरील विधानापैकी अयोग्य विधान निवडा.**

| | |
|---|---|
| १) ब | २) क |
| ३) अ | ४) एकही नाही. |

**स्पष्टीकरण :** वरील सर्व विधाने बरोबर आहेत.

---

**७) उपविभागीय अधिकारी विषयी पुढील विधाने पाहा.**

अ) उपविभागीय अधिकारी हा पंचायत समितीचा नामनिर्देशित सदस्य असतो.

ब) तो समितीच्या कामकाजात सहभागी होऊ शकतो.

क) त्याला मतदान करण्याचा अधिकार आहे.

**वरील विधानापैकी योग्य विधाने निवडा.**

| | |
|---|---|
| १) केवळ अ, ब | २) केवळ ब |
| ३) केवळ ब, क | ४) केवळ अ |

**स्पष्टीकरण :** उपविभागीय अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिद्ध सदस्य असतो.
- समितीच्या कामकाजात सहभागी होऊ शकतो.
- मात्र त्याला मतदान करण्याचा अधिकार नाही.
- त्याच्या प्रशासकीय ज्ञान, अनुभव आणि मार्गदर्शनाचा फायदा समितीला निर्णय घेण्यामध्ये होतो.

---

**८) पुढील विधाने वाचा.**

अ) उपविभागीय अधिकाऱ्याचे पद हे जिल्हाधिकाऱ्याच्या समकक्ष असते.

ब) तो केंद्रशासनातील सनदी सेवक असून गटाचा विकास अधिकारी असल्याने विकास प्रशासनासाठी त्याला जबाबदार मानले जाते.

क) राज्य सेवेतील अधिकाऱ्याला बढती देऊन उपविभागीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाते.

**वरील विधानापैकी योग्य असे विधान निवडा.**

| | |
|---|---|
| १) अ, ब | २) अ,क |
| ३) ब,क | ४) वरील सर्व |

**स्पष्टीकरण :**
- उपविभागीय अधिकारी हा राज्य शासनातील सनदी सेवक असुन गटामधील विकास प्रशासनासाठी त्याला जबाबदार मानले जाते.
- उपविभागीय अधिकाऱ्याला नियुक्त करण्याची पध्दत सर्व राज्यामध्ये सार्वत्रिक स्वरूपाची आहे.
- प्रत्येक राज्यानुसार पदाची पात्रता भिन्न भिन्न आहे.
- गट प्रशासनातील उपविभागीय अधिकारी हा मध्यवर्ती घटक असतो.

---

**९) पुढील विधाने वाचा.**

अ) कायदा व सुव्यवस्था राखणे, महसुल गोळा करणे हे उपविभागीय अधिकाऱ्याची दुय्यम कार्ये आहेत.

ब) क्षेत्रीय कार्यालयावर तो नियंत्रण ठेवतो.

क) जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी ला मार्गदर्शन करतो.

| उत्तरे | ५)१ | ६)४ | ७)२ | ८)२ | ९)३ |
|---|---|---|---|---|---|

# ३५ काही समर्पक कायदे

## पर्यावरण संरक्षण कायदा १९८६

**१) भारतामध्ये पुढील कोणत्या वर्षी केंद्र शासनांतर्गत पर्यावरण विभागाची स्थापना करण्यात आली?**

१)१९८२ २) १९८५

३) १९८६ ४ )१९८०

**स्पष्टीकरण:** भारतामध्ये १९८० साली केंद्र शासन अंतर्गत पर्यावरण विभागाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९८५ साली या विभागाचे रूपांतर मंत्रालयात झाले आणि **पर्यावरण आणि वन मंत्रालय** अस्तित्वात आले.

**२) पुढीलपैकी अचूक विधान/विधाने ओळखा: पुढील विधाने अभ्यासा.**

अ) राज्यघटनेतील कलम ४८ अनुसार पर्यावरणाच्या संरक्षणाची आणि सुधारणांची जबाबदारी केंद्र शासनाकडे आहे

ब) राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वातील कलम ५१ अनुसार राज्याने पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे.

**पर्यायी उत्तरे :-**

१) अ फक्त २) ब फक्त

३) अ व ब दोन्ही ४) कोणतेही नाही.

**स्पष्टीकरण:** कलम ४८ अनुसार पर्यावरणाच्या संरक्षणाची आणि सुधारणांची जबाबदारी राज्य संस्थेकडे असून राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वातील कलम ५१ अ नुसार प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे.

**३) पर्यावरण संरक्षण अधिनियम -१९८६ संबंधीत पूढील विधानांचा अभ्यास करा. पुढीनांचा विचार करा.**

अ) भोपाल गॅस(वायूगळती) दुर्घटनेनंतर 'पर्यावरण संरक्षण अधिनियम' तयार करण्यात आला.

ब) या विधेयकाला २३ मे १९८६ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाल्याने त्याचे कायदयात रूपांतर झाले.

**पर्यायी उत्तरे :-**

१) फक्त अ बरोबर २) फक्त ब बरोबर

३)दोन्ही बरोबर ४)दोन्ही चूक

**स्पष्टीकरण : भोपाळ गॅस(वायूगळती) दुर्घटना** : ३ डिसेंबर १९८४ च्या मध्यरात्री घडली. या दुर्घटनेनंतर भारत सरकारने हा कायदा तयार करण्याचा निर्णय घेतला. हा कायदा संविधानातील कलम २५३ च्या अंतर्गत तयार करण्यात आला आहे.

**४) खालीलपैकी कोणता अधिनियम १९ नोव्हेंबर १९८६ या तारखेपासून लागू झाला आहे?**

**पुढील विधाने वाच.**

१) पाणी (प्रतिबंध आणि प्रदूषण नियत्रण) अधिनियम

२) वन्यजीव संरक्षण अधिनियम

३) वन संरक्षण अधिनियम

४) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम

**स्पष्टीकरण - पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ :** 'मानवी पर्यावरण' या विषयावर संयुक्त राष्ट्राने (UN) स्टॉकहोम येथे जून १९७२ मध्ये एक जागतिक परिषद आयोजित केली होती. त्याचा परिणाम म्हणून भारतामध्ये १९८० साली केंद्र शासनांतर्गत पर्यावरण विभागाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९८५ साली या विभागाचे रूपांतर मंत्रालयात झाले आणि पर्यावरण आणि वन मंत्रालय अस्तित्वात आले. भोपाळ गॅस (वायूगळती) दुर्घटनेनंतर १९८६ साली 'पर्यावरण संरक्षण अधिनियम' तयार करण्यात आला. या विधेयकाला २३ मे १९८६ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाल्याने त्याचे कायद्यात रूपांतर झाले. १९ नोव्हेंबर १९८६ पासून सदर कायदा लागू झाला.

**५) पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ या संदर्भात पुढील विधाने वाचा व योग्य विधान/ने निवडा. पुढील विधानांचा विचार करा.**

अ) हा अधिनियम जम्मू काश्मीर सोडून संबंध भारतासाठी लागू आहे.

ब) हा अधिनियम पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करणे याची हमी देतो.

क) हा अधिनियम देशातील वने जंगले आणि वन्यजीव यांना सुरक्षा प्रदान करतो.

१) अ फक्त २) ब व क फक्त

३) अ व क दोन्ही ४) सर्व विधाने खरी आहेत.

**स्पष्टीकरण:** हा अधिनियम जम्मू काश्मीरसह संबंध भारतासाठी लागू आहे.उर्वरीत दोन्ही विधाने बरोबर आहेत.

| उत्तरे | १)४ | २)४ | ३)३ | ४)४ | ५)२ |
|---|---|---|---|---|---|

**६) पर्यावरण या संज्ञेमध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होतो? पुढील विधाने बघा?**

अ) पाणी हवा जमीन यांच्यातील आंतरसंबंध

ब) पाणी,हवा आणि जमीन आणि मानव इतर सजीव प्राणी, वनस्पती सूक्ष्मजीव व संपत्ती यांच्यातील परस्पर संबंध

**पर्यायी उत्तरे –**

१) अ फक्त २) ब फक्त

३) अ व ब दोन्ही ४) दोन्ही नाहीत

**७) पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ संदर्भात पुढील विधानांचा अभ्यास करा. पुढील विधाने वाचा.**

अ) केंद्र सरकार या कायद्याअंतर्गत कार्य पार पाडत असताना लेखी स्वरूपात कोणत्याही व्यक्तीला, अधिकारी वा कोणत्याही अधिसत्तेला निर्देश जारी करू शकते.

ब) अशा निर्देशांचे या व्यक्तींनी पालन करणे बंधनकारक आहे.

**पर्यायी उत्तरे –**

१) अ फक्त २) ब फक्त

३) अ व ब दोन्ही ४) दोन्ही नाहीत

**स्पष्टीकरण:** शंकाचे निरसन करण्याकरीता निर्देश देणाऱ्या केंद्र सरकारच्या अधिकारांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. अ) कोणताही उद्योग, कार्यचालन (Operations) वा प्रक्रिया थांबवणे, त्यास प्रतिबंध व त्याचे नियमन करणे. ब) वीज, पाणी वा इतर कोणतीही सेवा पुरविण्याचे थांबवणे व तिचे नियमन करणे. कलम ५ अ – उपरोक्त निर्देशांमुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे अपील करता येते.

**८) पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ हा पुढील आंतरराष्ट्रीय परिषदेचे निर्णय अंमलबजावणी करण्याकरिता पारित करण्यात आला.**

१) स्टॉकहोम –जुन १९७२

२) न्यूयार्क – सप्टेंबर १९८२

३) जिनेव्हा – एप्रिल १९८०

४) बीजींग–ऑगस्ट १९८५

**स्पष्टीकरण –** स्टॉकहोम येथे जून १९७२ मध्ये मानवी पर्यावरण विषयावर झालेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेत पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्ती टिकवण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण व विकास करणे आवश्यक समजण्यात आले होते. त्यानुसार पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ पारित करण्यात आला.

**९) खालीलपैकी सत्य विधान कोणते?**

१) 'पर्यावरण संरक्षण कायदा १९८६' हा पर्यावरणाच्या रक्षणासाठी रक्षक म्हणन कार्य करते.

२) 'पर्यावरण संरक्षण कायदा' हा १९७२ च्या स्टॉकहोम परिषदेमधे घेण्यात आलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी अस्तित्वात आला.

३) 'वन्य–जीवन संरक्षण कायदा' हा विशिष्ट बाबी हाताळणारा विशेष कायदा आहे.

४) वायू कायदा आणि जल कायदा (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रक) हे पर्यावरण संरक्षण कायद्यातील १९८६ तरतुदींप्रमाणे अस्तित्वात आले.

**पर्यायी उत्तरे :–**

१) अ व ब फक्त २) अ ब व क फक्त

३) अ क व ड फक्त ४)वरील सर्व

**स्पष्टीकरण –** स्टॉकहोम येथे जून १९७२ मध्ये मानवी पर्यावरण विषयावर संयुक्त राष्ट्र परिषद झाली होती.या परिषदेमध्ये पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्ती टिकवण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण व विकास करणे आवश्यक आहे असा निष्कर्ष काढण्यात आला. जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम हा १९७४ साली पारित करण्यात आला तर हवा (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम हा १९८१ मध्ये पारित करण्यात आला.

**१०) पुढीलपैकी अचूक विधान/विधाने ओळखा:**

I) पर्यावरण संरक्षण अधिनियम हा केवळ कायदा आहे.

II) पर्यावरण संरक्षण अधिनियमात कठोर शिक्षेची तरतूद आहे.

१) फक्त I बरोबर आहे.

२) फक्त II बरोबर आहे.

३) I आणि II दोन्ही बरोबर आहेत.

४) वरीलपैकी काहीही नाही.

**स्पष्टीकरण –** स्टॉकहोम येथे जून १९७२ मध्ये मानवी पर्यावरण विषयावर झालेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेत पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्ती टिकवण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण व विकास करणे आवश्यक आहे असा निष्कर्ष काढण्यात आला. त्यानुसार पूढे पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ पारित करण्यात आला. या अधिनियमाअंतर्गत प्रदूषणास प्रतिबंध करण्याचा व नियंत्रित करण्याचा उद्देश साध्य करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याचे अधिकार केंद्र सरकारकडे देण्यात आले आहे. मानवी आरोग्य, सुरक्षितता व पर्यावरण धोक्यात आणणाऱ्यांकरिता पर्यावरण संरक्षण अधिनियमात कठोर शिक्षेची तरतूद आहे.

| उत्तरे | ६)3 | ७)३ | ८)१ | ९)२ | १०)३ |
|---|---|---|---|---|---|

# ३७ शासन व्यवहाराच्या बदलत्या संदर्भात प्रशिक्षण

भगीरथ प्रकाशन, पुणे for UPSC & MPSC

**१) 'नागरी सेवा' ही संज्ञा व 'नागरी सेवा प्रणाली' ही पद्धती भारतात पहिल्यांदा ..........ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत सुरू केली.**

१) १६ व्या शतकात   २) १७ व्या शतकात
३) १८ व्या शतकात   ४) १९ व्या शतकात

**२) इ. स.१६७५ मध्ये कंपनीने पदांची श्रेणीवार पदे निर्माण केली. ती चढत्या क्रमाने खालीलप्रमाणे सांगता येतील.**

अ) प्रशिक्षणार्थी   ब) लेखनिक
क) वरिष्ठ व्यापारी   ड) अडत्या

**पर्यायी उत्तरे –**

१) अ, ब, क, ड   २) अ, क, ब, ड
३) अ, क, ड, ब   ४) अ, ब, ड, क

**स्पष्टीकरण:** पदांची श्रेणीवार पदे चढत्या क्रमाने पुढीलप्रमाणे– अ) प्रशिक्षणार्थी ब) लेखनिक क) अडत्या ड) कनिष्ठ व्यापारी इ)वरिष्ठ व्यापारी

**३) पुढीलपैकी कोणत्या गव्हर्नर जनरल यांच्या प्रयत्नामुळे नागरी सेवेचा उदय झाला ?**

अ) लॉर्ड वॉरन हेस्टींग   ब) लॉर्ड वेलस्ली
क) लॉर्ड लिटन   ड) लॉर्ड कॉर्नवॉलीस

**पर्यायी उत्तरे –**

१) केवळ अ   २) केवळ अ व ब
३) केवळ अ व ड   ४) केवळ अ व क

**स्पष्टीकरण :** लॉर्ड हेस्टींगने नागरी सेवेचा पाया घातला तर कॉर्नवालिसने त्यामध्ये सुधारणा केल्या व त्याला आधुनिक बनवले व तर्कशुद्ध केले.

**४) पुढील पैकी कोणाला भारतातील नागरी सेवेचा जनक म्हटले जाते?**

१) लॉर्ड वॉरन हेस्टींग   २) लॉर्ड कॉर्नवॉलीस
३) लॉर्ड वेलस्ली   ४) सरदार वल्लभभाई पटेल

**५) इ.स.१८०० मध्ये तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली याने पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी कंपनीच्या नागरी सेवकांना प्रशिक्षण देण्यासाठी महाविद्यालय स्थापन केले?**

१) कलकत्ता   २) मुंबई (तत्कालीन बॉम्बे)
३) मद्रास   ४) दिल्ली

**स्पष्टीकरण:** इ.स.१८०० मध्ये तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली याने कलकत्ता येथील फोर्ट विल्यम येथे कंपनीच्या नागरी सेवकांना प्रशिक्षण देण्यासाठी महाविद्यालय स्थापन केले. वेलस्लीची ही कृती इस्ट इंडिया कंपनीच्या नियमक मंडळाला-संचालक गटाला पसंत पडली नाही. त्यांनी त्याच उद्देशासाठी १८०६ मध्ये इंग्लंड मधील हेलीबरी येथे ईस्ट इंडिया महाविद्यालय स्थापन केले.

**६) पुढीलपैकी कोणत्या सनदी कायद्यान्वये कंपनीतील नागरी सेवक निवडण्यासाठी मुक्त स्पर्धा सुरू करण्यात आली ?**

१) इ.स. १८१३ चा सनदी कायदा
२) इ.स. १८३३ चा सनदी कायदा
३) इ.स. १७९३ चा सनदी कायदा
४) इ.स. १८५३ चा सनदी कायदा

**स्पष्टीकरण:** १८३३ च्या सनदी कायद्यान्वये कंपनीतील कोणत्याही स्थानावर, पदावर व नोकरीमध्ये भारतीयांवर बंदी असणार नाही असे नमूद केले गेले.परंतु संचालक गटाच्या विरोधामुळे कायद्यातील ही तरतूद फोल ठरली. त्यांना आश्रयदात्याचीच पद्धत चालू ठेवायची होती.

**७) पुढीलपैकी कोणत्या सनदी कायद्यान्वये आश्रयदात्याची पद्धत बंद करून कंपनीतील नागरी सेवकांच्या निवडीसाठी व भरतीसाठी मुक्त स्पर्धा सुरू केली गेली?**

१)१७९३ चा सनदी कायदा
२)१८१३ चा सनदी कायदा
३)१८३३ चा सनदी कायदा
४)१८५३ चा सनदी कायदा

**स्पष्टीकरण:** १८५३ चा सनदी कायद्यामुळे संचालक गटाचा अधिकार संपुष्टात आला व करारबद्ध नागरी सेवा स्पर्धे मार्फत भारतीयांसाठी खुली झाली. तिचे नियम हे नियंत्रक मंडळातर्फे ठरविण्यात आले.

| उत्तरे | १)२ | २)४ | ३)३ | ४)२ | ५)१ | ६)२ | ७) ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|

**८) १८५३ चा सनदी कायद्याच्या तरतुदी अमलात आणण्यासाठी उपाययोजना सुचवण्याकरिता भारतीय नागरिक सेवांबाबत समिती नियुक्त केली गेली ही समिती .............म्हणून ओळखली जाते.**

१) मेकॉले समिती २) ॲट किसन समिती
३) मेटकाल्फ समिती ४) कॉर्नवालीस समिती

**स्पष्टीकरण:** मेकॉले समिती (१८५४)- भारतीय नागरी सेवांबाबत समिती

---

**९) १८५४ मधील मेकॉले समितीने अहवाल सादर केला. त्यामध्ये पुढील शिफारसी करण्यात आल्या.**

अ) नागरी सेवांमध्ये भरती करण्यासाठी खुली स्पर्धा पद्धत सुरू करण्यात यावी.
ब) या चाचणीला बसणाऱ्या उमेदवारांचे वय २० ते २३ वर्षे असावे.
क) स्पर्धा परीक्षा लंडनमध्ये घेण्यात यावी.
ड) हेलीबरी येथील ईस्ट इंडिया महाविद्यालय सुरू ठेवावे.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

१) केवळ अ व क २) केवळ अ,क व ड
३) केवळ अ,ब व क ४) वरील सर्व

**स्पष्टीकरण:** मेकॉले समिती च्या प्रमुख शिफारशी

i) खुली स्पर्धा पद्धत सुरू करण्यात यावी
ii) उमेदवारांचे वय १८ ते २३ असावे
iii) स्पर्धा परीक्षा लंडनमध्ये घेण्यात यावी
iv) उमेदवारांसाठी अंतिम नियुक्तीपूर्वी परीक्षाधीन कालावधी असावा
v) हेलीबरी येथील ईस्ट इंडिया महाविद्यालय बंद करावे.

---

**१०) पहिली स्पर्धा परीक्षा नियंत्रण मंडळाच्या देखरेखीखाली सर्वप्रथम कधी घेण्यात आली?**

१) १८५५ २) १८५९
३) १८६३ ४) १८६९

**स्पष्टीकरण:** १८५५ मध्ये लंडन येथे सर्वप्रथम स्पर्धा परीक्षा घेण्यात आली.पुढे १८५८ मध्ये ईस्ट इंडिया महाविद्यालय बंद करण्यात आले व भारतातील नागरी सेवकांना ब्रिटनमधील विद्यापीठात प्रशिक्षण देण्यात येऊ लागले.

---

**११) पहिला भारतीय करारबद्ध नागरी सेवेत भरती होणारी व्यक्ती पुढीलपैकी कोण?**

१) सत्येन्द्रनाथ वर्मा २) सुभाषचंद्र बोस
३) हरिकिसन दास ४) सत्येन्द्र नाथ ठाकूर

**स्पष्टीकरण:** १८६४ मध्ये सत्येन्द्रनाथ ठाकूर हे करारबद्ध नागरी सेवेत भरती होणारे पहिले भारतीय होते.

**१२) पुढीलपैकी कोणाच्या अध्यक्षतेखाली १८८६ मध्ये लोकसेवा आयोग नेमण्यात आला ?**

१) चार्ल्स ॲटकिसन २) चार्ल्स मेटकाल्फ
३) लॉर्ड कॉर्नवालीस ४) विल्यम हेस्टींग्ज

**स्पष्टीकरण:** चार्ल्स ॲटकिसन आयोगाने १८८७ मध्ये आपला अहवाल सादर केला.

---

**१३) चार्ल्स ॲटकिसन आयोगाने १८८७ मध्ये सादर केलेल्या अहवालातील शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.**

अ) नागरी सेवांची द्विस्तरीय पद्धत बंद करून त्या जागी त्रिस्तरीय पद्धत सुरू करावी.
ब) नागरी सेवा प्रवेशाचे वय २० वर्षांपेक्षा जास्त नसावे
क) वैधानिक नागरी सेवा भरतीची पद्धत सुरू करावी
ड) स्पर्धा परीक्षा एकाच वेळी इंग्लंड व भारतात घ्यावी

**वरील पैकी अयोग्य विधाने कोणती?**

१) केवळ क २) केवळ अ,ब,क
३) केवळ ड ४) वरील सर्व विधाने योग्य आहेत.

**स्पष्टीकरण:** चार्ल्स ॲटकिसन यांच्या अध्यक्षतेखालील लोकसेवा आयोगाने आपला अहवाल १८८७ मध्ये सादर केला. त्यामध्ये पुढील शिफारशी होत्या

i) करारबद्ध आणि तसे नसलेले अशी नागरी सेवांची दविस्तरीय पदधत बंद करून त्याच्या जागी साम्राज्याची, क्रांतिक व दुय्यम नागरी सेवा अशी त्रिस्तरीय पद्धत सुरू करावी.
ii) नागरी सेवा प्रवेशाचे वय २३ वर्षांपेक्षा जास्त नसावे
ii) वैधानिक नागरी सेवा भरतीची पद्धत रद्द करावी
iv) स्पर्धा परीक्षा एकाच वेळी इंग्लंड व भारतात घेऊ नये

---

**१४) पुढीलपैकी कोणाच्या अध्यक्षतेखाली भारतातील लोकसभेच्या संदर्भात शाही आयोग नेमण्यात आला?**

१) लॉर्ड वॉरन हेस्टींग २) लॉर्ड कॉर्नवॉलीस
३) लॉर्ड वेलस्ली ४) लॉर्ड इसलिंग्टन

**स्पष्टीकरण:** इसवी सन १९१२ मध्ये भारतातील लोकसेवेच्या संदर्भात लॉर्ड इसलिंग्टन यांच्या अध्यक्षतेखाली शाही आयोग नेमण्यात आला. आयोगाने आपला अहवाल १९१५ मध्ये सादर केला. आयोगाने पुढील शिफारशी केल्या

i) वरिष्ठ पदांसाठीची भरती इंग्लंड व भारतामध्ये विभागून करण्यात यावी परंतु एकाच वेळी परीक्षा घेऊ नये.
ii) वरिष्ठ पदांपैकी २५ टक्के जागा मधील भरती थेट भरती तसेच पदोन्नतीने कराव्यात.

| उत्तरे | ८)१ | ९)१ | १०)१ | ११)४ | १२)१ | १३)२ | १४)४ |
|---|---|---|---|---|---|---|---|

# ३८ महत्वाचे अधिनियम

**१) भारतीय पुरावा कायदा १८७२ हा कुणाला लागू होतो?**

१) लष्करी न्यायालय २) लवाद निर्णय व प्रतिज्ञापत्र

३) न्यायधिकरणे ४) सर्वांना लागू होतो.

**२) खालील विधाने अभ्यासा.**

अ) भारतीय पुरावा अधिनियम हा सर हेन्री मौन यांनी तयार केलेल्या मसुद्यावर आधारीत आहे.

ब) त्यांना या कायद्याचे जनक मानल्या जाते.

**पर्यायी उत्तरे :-**

१) अ बरोबर ब चूक

२) दोन्ही विधाने बरोबर असून विधान अ हे विधान ब चे कारण आहे

३) ब बरोबर अ चूक

४) दोन्ही विधाने चूक

**स्पष्टीकरण :** १८६८ मध्ये सर हेन्री मैन यांनी या कायद्याचा मसुदा तयार केला परंतु तो रद्द करण्यात आला.

✻ १८७२ चा अधिनियम हा सर जेम्स फिट्झ स्टीफन यांनी तयार केलेल्या मसुद्यावर आधारित आहे म्हणून त्यांना या कायद्याचे जनक मानले जाते.

**३) भारतीय पुरावा अधिनियम १८७२ संबंधी खालील विधाने अभ्यासा.**

अ) हा या अधिनियमात १ ते ११ प्रकरणे असून १६७ कलमे आहेत. या कायद्यामध्ये १९८३, १९८४ व १९८८ मध्ये सुधारणा करण्यात आल्या.

ब) हा अधिनियम १ सप्टेंबर १८७२ पासुन लागु झाला व स्वातंत्र मिळाल्यानंतर देखील संपूर्ण भारतात कार्यरत राहीला.

**पर्यायी उत्तरे :-**

१) केवळ अ बरोबर २) केवळ ब बरोबर

३) अ व ब दोन्ही बरोबर ४) दोन्ही चूक

**स्पष्टीकरण :** भारतीय पुरावा अधिनियमांत १९८३, १९८४ व १९८६ मध्ये सुधारणा करण्यात झाल्या.

- हा कायदा स्वातंत्र्यानंतर जम्मू काश्मिर सोडून सर्व राज्यांना लागू आहे.

**४) भारतीय पुरावा अधिनियम १८७२ बाबत खालील विधाने अभ्यासा.**

अ) कलम १२३ नुसार - राज्यसंस्थेच्या कोणत्याही व्यवहारासंबधी अप्रकाशित शासकीय अहवालातुन कोणताही पुरावा कोणत्याही व्यक्तीला मिळण्याची परवानगी दिली जाणार नाही.

ब) शासनातील महत्वाच्या व्यक्तीने जर का ती माहीती मागीतली तर संबंधीत विभागाच्या प्रमुखास ती माहिती द्यावीच लागते.

क) कलम १२५ मध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला वा दंडाधिकाऱ्याला एखादा अपराध घडणार असल्याची माहिती कोठुन मिळाली हे सांगण्याची सक्ती केली जाणार नाही असे नमुद आहे.

ड) या अधिनियमात एकूण दहा प्रकरणे आहेत.

**पर्यायी उत्तरे :-**

१) फक्त ब चूक २) फक्त अ चूक

३) फक्त क चूक ४) ब व ड चूक

**स्पष्टीकरण :** संबंधीत विभागाच्या प्रमुखास ती माहिती कोणालाही नाकारण्याचा पुर्ण अधिकार आहे.

- या अधिनियमात एकुन ११ प्रकरणे व १६७ कलमे आहेत.

**५) जोड्या जुळवा.**

| **न्यायलयीन निर्णय** | **खटले** |
|---|---|
| १) लोकसेवा आयोगाचा सल्ला व मार्गदर्शन | अ)जाफसल हसन १९३१ |
| २) वॉटर मार्कसंबंधी पुरावा | ब)वैंकटचेल्लय्या वी. एस.चेट्टीयार १९०८ |
| ३) विभागीय चौकशी जाबजवाब | क)एस. एस. सिंग ती पंजाब सरकार १९६१ |
| ४) आयकर खात्यातील करदात्याची कागदपत्रे | ड) हरबन्स सहाई १९१२ |
| | इ)रामण्णा विरूध्द आंध्रप्रदेश सरकार १९७१ |

| उत्तरे | १)१ | २)४ | ३)४ | ४)४ | ५)१ |
|---|---|---|---|---|---|

पर्यायी उत्तरे : १ २ ३ ४

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| १) | क | अ | ड | ब |
| २) | इ | अ | ड | ब |
| ३) | क | ड | अ | ब |
| ४) | इ | ब | ड | अ |

**६) शासकीय गुप्तता अधिनियम कायदा पूर्ण भारतात लागू आहे.**

अ) तो शासनाच्या सर्व सेवकांना व भारताबाहेर भारतीय नागरिकांनादेखील लागू आहे

ब) या अधिनियमांअर्गत हेरगिरी केल्याच्या कारणावरून ५ वर्षापर्यंत शिक्षा होते.

क) माहितीची अनैतिक देवाणघेवाण केल्याच्या कारणावरून १५ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा होवू शकते

**वरीलपैकी अयोग्य विधान ओळखा.**

१) अ फक्त २) ब फक्त

३) क फक्त ४) अ व क फक्त

**स्पष्टीकरण :** कार्यालयीन हेरगिरीविरूध्द तीन वर्षे तर संरक्षण, खाण, बंदरे, कारखाने, जहाज, वा विमान यासंबंधी हेरगिरीसाठी १४ वर्षे शिक्षा नमूद आहे.

**७) कार्यालयीन गुप्तता अधिनियम कालबाह्य झाला असुन** तो मोडीत काढण्याची शिफारस कोणी केली?

१) पहिला प्रशासकीय सुधारणा आयोग

२) दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग.

३) वजाहत हबी बुल्लाह

४) वि. के. सिंग

**स्पष्टीकरण :** दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाचे - अध्यक्ष विरप्पा मोईली.

**८) पुढील विधाने पहा.**

अ) कार्यालयीन गुप्तता अधिनियम मधील कलम ३ मधील पोटकलम १ अंतर्गत खंड सी केवळ कार्यालयीन संकेतांक वा पासवर्ड त्यांनाच लागू होतो.

ब) विधी आयोगाने ४३ व्या अहवालात कार्यालयीन गुप्तता अधिनियमाच्या कलम ५ च्या सर्वसमावेशक स्वरूपामुळे येणाऱ्या अडचणी अधोरेखीत केल्या आहेत.

क) माहिती अधिकारातील कलम ८ जे नुसार केंद्रीय सार्वजनिक माहिती अधिकारी खाजगी व्यक्तीगत माहिती सार्वजनिकहितासाठी उघड करू शकतो

**वरीलपैकी चूक नसलेली विधाने कोणती?**

१) अ फक्त २) ब फक्त

३) सर्व चूक ४) अ,ब, क

**९) प्रशासकीय कायद्याबाबत पुढील विधान पाहा.**

अ) प्रशासकीय कायदा समाजहितावर भर देतो.

ब) प्रशासकीय कायदा काहीसे परिवर्तनीय (लवचिक) असे प्रमाण अवलंबतो.

क) प्रशासकीय कायद्याने खाजगी व्यक्तीपेक्षा सार्वजनिक अधिसत्तांना वरचढ बसविले आहे.

**वरीलपैकी अयोग्य विधान निवडा.**

१) अ, ब २) ब, क

३) अ ४) वरीलपैकी कोणतेही नाही.

**स्पष्टीकरण :** ❊ वरील सर्व विधाने योग्य आहेत

❊ प्रशासकीय कायदा हा सामाजिक आणि समाज हिताच्या दृष्टीने व्यक्तीचे स्वातंत्र आणि खाजगी मालमत्ता या समान कायदा हक्कांना दुय्यम असतो.

❊ म्हणुन व्यक्तीगत स्वातंत्र्यांविरोधात हो कायदा समाज हितावर भर देतो.

❊ सामाजिक धोरणाची अंमलबजावणी करणे हा प्रशासकीय कायद्याचा उद्देश असल्यामुळे ती काही परिवर्तनीय असे प्रमाण अवलंबली.

**१०) पुढील विधाने वाचा व योग्य विधानाची निवड करा.**

अ) कार्यकारी मंडळाकडून निर्माण केले जाणारे विधिनियम म्हणजे प्रदत्त विधिनियम होय.

ब) संसदेद्वारा कार्यकारी मंडळाला कायदानिर्मितीचा जो अधिकार दिला जातो त्यास प्रदत्त विधिनियम असे म्हटले जाते.

**वरीलपैकी योग्य विधान निवडा.**

१) अ २) ब

३) अ, ब दोन्ही ४) अ, ब दोन्ही नाही.

**स्पष्टीकरण :** संसदेने प्रदान केलेल्या विधिवत सत्तेच्या अधीन मर्यादेत अधिनस्थ अधिकारी व संस्थानी दुय्यम स्वरूपाच्या विधिविषयक सत्तेचा प्रयोग करणे म्हणजे प्रदत्त विधिनियम होय.

❊ मंत्र्याचा अधिकार विषयम डोनोमोर समितीने प्रदत्त विधानाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

१) संसदेद्वारा कार्यकारी मंडळास दिलेल्या कायदेनिर्मितीच्या अधिकाराचा प्रयोग अथवा अवलंब करणे

२) या अधिकाराचा अवलंब प्रयोग करून तयार केलेले कायदे, नियम, पोटनियम इत्यादी.

| उत्तरे | ६)३ | ७)२ | ८)४ | ९)४ | १०)३ |
|---|---|---|---|---|---|

# ३९ सार्वजनिक खर्च नियंत्रण

भगीरथ प्रकाशन, पुणे for UPSC & MPSC

**१) योग्य विधानांची निवड करा.**

अ) भारतामध्ये सार्वजनिक खर्चावर संसद नियंत्रण ठेवते

ब) सार्वजनिक वित्ताला पहारेकरी म्हणून कायदेमंडळ कार्य करीत असते.

**वरील विधानापैकी योग्य विधाने ओळखा.**

१) अ योग्य ब अयोग्य  २) ब योग्य अ अयोग्य

३) दोन्ही योग्य  ४) दोन्ही अयोग्य

**स्पष्टीकरण :** वरील दोन्ही विधाने योग्य आहेत.

✻ भारतामध्ये सार्वजनिक खर्चावर संसद नियंत्रण ठेवते

✻ संसद सार्वजनिक वित्ताची संरक्षक असते.

✻ सार्वजनिक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी संसद साधारणपणे २ मार्गाचा अवलंब करते.

अ) संसदीय कार्यपद्धतीतील अंगभूत तंत्र

ब) संसदेने नियुक्त केलेल्या समित्या

✻ सार्वजनिक वित्ताचा पहारेकरी म्हणून कायदेमंडळ कार्य करीत असते. भारतात संसद (लोकसभा व राज्यसभा) ही भूमिका पार पाडते.

---

**२) खाली दिलेल्या पर्यायामधुन योग्य विधाने ओळखा.**

अ) संसद सदस्यांना प्रश्न विचारण्याचा सर्वप्रथम हक्क १९०९ साली प्राप्त झाला.

ब) संसद सदस्यांना पूरक प्रश्न विचारण्याचा हक्क सर्वप्रथम १९०९ साली प्राप्त झाला

क) सार्वजनिक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रश्नोत्तरासारखे प्रबळ तंत्र संसदेला अवलंबता येते.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

१) अ, ब  २) ब, क

३) अ, क  ४) अ, ब, क

स्पष्टीकरण : अ)अयोग्य संसद सदस्यांना प्रश्न विचारण्याचा सर्वप्रथम हक्क १८९२ च्या कायद्याने प्राप्त झाला आणि १९०९ साली पुरक प्रश्न विचारण्याचा हक्क.

---

**३) पुढीलपैकी योग्य विधाने निवडा.**

अ) संसदेत प्रश्न विचारायचा असेल तर प्रश्न विचारण्यापुर्वी संबंधीत मंत्र्याला १५ दिवसाची पुर्वसूचना द्यावी लागते.

ब) एखादा विषय तातडीचा असेल तर अल्पसुचना पुरेशी ठरते

क) तारांकीत आणि बिगर तारांकीत असे प्रश्नाचे २ प्रकार आहेत.

ड) तारांकीत प्रश्नाचे उत्तर लेखी व अतारांकीत प्रश्नाचे उत्तर मौखिक (तोंडी) स्वरूपात द्यायचे असतात.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

१) अ, ब  २) ब, क

३) ब, क, ड  ४) अ, ब, क

**स्पष्टीकरण :** संबंधीत मंत्र्याला १० दिवसाची पूर्वसुचना द्यावी लागते.

✻ तारांकीत प्रश्नाचे उत्तर तोंडी (मौखिक) स्वरूपात द्यायचे असते.

✻ अतारांकीत प्रश्नाची उत्तरे लेखी स्वरूपात द्यायची असतात .

---

**४) पुढील विधानांचा विचार करा.**

अ) कपात प्रस्ताव (Cut motion) हा विशिष्ट धोरणावर चर्चा करणे, तक्रारीना वाट करून देणे किंवा काटकसर सुचविणे या हेतुने हा प्रस्ताव मांडला जातो.

ब) धोरण कपात (Policy Cut motion) या अंतर्गत मागणीतील १०० रूपयाची कपात सुचविली जाते.

क) प्रतिकात्मक कपात (Token Cut motion) या प्रस्तावतर्गत १ रूपया कपात सुचविली जाते.

**वरीलपैकी अयोग्य विधाने पहा.**

१) अ, ब  २) ब, क

३) अ, ब, क सर्व  ४) अ, क

**स्पष्टीकरण :** ✻ ३ प्रकारचे कपात प्रस्ताव असतात.

धोरण कपात मागणीतील १ रूपया अंतर्गत कपात सुचविली जाते याद्वारे मंत्रालयाने पाठपुरावा केलेल्या धोरणाला संपुर्ण नकार दर्शविला जातो.

✻ प्रतिकात्मक कपात मागणीतील १०० रूपयांची कपात सुचविली जाते तक्रारीला वाट मोकळी करून देण्यांच्या उद्देशाने ही कपात सुचविली जाते.

✻ काटकसर कपात आवश्यक वाटेल एवढी रक्कम कपात म्हणुन सुचविण्याचा अधिकार सदस्यांना आहे.

---

| उत्तरे | १)३ | २)२ | ३)२ | ४)२ |
|---|---|---|---|---|

**५) अंदाज समिती बाबत पुढील विधाने पाहा.**

अ) अंदाज समिती सर्वप्रथम १० एप्रिल १९५० मध्ये स्थापित करण्यात आली.

ब) सुरूवातीला अध्यक्षासह या समितीमध्ये २० सदस्य होते. १९५६-५७ मध्ये वाढ करून ही सदस्य संख्या ३० इतकी करण्यात आली.

क) अंदाज समितीमध्ये २० लोकसभेचे व १० राज्ससभेचे सदस्य असतात.

**वरीलपैकी योग्य विधानांचा पर्याय निवडा.**

१) अ  २) ब

३) ब, क  ४) अ, ब

**स्पष्टीकरण :** १० एप्रिल १९५० स्थापन रोजी

✲ सुरूवातीला २५ सदस्य

✲ १९५६-५७ पर्यंत ३० सदस्य झाले.

✲ ३० पेक्षा अधिक सदस्य नसतात

✲ सर्व सदस्य दरवर्षी लोकसभेतील सदस्यामधुन एकल संक्रमणीय प्रमाणशीर मतदान पद्धतीनुसार निवडले जातात.

**६) अंदाज समितीबाबत पुढील विधान पाहा.**

अ) अंदाज समितीमध्ये राज्यसभेचा एकही सदस्य नसतो.

ब) अंदाज समितीला लघू लोकसभा असे म्हणतात

क) अंदाज समितीमधील सदस्यांचा कार्यकाळ साधारणपणे १ वर्षाचा असतो

ड) अंदाज समितीतील २/३ सदस्य दरवर्षी निवृत्त होतात.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

१) अ, ब, क  २) ब, क, ड

३) अ, क, ड  ४) वरील सर्व

**स्पष्टीकरण :** सर्व सदस्य लोकसभेतून निवडले जातात. सर्व राजकीय पक्षांतील सदस्यांना त्यांच्या सभागृहातील त्यांच्या प्रमाणानुसार अंदाज समितीमध्ये प्रतिनिधीत्व मिळत असल्याने या समितीला लघु लोकसभा असे म्हणतात.

✲ कार्यकाळ - १ वर्षे

✲ अंदाज समितीतील १/३ सदस्य दरवर्षी निवृत्त होतात.

✲ जून महिन्यात समितीची निवड होते.

✲ जुलै महिन्यात तिच्या कामकाजास सुरूवात होते.

**७) पुढील विधानांचा विचार करा व अयोग्य पर्याय निवडा.**

अ) लोकलेखा समितीची स्थापना १९२१ साली करण्यात आली

ब) माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा १९१९ कायद्याअंतर्गत तिची स्थापना करण्यात आली.

क) लोकलेखा समितीची सदस्यसंख्या २२ एवढी आहे.

**पर्यायी उत्तरे :-**

१) अ  २) ब

३) क  ४) वरीलपैकी एकही नाही.

**स्पष्टीकरण :** लोकलेखा समिती ही सर्वात जुनी वित्तीय समिती होय. १९५४ पूर्वी या समितीमध्ये केवळ लोकसभेतीलच १५ सदस्य निर्वाचित सदस्य होते.

✲ दोन्ही सभागृहातील सदस्यांची मिळून लोकलेखा समिती निर्माण केली जाते.

✲ लोकसभेतील १५ सदस्य ✲ राज्यसभेतील ७ सदस्य.

**८) लोकलेखा समितीबाबत पुढीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

अ) १९७७ पासून विरोधी पक्षाच्या सदस्याला लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदी नियुक्त केले जाते.

ब) कॅगने सादर केले विनियोजन आणि वित्त अहवालांचे परिक्षण लोकलेखा समिती करते.

क) महालेखापरिक्षक लोकलेखा समितीचे कान, डोळे, आणि चेहरा समजला जातो.

**पर्यायी उत्तरे :-**

१) अ, ब केवळ  २) ब, केवळ

३) अ, क केवळ  ४) अ, ब, क सर्व

**स्पष्टीकरण :** १९६७ पासुन विरोधी पक्षाच्या सदस्याला लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदी नियुक्त केले जाते.

✲ महालेखापरिक्षक ला लोकलेखा समितीचे कान, डोळे असे समजले जाते. (चेहरा हा शब्द चूक आहे.)

**९) पुढील विधाने पाहा आणि अयोग्य विधाने निवडा.**

अ) लोकलेखा समितीला अंदाज समितीची जुळी बहीण मानले जाते.

ब) अंदाज समितीचा संबंध भारत सरकारच्या खर्चाचे लेखे आणि संसदेने ज्या उद्देशासाठी खर्चाला मंजुरी दिली होती. त्या उद्देशासाठी आणि सक्षम अधिसत्तेकडून खर्च झाला आहे, काय याच्याशी येतो,

क) लोकलेखा समितीचा संबंध सार्वजनिक खर्चाच्या अंदाजाशी येतो.

**पर्यायी उत्तरे :-**

१) अ, ब  २) ब, क

३) अ, क  ४) वरील सर्व

| उत्तरे | ५)१ | ६)१ | ७)४ | ८)२ | ९)२ |
|---|---|---|---|---|---|

# ४० आयोगाने विचारलेले प्रश्न

## स्टेट जी.एस. २ (मुख्य) २०१९

**१) विधान परिषदांविषयी पुढीलपैकी अयोग्य विधान शोधा:**

१) विधानसभा, विधान परिषद नष्ट करण्यासाठीचा ठराव संमत करू शकते.

२) धनविधेयकाच्या संदर्भात विधान परिषद ते नाकारू शकत नाही ना त्यामध्ये दुरुस्ती सुचवू शकते.

३) धनविधेयका व्यतिरिक्त इतर विधेयकांच्या संदर्भात विधान परिषदेला ते संमती लांबणीवर टाकण्याचा अधिकार आहे आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी विधीमंडळांची संयुक्त बैठक घेतली जाते.

४) राज्य सभेच्या तुलनेत विधान परिषदेला तुलनेने कमी अधिकार देण्यात आले आहेत.

**२) आदिवासी क्षेत्रांच्या प्रशासनासाठीची तरतूद भारतीय संविधानाच्या सहाव्या परिशिष्टात करण्यात आली आहे या परिशिष्टात समाविष्ट असणारी राज्ये पुढीलपैकी कोणती आहेत?**

अ) आसाम ब) त्रिपुरा क) मणीपूर

ड) मेघालय इ) सिक्कीम फ) मिझोराम

ग) झारखंड ह) नागालँड

**पर्यायी उत्तरे :**

१) अ, ब, क, ड, इ, फ, ग, ह

२) अ, ब, क, ड, ग

३) अ, ब, ड, फ

४) क, ड, इ, फ

**३) लोकसभेच्या सभापती संदर्भात खालील विधाने विचारात घ्या.**

अ) त्यास/तिलापदावरून दूर करण्यासाठी केवळ लोकसभेत उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने ठराव संमत करावा लागतो.

ब) उप पंतप्रधानाच्या बरोबरीने त्यांचा अग्रक्रम तालिकेत पाचवा क्रमांक आहे.

क) जेव्हा पदावरून दूर करण्यासंबंधीच्या ठरावास सभागृहाच्या एकूण सभासद संख्येच्या किमान एक-दशांश सदस्यांचा पाठिंबा असेल तेव्हाच सभागृह असा ठराव विचारार्थ आणि चर्चेसाठी घेवू शकते.

**वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त?**

१) केवळ अ २) केवळ अ व ब

३) केवळ क ४) वरीलपैकी एकही नाही

**४) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाविषयी पुढीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत?**

अ) ती एक वैधानिक यंत्रणा आहे.

ब) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद क्रमांक ३१५ अंतर्गत तिची स्थापना करण्यात आली आहे.

क) यामध्ये एक अध्यक्ष आणि पाच सदस्य यांचा समावेश होतो.

ड) सरकारी कर्मचाऱ्यांना कौटुंबिक निवृत्ती वेतन, अपघात/इजा संबंधीचे दावे यांविषयी सरकारला हा आयोग सल्ला देतो.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ,ब, क, ड २) ब, क, ड

३) ब, क ४) अ, ब, क

**५) केंद्र-राज्य कायदेविषयक संबंधाबाबत जोड्या लावा.**

| **स्तंभ अ** अनुच्छेद | **स्तंभ ब** तरतूद |
|---|---|
| अ) २४९ | १) दोन किंवा अधिक राज्यांच्या सहमतीने कायदे संसदेचा अधिकार |
| ब) २५० | २) संसदेने केलेले कायदे आणि राज्य विधीमंडळाने केलेले कायदे यातील विसंगती |
| क) २५२ | ३) आणीबाणी लागू असताना राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा संसदेचा अधिकार |

| उत्तरे | १)३ | २)३ | ३)४ | ४)२ | ५)१ |
|---|---|---|---|---|---|

ड) २५४ | ४) राष्ट्रहितच्या दृष्टीने राज्यसूचीतील विषयावर कायदे करण्याचा संसदेचा अधिकार

| पर्यायी उत्तरे : | अ | ब | क | ड |
| --- | --- | --- | --- | --- |
| १) | ४ | ३ | १ | २ |
| २) | ४ | ३ | २ | १ |
| ३) | २ | १ | ३ | ४ |
| ४) | २ | १ | ४ | ३ |

**६) भारतीय राज्य घटनेच्या सरनाम्याच्या सुरुवातीला समाविष्ट करण्यात आलेले 'आम्ही लोक' हे शब्द ---- राज्यघटनेमधून घेण्यात आले आहेत.**

१) अमेरिकेच्या २) ब्रिटनच्या
३) कॅनडाच्या ४) ऑस्ट्रेलियाच्या

**७) राज्यघटनेनुसार 'राज्य' या संज्ञेमध्ये खालीलपैकी कोणत्या घटकांचा समावेश होतो?**

अ) भारत सरकार आणि संसद
ब) राज्य सरकारे आणि विधिमंडळे
क) सर्व स्थानिक प्राधिकरणे
ड) अन्य सर्व प्राधिकरणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ व ब २) फक्त ब व क
३) फक्त ब ४) वरील सर्व

**८) महानदी जल विवाद न्यायाधिकरणाची स्थापना --- मध्ये करण्यात आली.**

१) मार्च २०१८ २) एप्रिल २००४
३) ऑगस्ट २०१७ ४) डिसेंबर २०१८

**९) भारतीय संविधानातील अधिकृत भाषेसंबंधीच्या विधानांविषयीचे अयोग्य विधान शोधा :**

अ) विविध घटक राज्यांसाठी अधिकृत भाषा भारतीय संविधानाने स्पष्ट केल्या आहेत.
ब) अनुच्छेद ३४५ नुसार घटक राज्य, त्या राज्यात वापरात असणारी एक अथवा अनेक भाषा किंवा इंग्रजी यांना अधिकृत भाषा म्हणून स्वीकारू शकते.
क) अनुच्छेद ३४७ नुसार केंद्रशासन अधिकृत भाषा निवडीच्या संदर्भातील घटकराज्यांच्या निर्णयात हस्तक्षेप करू शकते.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ, ब २) ब, क
३) अ, क ४) सर्व

**१०) १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यासंदर्भात खालील विधाने लक्षात घ्या :**

अ) ह्या कायद्यामुळे प्रांतिक स्वायत्तता प्राप्त झाली.
ब) फेडरल कोर्टाची स्थापना ह्या कायद्यानुसार झाली.
क) रिझर्व्ह बँकेची स्थापना ह्या कायद्यानुसार झाली.

**वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?**

१) अ व ब २) ब व क
३) अ व क ४) वरील सर्व

**११) अनुच्छेद २५-२८ नुसार असलेले मुलभूत अधिकार यासंबंधी पुढील विधानांपैकी अयोग्य विधान निवडा :**

१) राज्याने पूर्णपणे आर्थिक साहाय्य दिलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये कोणत्याही धार्मिक सूचना देण्यात येणार नाहीत.
२) भारतीय संविधानाचे धर्मनिरपेक्षता हे मुलभूत चौकटीचे तत्व आहे.
३) कोणत्याही विशिष्ट धर्माचे समर्थन वा प्रचारासाठी वापरण्यासाठी म्हणून कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही प्रकारचा कर घेण्याची सक्ती राज्य करू शकत नाही.
४) या अनुच्छेदात अंतर्गत मिळणारे अधिकार केवळ भारतीय नागरिकांनाच उपलब्ध आहेत.

**१२) नियंत्रक व महालेखापरीक्षकाबाबत खालील विधाने विचारात घ्या :**


अ) नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना भारताच्या मुख्य निर्वाचन आयुक्तांच्या बरोबरीचा दर्जा असतो परंतु अग्रक्रम तालिकेनुसार राज्यसभेच्या उपाध्यक्षापेक्षा त्यांचे स्थान वरचे आहे.
ब) भारतीय लेखा व लेखा परीक्षण विभागात कार्यरत असणाऱ्या व्यक्तिंच्या सेवा शर्ती या राष्ट्रपतीच्या सल्लामसलतीने नियंत्रक व महालेखापरीक्षक ठरवितात.
क) नियंत्रक व महालेखापरीक्षकाचे वेतन आणि भत्ते राष्ट्रपतीद्वारे निश्चित केले जातात.

**वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त?**

१) फक्त अ २) फक्त ब
३) अ व क ४) ब व क

| उत्तरे | ६)१ | ७)४ | ८) १ | ९) १ | १०)१ | ११)४ | १२)१ |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |

सर्व स्पर्धा परीक्षेसाठी स्टेट बोर्डाच्या सर्व जुन्या व नविन पुस्तकांवर
आधारित **भगीरथ प्रकाशनचे** उपयुक्त **'संपूर्ण स्टेट बोर्ड'** सर्वत्र उपलब्ध




**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

Kesari Wada, Narayan Peth,
Pune-30 **Ph.: +91 9970 298 197**
**+91 9090 906 777**

www.bhagirathacademy.in E-mail: bhagirathacademypune@gmail.com Bhagirath IAS Academy

# अभिप्राय



स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचे असेल तर सरावाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे भगीरथ टीमने साकारलेल्या 'भारताची राज्यघटना : सराव प्रश्नसंच' या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग नक्कीच सुकर होईल. सराव प्रश्नसंच असल्याने त्याचा विद्यार्थ्यांना भरपूर फायदा होईल व यशाकडे वाटचाल करता येईल.

**- रोहन कुवर**
उपजिल्हाधिकारी,२०१९(महाराष्ट्रात तिसरा)

---

भारताची राज्यघटना : सराव प्रश्नसंच या पुस्तकाची सुधारीत आवृत्त काढल्याबद्दल मिलींद, लक्ष्मी आणि अंकुश यांचे पुनश्च अभिनंदन! 'भारतीय अर्थव्यवस्था आणि आधुनिक भारताचा इतिहास' या वस्तुनिष्ठ प्रश्नसंचाप्रमाणे हे पुस्तक देखील विद्यार्थ्यांना अभ्यासात नक्कीच मार्गदर्शक ठरेल यात कोणतीच शंका नाही. लेखकांना पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा!

**- हरेश सुळ**
उपजिल्हाधिकारी,२०१९ (राज्यात ४८ वा)



---



केवळ अभ्यास करून परीक्षेत यशस्वी होता येत नाही तर त्यासाठी भरपूर सरावाची आवश्यकता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सरावासाठी आणि मार्गदर्शनासाठी भगीरथ टीमकडून 'भारताची राज्यघटना : सराव प्रश्नसंच' हे एक सुंदर पुस्तक तयार करण्यात आले आहे. ते विद्यार्थ्यांना सरावासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल.

**- वसीमा शेख**
उपजिल्हाधिकारी,२०१९(मुलींमधुन राज्यात तिसरी)

---

सरावाशिवाय स्पर्धा परीक्षेत यश मिळविणे अशक्य आहे. आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणे यासाठी सराव हा एकमेव मार्ग आहे. भगीरथ टीम ने भारताची राज्यघटना : सराव प्रश्नसंच काढलेल्या पुस्तकाबद्दल अभिनंदन व शुभेच्छा.

**- स्वाती देसाई**
उपजिल्हाधिकारी,२०१९ (मुलींमधुन राज्यात सहावी)



भगीरथ ™
IAS Academy
UPSC • MPSC
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते !

ऑफीस : २ रा मजला, केसरीवाडा,
नारायणपेठ,पुणे-३०.
मो.९९७०२९८१९७,९०९०९०६७७७

www.bhagirathacademy.co.in
bhagirathacademypune@gmail.com
Bhagirath IAS Academy